
सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | गुरुवार, ४ जून २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक १८६ । पाने १२ । किंमत रु. ८/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



जे कोणी या देशाला मातृभूमी मानतात, भारताच्या संस्कृतीचा ज्यांना अभिमान आहे, जे तिच्या सन्मानासाठी झटतात, तसेच देशाच्या एकसंघतेविषयी ज्यांना आस्था आहे, असे सर्व लोक हिंदुत्वाच्या व्याख्येत येतात.

- स्व. प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या
रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

# तृणमूल काँग्रेसमध्ये उठाव

**५८ आमदारांनी स्थापन केला वेगळा गट**



- ऋतब्रता बॅनर्जींची विरोधी पक्षनेतेपदी निवड
- विधानसभा अध्यक्षांची स्वतंत्र गटाला मंजुरी
- दोन्ही गटांकडून स्वतंत्र पत्रे सादर

**ममता बॅनर्जींना मोठा धक्का**



◆ **कोलकाता, ३ जून**

पश्चिम बंगालच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली असून तृणमूल काँग्रेसच्या निवडून आलेल्या ८० पैकी ५८ आमदारांनी बंड करीत स्वतंत्र गट स्थापन केला आहे. विशेष म्हणजे या फुटलेल्या गटाला विधानसभा अध्यक्षांनी मंजुरीही दिली. बंडखोरांचे पुढारी ऋतब्रता बॅनर्जी यांनी विरोधी पक्षनेतेपदी निवड करण्यात आली आहे. जे आमदार गेली पंधरा वर्षे सत्ता भोगत होते त्यांनीच साथ सोडल्याने ममता बॅनर्जी यांना मोठा धक्का बसला आहे. दरम्यान, पक्षातून काढलेला आमदार विरोधी पक्षनेता होऊ शकत नाही, असा दावा तृणमूल काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी केला आहे.

ममता बॅनर्जी यांचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांच्या लेटरहेडवर विधानसभा अध्यक्षांना पत्र पाठवून शोभनदेव यांना विरोधी पक्षनेते बनविण्याची शिफारस करणारा प्रस्ताव पाठविला होता. मात्र, आमदार संदीपन साहा आणि ऋतब्रता बॅनर्जी यांनी या प्रस्तावाला विरोध करीत प्रस्तावावरील त्यांच्या सह्या बनावट असल्याची तक्रार केली. यानंतर ममता बॅनर्जी यांनी या दोघांना पक्षातून निष्कासित केले. यानंतर दोघांनी बंड पुकारले आणि पक्षातील तब्बल ५८ आमदारांना सोबत घेत बुधवारी स्वतंत्र गटच स्थापन केला. आमच्या गटाला विधानसभा सभापतींनी त्यांच्या ५८ सदस्यीय गटाला स्वतंत्र गटाची मंजुरी दिली आहे, असा दावा ऋतब्रता बॅनर्जी यांनी केला आहे. या घडामोडींमुळे ममता बॅनर्जी यांना मोठा धक्का बसला असून तृणमूलचे दोन तुकडे झाल्याचे दिसत आहे. एका बाजूला ममता बॅनर्जी आणि अभिषेक बॅनर्जी यांचा अधिकृत गट आहे. तर दुसऱ्या बाजूला बंडखोर आमदार आहेत जे स्वतःला खरा विधिमंडळ पक्ष असल्याचा दावा करत आहे. तृणमूल काँग्रेसमधील या घडामोडींना अभिषेक बॅनर्जी जबाबदार असल्याचा आरोप ऋतब्रता बॅनर्जी यांनी केला आहे. (वृत्तसंस्था)

### ममता बॅनर्जींनी विधिमंडळ पक्षाचे सल्लागार व्हावे

**ऋतब्रता पुढे म्हणाले, आमच्या गटाकडे दोन-तृतीयांश आमदार आहेत. विरोधी पक्षनेत्याचे कार्यालय आमच्यासाठी उघडण्यात आले आहे. आणखी दोन आमदार लवकरच आमच्या गटात सामील होतील. आम्ही अख्रुझमान यांची मुख्य प्रतोदपदी तर जावेद अहमद खान, संदीपान साहा, सबीना यास्मिन आणि शिउली साहा यांची उपनेते म्हणून नियुक्ती केली आहे. सर्व नियुक्त्यांची माहिती अध्यक्षांना देण्यात आली आहे. ममता बॅनर्जी आजही आमच्या नेत्या आहेत. त्यांनी विधिमंडळ पक्षाचे मुख्य सल्लागार व्हावे, अशी आमची त्यांना विनंती आहे.**

### टीएमसीने बंडखोर गटाचे दावे फेटाळले

**तृणमूल काँग्रेसचे नेते कुणाल घोष यांनी बंडखोर गटाचे दावे फेटाळून लावले आहे. ते म्हणाले, पक्षातून काढलेले आमदार विरोधी पक्षनेते होऊ शकत नाहीत. दोन्ही गटांकडून स्वतंत्र पत्रे सादर करण्यात आली आहे. दोन्ही पत्रांवर अनेक आमदारांच्या सह्या आहेत. या प्रकरणाची कायदेशीर आणि संसदीय चौकशी होईल. अंतिम निर्णय पक्षाचे नेतृत्व घेईल.**



# दिल्लीत हॉटेलला आग; २१ जणांचा मृत्यू

### मृतांमध्ये ११ विदेशी नागरिक

◆ **नवी दिल्ली, ३ जून**

दिल्लीतील मालवीय नगर येथील 'हॉटेल फ्लोरिस स्टे'मध्ये बुधवारी सकाळी ८.३० वाजता भीषण आग लागली. ११ विदेशी नागरिकांसह २१ जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जण गंभीररित्या भाजले. मृतांमध्ये आशिया आणि आफ्रिकन देशांचे नागरिकांचा समावेश आहे. आगीचे कारण समजू शकले नाही. दरम्यान घटनेनंतर फरार झालेला हॉटेलचा मालक लवकेश बजाज याला बुधवारी रात्री अटक करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सकाळी ८.३० वाजताच्या सुमारास आग लागली आणि थोड्याच वेळात हॉटेलची पाच इमारतीत ती पसरली. बाहेर पडण्यासाठी समोरून एकच मार्ग आहे. या मार्गाला असलेले लोखंडी गेट आतून बंद असल्याने नागरिकांना बाहेर पडता आले नाही. हॉटेलमधील खोल्यांच्या खिडक्या बाहेरून लोखंडी ग्रील लावून बंद असल्याने लोकांना बाहेर पडण्याचा मार्गच उरला नाही. त्यामुळे हे हॉटेल नागरिकांच्या मृत्यूचा सापळा झाले. आग लागली तेव्हा काही नागरिक नुकतेच झोपेतून उठले होते तर काही झोपेत होते. आफ्रिकन देशातील कांगो सारख्या गरीब देशातून काही पर्यटक हॉटेलमध्ये थांबले होत तर बांगलादेशमधून काही जण दिल्लीत उपचारासाठी आले होते. मृत पडलेल्या भारतीयांमध्ये बहुतांश हॉटेलमधील कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. आगीतून बचावलेल्या आणि गंभीर जखमी झालेल्या नागरिकांना जवळच्याच रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

**परवानगी सहा खोल्यांची; बांधल्या २५, नियमांची ऐसीतैशी**

हॉटेलच्या बेसमेंटमध्ये सहा खोल्या बांधण्याची परवानगी देण्यात आली होती पण तेथे तब्बल २५ खोल्या बांधल्या आहेत. तसेच अग्निशमन विभागाची एनओसी सुद्धा नाही. इमारतीचा नकाशाही मंजूर केलेला नाही. या हॉटेलचे तीन भागीदार आहेत. इमारतीच्या मालकाचे नाव लवकेश आहे तर हॉटेलचा परवाना जय मिश्राच्या नावावर आहे तर खरा मालक लोकेश बजाज असल्याचे उघड झाले. (वृत्तसंस्था)

### जीव वाचविण्यासाठी मारल्या उड्या



ही आग रेस्तराँच्या वर असलेल्या हॉटेल फ्लोरिश स्टे पर्यंत पोहोचली. तसेच, तळघरातूनही सहा पेक्षा जास्त लोकांना बाहेर काढण्यात आले. या घटनेदरम्यान, काही लोकांनी आपला जीव वाचवण्यासाठी हॉटेलच्या वरच्या मजल्यांवरून उड्या मारल्या. आग नियंत्रणात आणण्यासाठी अग्निशमन दलाची आठ वाहने तैनात करण्यात आली होती. या संयुक्त कारवाईदरम्यान, इमारतीमधून ४० हून अधिक लोकांना सुरक्षितपणे बाहेर काढून जवळच्या रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले, असे पोलिसांनी सांगितले. दाट धूरामुळे जीव गुदमरल्याने बचाव पथक आणि पोलिस पथकातील दहा जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले.

आगीत अख्खे कुटुंब उद्ध्वस्त वृत्त पान २ वर

## महत्त्वाचे

### परदेशी गुंतवणुकीचा बूस्टर; शेअर बाजार सावरला

**मुंबई :** भारतीय शेअर बाजारात बुधवारी सकाळी मोठी घसरण पाहायला मिळाली होती. मात्र दुपारनंतर बाजाराने जोरदार मुसंडी मारली. सरकार काही रोख्यांवरील कर कमी करण्याचा आणि मालकी हक्कांची मर्यादा हटवण्याचा विचार करत असल्याच्या बातम्या समोर आल्या. या वृत्तामुळे गुंतवणूकदारांचा उत्साह वाढला आणि बाजारात वेगाने सुधारणा झाली. बुधवारी सकाळी सेन्सेक्स ११५७ अंकांनी घसरून ७३,४९३ वर पोहोचला होता, तर निफ्टी ३३२ अंकांपेक्षा जास्त कोसळून २३,१५१ च्या पातळीवर आला होता. मात्र, दुपारच्या सत्रात प्रमुख निर्देशांकांनी आपले बहुतांश नुकसान भरून काढले. सेन्सेक्स ८५० अंकांनी तर निफ्टी २५४ अंकांनी सावरला. दिवसअखेर सेन्सेक्स ७४,३४६ वर आणि निफ्टी २३,४०६ वर बंद झाला. सकाळच्या सत्रात बाजार १ टक्क्यापेक्षा जास्त घसरला होता, मात्र नंतर ही घसरण केवळ ०.४ टक्क्यांवर मर्यादित राहिली. बाजारातील अस्थिरता मोजणारा इंडिया व्हीआयएक्स ६ टक्क्यांनी वाढून १६.३२ वर पोहोचला असतानाही ही सुधारणा पाहायला मिळाली.

### सोने विकल्याचे वृत्त खोटे; आरबीआयने फेटाळला दावा

**मुंबई :** सोने विक्रीच्या वृत्तांचे खंडन करताना भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) बुधवारी स्पष्ट केले की, त्यांच्याकडील सोन्याच्या प्रत्यक्ष साठ्यात कोणताही बदल झालेला नाही. हा साठा ८८०.५२ टनांवर स्थिर आहे. पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या संघर्षामुळे परकीय चलन साठ्यावर होणाऱ्या परिणामांपासून संरक्षण करण्यासाठी आरबीआयने सुमारे १२ अब्ज डॉलर्सचे सोने विकले असावे, अशा आशयाची वृत्ते समोर आल्यानंतर रिझर्व्ह बँकेने हे स्पष्टीकरण दिले आहे. ही वृत्ते चुकीचे आहेत, असे आरबीआयने एका निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे अशा बाबींमध्ये आरबीआयने वेळोवेळी प्रकाशित केलेल्या अधिकृत माहितीवरच जनतेने विश्वास ठेवावा, असा सल्लाही त्यांनी दिला आहे.

# न्यायमूर्ती शिंदे समितीला जून २०२७ पर्यंत मुदतवाढ

### मराठा आरक्षण संदर्भात कक्ष स्थापन करणार

◆ **मुंबई, ३ जून**

मराठा आरक्षणासंदर्भातील विविध प्रलंबित कामे अधिक प्रभावीपणे पूर्ण करण्यासाठी राज्य सरकारने न्यायमूर्ती शिंदे समितीला ३० जून २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. मराठा आरक्षण उपसमितीच्या मंत्रालयात झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. जलसंपदा मंत्री तथा मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी ही माहिती दिली.


बैठकीत मराठा समाजाला आरक्षणाचा लाभ मिळवून देण्यासाठी सुरू असलेल्या प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला. न्यायमूर्ती शिंदे समितीने शोधलेल्या नोंदी, समितीच्या स्थापनेनंतर वितरित करण्यात आलेली सुमारे १३ लाख कुणबी प्रमाणपत्रे तसेच समिती स्थापन होण्यापूर्वी वितरित करण्यात आलेल्या प्रमाणपत्रांची माहिती जिल्हा आणि तालुका स्तरावर संकलित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. मंत्री विखे-पाटील यांनी सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश दिले.

यावेळी मराठा आरक्षण कक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच कुणबी जात प्रमाणपत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र आणि आरक्षणासंदर्भातील इतर बाबींमध्ये नागरिकांना मदत करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये हेल्पलाईन सेवा सुरू करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. मंत्रालयातील कार्यालयातही ९३२६५६२८१५ हा हेल्पलाईन क्रमांक सुरू करण्यात आला असून नागरिकांना कार्यालयीन वेळेत त्यावर संपर्क साधता येणार आहे. (तभा वृत्तसेवा)

### राज्यसभेच्या एका जागेसाठी १८ जूनला होणार मतदान

◆ **मुंबई, ३ जून**

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी राज्यसभेच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने यासंदर्भात अधिकृत अधिसूचना जारी केली असून, राज्यसभेवरील या रिक्त जागेसाठी महाराष्ट्र विधानसभेचे निर्वाचित सदस्य मतदान करणार आहेत. या निवडणूक कार्यक्रमानुसार, उमेदवारी अर्जांची प्रक्रिया सुरू झाली आहे. ८ जून, २०२६ पर्यंत अर्ज सादर करता येतील. ९ जूनला छाननी होईल. ११ जून रोजी उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. १८ जूनला सकाळी ९.०० ते सायंकाळी ४.०० या वेळेत मतदान प्रक्रिया पार पडेल. (तभा वृत्तसेवा)



# कर्नाटकात शिवकुमार युग

### जी. परमेश्वर यांची उपमुख्यमंत्रिपदी नियुक्ती

◆ **बंगळुरू, ३ जून**

कर्नाटकमध्ये डी. के. शिवकुमार युगाची सुरुवात झाली आहे. बुधवारी झालेल्या एका सोहळ्यात डी. के. शिवकुमार यांनी राज्याचे नवीन मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यांच्या मंत्रिमंडळात जी. परमेश्वर यांचीही उपमुख्यमंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांनी शिवकुमार यांच्यानंतर उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यानंतर डी. के. शिवकुमार यांच्या नवीन मंत्रिमंडळात १३ नवीन मंत्र्यांनीही मंत्रिपदाची शपथ घेतली.

कर्नाटकमध्ये काँग्रेसची सत्ता स्थापन झाल्यानंतर तीन वर्षांनी नेतृत्व बदल करण्यात आला आहे. यापूर्वी सिद्धरामय्या यांनी तीन वर्षे मुख्यमंत्रिपद सांभाळले आहे. शपथविधीपूर्वी माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी पुष्पगुच्छ देऊन डी. के. शिवकुमार यांचे स्वागत केले. यावेळी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे आणि राहुल गांधी हेही उपस्थित होते.

**१४ कॅबिनेट मंत्र्यांचा शपथविधी**

शिवकुमार यांच्या मंत्रिमंडळात के. एच. मुनियप्पा यांनी मंत्री म्हणून शपथ घेतली. ते काँग्रेस पक्षाचा एक ज्येष्ठ दलित चेहरा आहेत. मुनियप्पा हे अनुसूचित जाती समुदायाचे आहेत. (वृत्तसंस्था)

# नाशिकनंतर पुण्यातही कॉर्पोरेट जिहाद!

- विप्रो कंपनीतील हिंदू पीडितेला न्याय द्या
- हिंदू जनजागृती समितीची मागणी

◆ **पुणे, ३ जून**

नाशिक येथील टीसीएस आणि मुंबईतील एसबीआय बँकेतील प्रकरणानंतर आता आयटी हब म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिंजवडीमधील विप्रो या कंपनीतही कॉर्पोरेट जिहाद झाल्याचा धक्कादायक प्रकार घडल्याची माहिती हिंदू जनजागृती समितीचे राज्य संघटक सुनील घनवट यांनी दिली.

पत्रकार भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी परिषदेत समितीचे जिल्हा समन्वयक पराग गोखले, अधिवक्ता विवेक भोसले, रणरागिणी शाखेच्या क्रांती पेठकर आणि संबंधित कंपनीतील पीडित महिला कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी पीडित महिलेने दिलेल्या माहितीनुसार, त्या २०१९ पासून विप्रो कंपनीत कार्यरत होत्या. मात्र, काही महिन्यांपूर्वी त्यांच्याच टीममधील एका मुस्लिम महिला सहकाऱ्याने त्यांच्या वैयक्तिक



आयुष्यात जाणीवपूर्वक हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली. तसेच पीडितेला शेख नावाच्या एका व्यक्तीशी शारीरिक संबंध प्रस्थापित करण्याचा आणि इस्लाम धर्म स्वीकारण्याचा आग्रह केला. जर त्यांनी इस्लाम स्वीकारला तर दुबईत ऐषोआरामात आणि शांततेत जीवन जगता येईल, अशी प्रलोभने आणि आमिषेही सातत्याने दाखवण्यात आल्याचे पीडित महिलेने सांगितले. याबाबत पीडितेने कंपनीच्या अंतर्गत तक्रार यंत्रणेकडे अनेक वेळा तक्रारी केल्या. तरी देखील, आरोपी कर्मचाऱ्यावर प्रभावी कारवाई झाली नाही. उलट, तक्रारदार महिलेलाच नोकरीवरून काढण्यात आल्याचा दावा हिंदू जनजागृती समितीने केला आहे.

यावेळी घनवट म्हणाले, हिंदू जनजागृती समिती आणि पीडित महिला यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या प्रकरणी तातडीने लक्ष घालून या प्रकरणाचा तपास करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी ही मागणी केलेली आहे. दरम्यान, या प्रकरणी हिंजवडी पोलिस ठाण्यात पीडितेने तक्रारही दाखल केली असून लवकरच याबाबत गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. (तभा वृत्तसेवा)

### ५० लाखांच्या भरपाईसह विप्रो प्रशासनाला कायदेशीर नोटीस

**या संस्थात्मक अन्यायाविरुद्ध आणि छळाविरुद्ध पीडित महिलेने आपल्या वकिलांमार्फत विप्रो प्रशासनाला कायदेशीर नोटीस पाठवली आहे. दबावाखाली आणि बळजबरीने लिहून घेतलेला राजीनामा हा बेकायदेशीर असून तो त्वरित रद्द करण्यात यावा, तसेच पीडितेला पूर्ण वेतनासह आणि सेवासातत्यासह पुन्हा सन्मानाने नोकरीवर रुजू करून घेण्यात यावे, अशी मुख्य मागणी या नोटीसमध्ये करण्यात आली आहे. याशिवाय, पीडितेला झालेल्या अतोनात मानसिक त्रासापोटी, सामाजिक प्रतिष्ठेच्या नुकसानीपोटी ५० लाख रुपयांची आर्थिक नुकसान भरपाई देऊन कंपनीने अधिकृत लेखी माफी मागण्याची मागणी करण्यात आली आहे.**



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### देशात ईडीच्या १५ ठिकाणी धाडी

**नवी दिल्ली :** अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) हैदराबाद प्रादेशिक कार्यालयाने बुधवारी तिरुमला तिरुपती देवस्थानम तूप भेसळ प्रकरणासंदर्भात १५ ठिकाणी धाडी टाकल्या. ईडीची अनेक पथके अहिल्यानगर, बिकानेर, डेहराडून, दिल्ली, दिंडीगुल, गुंटूर, मुंबई आणि रुरकी येथे पोहोचली. या शोधमोहिमांमध्ये पोमिल जैन, विपिन जैन, राजू राजशेखरन, राजेश मनसुखलाल चावडा, अपूर्व विनायकांत चावडा, मच्छिंद्र शांताराम लांके, अजय कुमार सुगंध, महेश कुमार रोहिरा आणि आशिष अग्रवाल यांच्या निवासस्थानांचा आणि कार्यालयांचा समावेश होता. या कारवाईत ६० लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आली. या शोधमोहिमांमध्ये ४५ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या मालमत्तांमध्ये गुन्हेगारीतून मिळालेल्या पैशांची गुंतवणूक असल्याचेही उघड झाले आहे. तपास यंत्रणेने आरोपी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या नावावर नोंदणीकृत असलेल्या अनेक स्थावर मालमत्तांचा तपशीलही मिळवला आहे. या शोधमोहिमांमध्ये दिंडीगुल येथील एआर डेअरी फूड प्रायव्हेट लिमिटेड, अहिल्यानगर येथील मालगंगा मिल्क अँड अ‍ॅग्रो प्रॉडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड आणि रुरकी येथील भोले बाबा ऑरगॅनिक डेअरी मिल्क प्रायव्हेट लिमिटेड यांच्या डेअरी प्लांट्सचाही समावेश होता.

### खड्ड्यात सात जण बुडाले, पाच मुलांचा मृत्यू

**मधुबनी :** बिहारमधील मधुबनी येथे एक भीषण अपघात घडला. खेळता-खेळता इतकी गंभीर घटना घडू शकते, याची कोणी कल्पनाही केली नसेल. जेसीबीने खोदलेल्या खड्ड्यात सात मुले बुडाल्याने गावात खळबळ उडाली आहे. एकाच कुटुंबातील पाच मुलांचा मृत्यू झाला असून दोघांना वाचवण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार बुधवारी दुपारी सात मुले जेसीबीने खोदलेल्या खड्ड्यात आंघोळीसाठी गेली होती. ही घटना बिस्फी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील केरवार गावात घडली. या घटनेमुळे संपूर्ण गावात खळबळ उडाली असून कुटुंबीयांचे सांत्वन करणेही अशक्य झाले आहे. एकाच वेळी पाच मुले बुडल्याने बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. सध्या संपूर्ण गाव शोकसागरात बुडाले असून प्रशासन या प्रकरणाचा तपास करत आहे.

### पाकिस्तानच्या लष्करी कारवाईत १७ दहशतवादी ठार

**बलुचिस्तान :** पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांतात पाकिस्तानी लष्कराने राबवलेल्या मोठ्या दहशतवादविरोधी कारवाईत १७ दहशतवाद्यांचा खात्मा केला. इंटर-सर्व्हिसेस पब्लिक रिलेशन्स या लष्कराच्या माध्यम शाखेने दिलेल्या माहितीनुसार, ही कारवाई गुप्तचर यंत्रणांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे करण्यात आली. मस्तुंग, नुश्की, केच आणि खुजदार या जिल्ह्यांमध्ये एकाच वेळी राबविण्यात आलेल्या या मोहिमेत लष्कराने



दहशतवाद्यांच्या लपण्याच्या ठिकाणांना लक्ष्य केले. या कारवाईदरम्यान अनेक दहशतवादी जखमी झाल्याचेही सांगण्यात आले. काही जण घटनास्थळावरून पळून जाण्यात यशस्वी झाल्याचे समजते. त्यांचा शोध घेण्यासाठी परिसरात अतिरिक्त शोधमोहीम सुरू आहे. आयएसपीआरच्या निवेदनानुसार, ठार झालेल्या दहशतवाद्यांकडून तसेच त्यांच्या तळांवरून मोठ्या प्रमाणात शस्त्रे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला. हे दहशतवादी बलुचिस्तानमधील विविध दहशतवादी कारवायांमध्ये सक्रिय असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रदेशात सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली असून पुढील संभाव्य धोके लक्षात घेता लष्कर आणि सुरक्षा दलांकडून सतत देखरेख ठेवली जात आहे.

# अभिषेकची उच्च न्यायालयात धाव

**● बनावट सह्या प्रकरण ● याचिका दाखल करण्यास परवानगी**

◆ **कोलकाता, ३ जून**

तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांनी बुधवारी बनावट सह्या प्रकरणात संभाव्य सीआयडी कारवाईविरोधात कलकत्ता उच्च न्यायालयात धाव घेतली. तृणमूल आमदारांच्या कथित बनावट सह्यांच्या राज्य सीआयडी तपासासंदर्भात कोणत्याही दंडात्मक कारवाईपासून संरक्षण मिळविण्यासाठी अभिषेक बॅनर्जी यांना याचिका दाखल करण्यास कलकत्ता उच्च न्यायालयाने परवानगी दिली.

विधानसभा सचिवालयात दोन आमदारांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या आधारे हा तपास सुरू आहे. बालीगंजचे आमदार शोभनदेव



चट्टोपाध्याय यांची विरोधी पक्षनेतेपदी नियुक्ती करणाऱ्या तृणमूलच्या ठरावावर आपल्या सह्या बनावट करण्यात आल्याचा आरोप आमदारांनी केला आहे. दरम्यान, निलंबित आमदार ऋतब्रता बॅनर्जी आणि संदिपान साहा यांच्या तक्रारीच्या आधारे विधानसभा सचिवालयाने कोलकाता पोलिसांकडे एफआयआर दाखल केला. त्यानंतर राज्याच्या गृह सचिवांनी तपास सीआयडीकडे हस्तांतरित केला.

**एफआयआरला आव्हान देणारी याचिका**

अभिषेक बॅनर्जी यांच्या वकिलांनी केलेल्या तोंडी विनंतीवरून न्यायमूर्ती अपूर्बा सिन्हा राय यांच्या अवकाश कालीन न्यायासनाने एफआयआरला आव्हान देणारी आणि कोणत्याही दंडात्मक कारवाईपासून अंतरिम संरक्षण मागणारी याचिका दाखल करण्यास परवानगी दिली. खासदार बॅनर्जी यांच्या वकिलांनी सांगितले की, या प्रकरणाची सुनावणी शुक्रवारी होण्याची शक्यता आहे. ◂(वृत्तसंस्था)

### शिक्षक भरती घोटाळा प्रकरणी अभिषेकला ईडीचा समन्स

अंमलबजावणी संचालनालयाचे (ईडी) एक पथक बुधवारी तृणमूलचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांच्या कोलकाता येथील निवासस्थानी दाखल झाले आहे. प्राथमिक शिक्षक भरती घोटाळ्याशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात ईडीच्या अधिकाऱ्यांनी त्यांना समन्स बजावले आहे. अधिकाऱ्यांनी सांगितले की, अभिषेक बॅनर्जींना १५ जूनला तपासात सहभागी होण्यासाठी बोलावण्यात आले आहे. त्या दिवशी ते तपास यंत्रणेसमोर हजर होतील आणि प्रश्नांची उत्तरे देतील. हे संपूर्ण प्रकरण प्राथमिक शिक्षकांच्या भरतीमधील कथित अनियमितता आणि बेकायदेशीर व्यवहारांशी संबंधित आहे.





केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते बुधवारी गॅसोलीन आणि इथेनॉलवर चालणाऱ्या बाईकचे अनावरण करण्यात आले. ३०० सीसीची ही भारतातील पहिली फ्लेक्स फ्युएल बाईक आहे. यावेळी केंद्रीय मंत्री हरदीप पुरी उपस्थित होते

# भंडाऱ्याची डॉ. नमीरा 'नीट एमडीएस'मध्ये देशात अव्वल

◆ **भंडारा, ३ जून**

दंत वैद्यकीय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी घेतल्या जाणाऱ्या राष्ट्रीय पातळीच्या सामायिक प्रवेश परीक्षा म्हणजेच 'नीट एमडीएस.' या परीक्षेत भंडारा येथील डॉ. नमीरा मोहम्मद गालीफ सिद्दिकी हिने देशात प्रथम क्रमांक पटकाविला असून ऑल इंडिया रँक १ मिळविला आहे. त्यामुळे भंडारा जिल्ह्याचा देशपातळीवर नावलौकिक झाला आहे.

भंडारा येथील भारतीय जनता पार्टीचे जुने कार्यकर्ते आबिद सिद्दिकी यांची ती पुतणी असून सिद्दिकी घराण्यातील पाचवी



डॉक्टर आहे. आबिद सिद्दीकी यांचे दोन सुपुत्रसुद्धा डॉक्टर आहेत.

डॉ. नमीरा ही त्यांच्या लहान भावाची मुलगी आहे. तिने नागपूर येथील एका खाजगी महाविद्यालयातून पदवी अभ्यासक्रम पूर्ण केला. याच शाखेतील पदव्युत्तर पदवी म्हणजेच एमडीएस अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन इन मेडिकलद्वारा घेण्यात आलेल्या राष्ट्रीय पातळीच्या सामायिक प्रवेश पूर्व परीक्षेत म्हणजेच 'नीट'मध्ये तिने राष्ट्रीय स्तरावर पहिला क्रमांक मिळविला असून ती ९६० पैकी ८०२ गुण मिळवीत देशात अव्वल ठरली आहे. या यशामुळे ती आता दंत वैद्यकीय क्षेत्रातील दंतशल्य चिकित्सा या विषयात पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेणार आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

### दहशतवादी नेटवर्कशी संबंधित संशयित ताब्यात

◆ **मुंबई, ३ जून**

मुंबईत दहशतवादी कारवायांशी संबंधित असल्याचा संशय असलेल्या एकाला महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथक (एटीएस) आणि दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने संयुक्त कारवाईत अटक केली. हुजैफा असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

तो पाकिस्तानस्थित एका कथित हँडलरच्या संपर्कात असल्याचा संशय तपास यंत्रणांनी आहे. तपास अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, या प्रकरणाचा संबंध एका व्यापक संशयित दहशतवादी नेटवर्कशी असल्याची शक्यता तपासली जात आहे. या नेटवर्कमधील इतर व्यक्तींशी हुजैफाचे संबंध असल्याचा संशय असून त्याच्याकडून महत्त्वाची माहिती मिळू शकते, असा तपास यंत्रणांचा अंदाज आहे. ◂(वृत्तसंस्था)

# नवीन जिंदाल, पारेख यांना समन्स

### कोळसा घोटाळा प्रकरण

◆ **नवी दिल्ली, ३ जून**

दिल्लीतील एका विशेष न्यायालयाने सोमवारी उद्योगपती नवीन जिंदाल, माजी कोळसा सचिव पी. सी. पारेख आणि इतर आरोपींविरुद्ध दाखल केलेल्या आरोपपत्राची दखल घेत त्यांना समन्स बजावले. भारतीय दंड संहिता आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हेगारी कट आणि फसवणुकीशी संबंधित आरोपांवर सुनावणी सुरू करण्याचा निर्णय न्यायालयाने घेतला आहे.

विशेष न्यायाधीश सुनेना शर्मा यांनी नवीन जिंदाल, जिंदाल स्टील अँड पॉवर लिमिटेड, पी. सी. पारेख, राकेश कुमार जिंदाल, राम किशोर, एस. के. अग्रवाल आणि जिंदाल स्ट्रिप्स लिमिटेड (आता नलवा सन्स इन्व्हेस्टमेंट्स लिमिटेड) यांना १७ जुलैला न्यायालयात हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत.

**नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप**

न्यायालयाने आपल्या आदेशात म्हटले आहे की, कोळसा खाण वाटप प्रकरणांशी संबंधित हे सर्वात तपशीलवार आणि विस्तृत आरोपपत्रांपैकी एक आहे. या प्रकरणाचा तपास केंद्रीय अन्वेषण ब्युरो करत असून कोळसा खाणपट्टे वाटप आणि खाणपट्ट्यांसंबंधीच्या नियमांचे उल्लंघन केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. ◂(वृत्तसंस्था)

### काय आहे सीबीआयचा आरोप?

सीबीआयच्या म्हणण्यानुसार, छत्तीसगडमधील गारे पाल्मा/१ हा कोळसा खाणपट्टा १९९६ मध्ये जिंदाल स्ट्रिप्स लिमिटेडला वार्षिक ०.६ दशलक्ष टन क्षमतेच्या स्पंज आयर्न प्रकल्पासाठी वाटप करण्यात आला होता. या संस्थेचा आरोप आहे की, या खाणपट्ट्यातील कोळशाचा साठा विहित गरजेपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त असूनही नियम डावलून ते वाटप करण्यात आले.

# आगीत अख्खे कुटुंब उद्ध्वस्त

**आई, मुलगी, मामा, मावशीसह आठ सदस्यांचा मृत्यू**

◆ **नवी दिल्ली, ३ जून**

मालवीय नगर येथील लेमन ग्रीन रेस्टॉरंटमध्ये बुधवारी सकाळी लागलेल्या आगीत गुरुग्रामच्या सेक्टर ४६ मध्ये राहणारे चार्टर्ड अकाउंटंट विवेक अग्रवाल आणि त्यांच्या कुटुंबातील आठ सदस्यांचा मृत्यू झाला. त्यांचे कुटुंब एका गेस्ट हाऊसमध्ये थांबले होते आणि रात्रीच्या जेवणासाठी लेमन ग्रीनमध्ये गेले होते. मॅक्स साकेत रुग्णालयात दाखल असलेल्या वडिलांची काळजी घेण्यासाठी विवेक पत्नी आणि दोन मुलींसह दिल्लीला आले होते. विवेकचे सासरे प्रेम बन्सल यांनी या घटनेची माहिती दिली.

प्रेम बन्सल यांनी पुढे सांगितले की, विवेकची मोठी मुलगी जिविशाचाही या अपघातात मृत्यू झाला. जिविशा बंगळूरहून दिल्लीला आली होती आणि ती अभियांत्रिकीची विद्यार्थिनी होती. गुरुवारी तिचा एक पेपर होता. गेस्ट हाऊसमध्ये कुटुंबातील २०-३० सदस्य राहत होते. या अपघातात विवेकची आई, मामा, काकू आणि मामा यांचाही मृत्यू झाला. त्याचे



मामा राजस्थानमधील किशनगड येथे दगडांचे व्यापारी होते.

विवेक अग्रवालचे वडील आजारी आहेत. कुटुंबीय त्यांना भेटायला आले होते. वडिलांच्या आजारपणामुळे विवेक अग्रवाल दिल्लीला आला होता. त्यांना मॅक्स साकेत रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. विवेक त्यांची काळजी घेण्यासाठी पत्नी आणि दोन मुलींसोबत तिथेच राहिला होता. घटनेच्या दिवशी सकाळी त्याचे मामा आणि काकूही त्यांना भेटायला आले होते.

दिल्ली सरकारच्या बेड अँड ब्रेकफास्ट धोरणांतर्गत हॉटेलला केवळ सहा खोल्यांची परवानगी होती, पण प्रत्यक्षात २५ खोल्या कार्यरत होत्या. तळघरातही खोल्या बांधण्यात आल्या होत्या. सहा ते सात वर्षांपूर्वीपर्यंत ही इमारत केवळ तळमजला अधिक एक मजली होती. अधिकाऱ्यांना माहिती न देता नंतर अतिरिक्त मजले बांधण्यात आले. ही इमारत १५ मीटरपेक्षा जास्त उंच होती. यामुळे अग्निसुरक्षा मंजुरी अनिवार्य होती. फायर एनओसीच्या बाबतीत, आम्हाला इमारत प्राधिकरण किंवा परवाना एजन्सी यांपैकी कोणाकडूनही कोणताही संदर्भ मिळाला नव्हता, असे उपमुख्य अग्निशमन अधिकारी ए. के. मलिक यांनी सांगितले. इमारतीच्या रचनेमुळे बाहेर पडणे जवळजवळ अशक्य होते, असेही ते म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

### राष्ट्रपतींसह पंतप्रधानांनी व्यक्त केला शोक

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक मान्यवरांनी या घटनेबद्दल शोक व्यक्त केला. दिल्लीतील मालवीय नगर भागात घडलेल्या आगीच्या घटनेत जीवितहानी झाल्याची बातमी अत्यंत हृदयद्रावक आहे, असे मुर्मू यांनी एक्स या समाजमाध्यमावर हिंदी भाषेत केलेल्या एका पोस्टमध्ये म्हटले आहे. पंतप्रधानांनी पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या वारसांना प्रत्येकी दोन लाख रुपये आणि जखमींना ५० हजार रुपयांची सानुग्रह मदत जाहीर केली.

### दंडाधिकारी चौकशीचा आदेश

मालवीय नगरमधील भीषण आगीच्या दुर्घटनेने प्रशासन हादरले आहे. घटनेनंतर लगेचच नायब राज्यपाल तरनजीत सिंग संधू आणि दिल्लीचे गृहमंत्री आशिष सूद यांनी तातडीची बैठक बोलावून भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी शून्य-सहिष्णुता धोरणाची घोषणा केली. प्रशासनाने केवळ या घटनेची दंडाधिकारी चौकशी करण्याचे आदेश दिले नाहीत, तर गुरुवार, ४ जूनपासून दिल्लीभर महिनाभर चालणारी तीव्र अंमलबजावणी मोहीम सुरू करण्याचाही निर्णय घेतला आहे. या मोहिमेअंतर्गत दिल्लीतील सर्व हॉटेल्स, लॉजेस, गेस्ट हाऊस, नर्सिंग होम्स, कोचिंग संस्था आणि रेस्टॉरंट्समधील अग्निसुरक्षा मानकांची तपासणी केली जाईल. तसेच बेकायदेशीर बांधकाम आढळल्यास संबंधितांना शिक्षा केली जाईल.

### ब्रिटनमध्ये हेलिकॉप्टर कोसळले, ३ जवान ठार

◆ **वॉशिंग्टन, ३ जून**

ब्रिटनमधील डेव्हन येथे प्रशिक्षण उड्डाणादरम्यान रॉयल नेव्हीचे एक हेलिकॉप्टर कोसळले. या अपघातात रॉयल नेव्हीचे तीन जवान ठार झाले. ब्रिटिश संरक्षण मंत्रालयाने बुधवारी याला अधिकृतपणे दुजोरा दिला. या घटनेनंतर, ब्रिटिश लष्कर आणि प्रशासनाने बचाव आणि तपास मोहीम सुरू केली. संरक्षण मंत्रालयाने सांगितले की, डेव्हनमधील सॉर्टनजवळ एका प्रशिक्षण सरावादरम्यान हा अपघात झाला. प्राथमिक माहितीनुसार, कोसळलेले हेलिकॉप्टर हे मर्लिन हेलिकॉप्टर होते. जे लष्करी कारवाया आणि प्रशिक्षणासाठी वापरले जाते. हा अपघात एका नियमित प्रशिक्षण उड्डाणादरम्यान झाला. हेलिकॉप्टरवरील नियंत्रण अचानक सुटले आणि ते एका शेतात कोसळले. प्रत्यक्षदर्शींच्या दाव्यानुसार, अपघातापूर्वी हेलिकॉप्टरच्या इंजिनचा आवाज अचानक थांबला होता. काही सेकंदांनंतर, आकाशात एक तेजस्वी लाल प्रकाशझोत दिसला आणि त्यानंतर एक मोठा स्फोट झाला. ◂(वृत्तसंस्था)

# विमान वाहतूक क्षेत्राला दिलासा

### सरकार देणार १०,००० कोटींचा निधी

◆ **नवी दिल्ली, ३ जून**

इराण आणि अमेरिकेत सुरू असलेल्या युद्धाचा परिणाम तेलाशी संबंधित प्रत्येक क्षेत्रावर होत आहे. कच्च्या तेलाच्या किमती सातत्याने वाढत आहेत. त्यामुळे पेट्रोल, डिझेल, गॅस आणि विमान इंधनाच्या किमतीही वाढत आहेत. याचा परिणाम म्हणून विमान वाहतूक उद्योगापासून ते प्रवाशांपर्यंत सर्वांनाच महागाई आणि प्रवासात गैरसोय सहन करावी लागत आहे. या पृष्ठभूमीवर सरकारने आता विमान वाहतूक क्षेत्राला काहीसा दिलासा देण्यासाठी पावले उचलली आहे.

सूत्रानुसार, सरकार विमान वाहतूक क्षेत्राला पाठिंबा देण्यासाठी १०,००० कोटी रुपयांचा निधी देण्याच्या तयारीत आहे. अद्याप कोणतीही माहिती जाहीर झाली नसली, तरी सरकार लवकरच याची घोषणा करू शकते, असे वृत्त आहे. या निर्णयामुळे विमान कंपन्यांचा काही भार कमी होईल, असे बोलले जात आहे. मध्यपूर्वेतील तणावामुळे इंधनाच्या किमती वाढत असल्याने सरकारने हा निर्णय घेतला आहे. ◂(वृत्तसंस्था)

### गत महिन्यात एटीएफच्या दरात ८.५६ टक्के वाढ

गत महिन्यात एटीएफ (एव्हिएशन टर्बाईन फ्युएल) च्या दरात ८.५६ टक्के वाढ करण्यात आली होती. यानंतर एटीएफचा दर ९६,६३८ रुपये प्रति किलोलिटरवरून १,०४,९२७ रुपये प्रति किलोलिटरवर पोहोचला आहे. विशेष म्हणजे, भारत आपल्या तेलाच्या गरजेचा मोठा भाग परदेशातून आयात करतो. त्यामुळे मध्य पूर्वेतील वाढत्या तणावामुळे तेलाच्या किमती वाढतात. ज्याचा परिणाम विमान कंपन्या आणि सरकारी तेल कंपन्या या दोन्हींवर होतो.





# रजनीश जैन यांच्या 'क्वाएट एक्सलन्स'चे प्रकाशन

◆ **नवी दिल्ली, ३ जून**

रिलायन्स जिओ इन्फोकॉम लिमिटेडचे अध्यक्ष (प्रेसिडेंट) आणि मुख्य वित्तीय अधिकारी रजनीश जैन यांच्या 'क्वाएट एक्सलन्स' या पुस्तकाचे प्रकाशन रविवारी नवी दिल्ली येथील इंडिया इंटरनॅशनल सेंटर येथे आयोजित विशेष कार्यक्रमात करण्यात आले. या कार्यक्रमाला उद्योग, शिक्षण, प्रशासन आणि सार्वजनिक जीवनातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

ओम बुक्स इंटरनॅशनलतर्फे प्रकाशित करण्यात आलेले हे पुस्तक जीवन, नेतृत्व, श्रद्धा आणि दैनंदिन अनुभवांमधून मिळालेल्या ५२ अर्थपूर्ण शिकवणी, विचार आणि अनुभवांचा संग्रह आहे. जीवनातील आणि व्यावसायिक यशातील मोठ्या निर्णयांइतकाच दैनंदिन सवयी, मानवी संवेदनशीलता आणि मूल्यांचाही महत्त्वाचा वाटा असतो, यावर या पुस्तकात विशेष भर देण्यात आला आहे.

याप्रसंगी रजनीश जैन म्हणाले, आपला समाज आणि देश नेहमीच सखोल सामूहिक जाणीवेने प्रेरित राहिला आहे. हीच सामूहिक जाणीव आपल्याला महत्त्वाकांक्षा आणि नम्रता, कृती आणि चिंतन तसेच यश आणि जीवनाचा खरा अर्थ यांच्यात समतोल राखण्यास मदत करते. भारताच्या या व्यापक सामूहिक जाणीवेचा एक छोटासा भाग जरी हे पुस्तक बनू शकले, तरी माझा हा प्रयत्न खऱ्या अर्थाने सार्थकी लागल्याचे मला वाटेल. ◂(वृत्तसंस्था)

# स्कूल बसच्या दरात १५ टक्के वाढ

**● नव्या शैक्षणिक वर्षात पालकांच्या खिशाला कात्री ● 'स्कूल बस ओनर्स असोसिएशन महाराष्ट्र'चा निर्णय**

◆ **मुंबई, ३ जून**

नवीन शैक्षणिक वर्षाच्या स्वागताची तयारी करत असलेल्या पालकांसाठी एक अत्यंत चिंताजनक आणि खिशाला मोठी कात्री लावणारी बातमी समोर आली आहे. जून २०२६ पासून सुरू होणाऱ्या नव्या शैक्षणिक सत्रात मुलांच्या शाळा प्रवासाचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. 'स्कूल बस ओनर्स असोसिएशन महाराष्ट्र'ने राज्यातील शालेय बसच्या शुल्कात तब्बल १५ टक्के वाढ करण्याची अधिकृत घोषणा केली असून, यामुळे पालकांचे बजेट कोलमडणार आहे.

ही दरवाढ केवळ इंधनाच्या म्हणजेच डिझेलच्या वाढत्या किमतींमुळे झालेली नाही, तर त्यामागे अनेक आर्थिक आणि तांत्रिक गणिते असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. गेल्या काही महिन्यांत बसवरील चालक आणि क्लिनर यांच्या वेतनात झालेली वाढ, गाड्यांच्या देखभालीचा वाढलेला खर्च आणि सुट्या भागांच्या किमती गगनाला भिडल्याने बस चालवणे कठीण झाले आहे. याशिवाय वार्षिक विमा हप्ते, टोल टॅक्स, परवाना शुल्क आणि आरटीओच्या ई-चलन दंडाचा वाढता बोजा यामुळे ही १५ टक्के वाढ करणे अपरिहार्य बनले आहे.



स्कूल बस ओनर्स असोसिएशनने दिलेल्या माहितीनुसार, ही शुल्कवाढ टाळण्यासाठी त्यांनी राज्य सरकार, परिवहन मंत्रालय आणि संबंधित विभागांकडे अनेकदा धाव घेतली होती. पालकांवर हा बोजा पडू नये म्हणून बस चालकांना करांमध्ये किंवा इतर बाबींमध्ये काही सवलती द्याव्यात, अशी मागणी करणारी निवेदनेही देण्यात आली होती. मात्र, वारंवार पाठपुरावा करूनही सरकारकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद किंवा मदत मिळाली नाही. अखेर कोणताही पर्याय शिल्लक न राहिल्याने हा आर्थिक भार पालकांवर टाकण्याची वेळ आल्याचे संघटनेने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटले आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

### सुरक्षिततेसाठी पालकांना सहकार्याचे आवाहन

इतर सर्व वाहतूक सेवांचे दर वाढत असताना शालेय बस सेवा आणि विद्यार्थ्यांची सुरक्षितता टिकवून ठेवण्यासाठी हे पाऊल उचलणे गरजेचे होते, असे असोसिएशनने नमूद केले आहे. जुन्या दरांमध्ये नियमांचे पालन करून सुरक्षित सेवा देणे आता शक्य राहिलेले नाही. त्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती समजून घेऊन शाळांनी आणि पालकांनी सहकार्य करावे, असे आवाहन संघटनेने केले आहे. तसेच, सरकारने अजूनही या प्रकरणात मध्यस्थी करून काही ठोस उपाययोजना कराव्यात, जेणेकरून सर्वसामान्यांना दिलासा मिळेल, अशी मागणीही पुन्हा त्यांनी केली आहे.



दोन्ही शिवसेना एकत्र याव्या असे मत व्यक्त करत असाल तर आम्ही मातोश्रीवर बसलो आहोत. तुम्हाला पश्चात्ताप झाला असेल तर तो व्यक्त करण्याची जागा मातोश्री हे निवासस्थान आहे. ज्या पद्धतीने ते बाहेर पडले त्यासाठी पश्चात्ताप तर करावा लागेल ना?
**- संजय राऊत**, खासदार


# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

गुरुवार, ४ जून २०२६ ३




कॉक्रोच जनता पार्टीबाबत मी हल्लीच ऐकले. मला त्याबद्दल फारसे काही वाटत नाही. मला जर काही वाटलंच, सिस्टिमच्या विरोधात उभे राहायचे आहे, तर माझ्याकडे माझा प्लॅटफॉर्म आहे. यामुळे अशा काहीतरी वेगळ्या पार्टीमध्ये मी सहभागी होणार नाही.
**- अंकिता वालावलकर**, सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर

# राजेंद्र हजारे, आशा हजारे, शिवानंद पाटील यांना नोटीस?

## ११८ हून अधिक झाडांची बेकायदेशीर तोड; महापालिका आयुक्तांची घटनास्थळी पाहणी





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

शहरातील एका खासगी जागेवर तब्बल ११८ पेक्षा अधिक झाडांची बेकायदेशीरपणे तोड करण्यात आल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन उंबासे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यावेळी उपमहापौर देवकर यांच्यासह महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते. याप्रकरणी कारवाईची प्रक्रिया सुरु झाली असून उद्योजक राजेंद्र हजारे, आशा हजारे, शिवानंद पाटील, अंकित पाटील यांना नोटीस बजावण्यात आल्याची माहिती मनपा प्रशासनाच्या सूत्रांनी दिली.

संबंधित जागा खासगी मालकीची असली तरी वृक्षतोडीसाठी आवश्यक परवानगी घेण्यात आलेली नसल्याचे प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले आहे. २०१९च्या झाड संवर्धन आणि संरक्षण नियमांनुसार शहर अथवा ग्रामीण भागात कोणतेही झाड तोडण्यासाठी सक्षम प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे. महापालिकेला प्राप्त झालेल्या सातबारा उताऱ्यानुसार संबंधित जागेचे मालक म्हणून अंकित शिवानंद पाटील, शिवानंद पाटील, आशा हजारे आणि राजेंद्र हजारे यांची नावे समोर आली आहेत. या चौघांविरुद्ध कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून त्यांना नोटीस बजावण्यात आल्याची माहिती प्रशासनाने दिली.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले की, झाडतोड प्रकरणात दोषींवर दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. संबंधितांनी दंडाची रक्कम भरली नाही तर त्यांच्या मालमत्तेवर बोजा चढवून कायदेशीर मार्गाने वसुली करण्यात येईल. महापालिका अधिनियमांतर्गत उपलब्ध अधिकारांचा वापर करून कठोर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या घटनेमुळे पर्यावरणप्रेमी आणि नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

### पोलिसात गुन्हा दाखल का केला जात नाही?

शहरात महापालिका हद्दीत प्रथितयश लोकांनी मोठी असलेली जवळपास ११८ पेक्षा अधीक झाडे तोडल्याचे उघडकीस आले आहे. प्रसारमाध्यमांच्या दबावामुळे घटना उघडकीस आल्यानंतरच्या काही दिवसांनी कारवाईची प्रक्रिया सुरु झाली आहे. मोठ्या उद्योजकासह काही नावे समोर आली असतानाही महापालिका प्रशासन याप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल का करत नाही, याप्रकरणातील लोक राजकीय दिग्गज असल्यामुळे महापालका आयुक्तांवर कोणाचा दबाव आहे का? अशी चर्चा आता नागरिकांमधून सुरु झाली आहे. याप्रकरणी महापालिका प्रशासनाने तात्काळ संबंधितांवर गुन्हा दाखल करावा, अन्यथा आंदोलन उभारण्याचा इशाराही काही पर्यावरणप्रेमी संघटनांनी दिला आहे. महापालिकेच्या उपमहापौर या पर्यावरणप्रेमी असतानाही याप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल होत नसल्याबाबत उलटसुलट चर्चा सुरु आहे. दरम्यान पूर्ण तपासाच्या कार्यवाहीनंतर याप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे पालिका प्रशासनाचे म्हणणे असल्याचे कळते.

# इराणचा अमेरिकन तळांवर हल्ला

● टर्मिनल १ मध्ये विध्वंस, विमानसेवा ठप्प ● होर्मुझमधील इराणी बेटाला केले लक्ष्य

**◆ तेहरान, ३ जून**

अमेरिका आणि इराणमधील तणाव बुधवारी पुन्हा वाढला आहे. कुवेत आणि बहरीनमधील अमेरिकन नौदलाच्या पाचव्या ताफ्याच्या मुख्यालयावर, लष्करी हवाई तळांवर आणि हेलिकॉप्टरवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोनने हल्ले केले असल्याचा दावा इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड्स कॉर्प्सने केला. तर, अमेरिकन सेंट्रल कमांडने एक्सवर पोस्ट करत इराणने प्रादेशिक देशांच्या दिशेने अनेक बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली. मात्र, सर्व हल्ले अयशस्वी ठरले. कुवेतवर डागलेली दोन क्षेपणास्त्रे एकतर लक्ष्यापासून भरकटली किंवा वाटेतच नष्ट करण्यात आली, असे अमेरिकेने म्हटले आहे.



पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पृष्ठभूमीवर, कुवेत आंतरराष्ट्रीय विमानतळावर मोठा हल्ला झाला आहे. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, टर्मिनल १ ला लक्ष्य करून क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले करण्यात आले. यात अनेक जण जखमी झाले आणि विमानतळाच्या इमारतीचे मोठे नुकसान झाले. या घटनेनंतर, सर्व विमानसेवा तात्काळ प्रभावाने थांबवण्यात आल्या आहेत. हल्ल्यानंतर विमानतळाची आपत्कालीन योजना कार्यान्वित करण्यात आली आहे, असे कुवेतच्या नागरी विमान वाहतूक सार्वजनिक प्राधिकरणाने सांगितले. प्रवासी, कर्मचारी आणि विमानतळ सुविधांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सर्व स्थापित नियमावलींची अंमलबजावणी केली जात असल्याचे नागरी विमान वाहतूक सार्वजनिक प्राधिकरणाचे प्रवक्ते अब्दुल्ला अल-राजही म्हणाले.

कुवेतच्या संरक्षण मंत्रालयानेही या हल्ल्याची पुष्टी केली. मंत्रालयाचे प्रवक्ते ब्रिगेडियर जनरल सौद अब्दुलअजीज अल-ओतैबी यांनी या हल्ल्याचे वर्णन इराणची गुन्हेगारी आक्रमकता असे केले. त्यांच्या मते, या हल्ल्यामुळे विमानतळ संकुलाचे मोठे नुकसान झाले असून अनेक जण जखमी झाले आहेत. जखमींना तात्काळ वैद्यकीय मदत पुरवण्यात आली. टर्मिनल १ वरील ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर हवाई वाहतूक पूर्णपणे स्थगित करण्यात आली आहे. अनेक विमाने जवळच्या इतर विमानतळांवर वळवण्यात आली आहेत. तांत्रिक आणि सुरक्षा यंत्रणा नुकसानीचा आढावा घेत आहेत, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. दरम्यान, अमेरिकेच्या लष्कराने इराणने आखाती प्रदेशात केलेले अनेक क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले हाणून पाडल्याचा दावा केला आहे. *(वृत्तसंस्था)*

### इराणी तेलवाहू जहाजांवर हल्ले

**अमेरिकेने इराणच्या केशम बेट, गोरुक आणि होर्मुजजवळच्या तेलवाहू जहाजांवर हल्ले केले. इराणने प्रत्युत्तरादाखल एका जहाजाला क्षेपणास्त्राने लक्ष्य केले. अमेरिकेने होर्मुझच्या सामुद्रधुनीतील इराणच्या केशम बेटावरील एका कम्युनिकेशन टॉवरवर हल्ला केला. अमेरिकन सैन्याने याला आत्मसंरक्षणार्थ केलेला हल्ला म्हटले आहे.**

### इराणने कुवेत आणि बहरीनला धरले जबाबदार

**इराणने अलीकडील अमेरिकी हल्लांचा निषेध केला असून, हे हल्ले शस्त्रसंधी आणि आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करणारे असल्याचे म्हटले आहे. या हल्ल्यांसाठी कुवेत आणि बहरीन थेट आणि स्पष्टपणे जबाबदार आहेत. कारण इराणविरुद्धच्या अमेरिकी कारवायांमध्ये त्यांच्या भूभागाचा आणि लष्करी तळांचा वापर करण्यात आला होता, असे इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे.**

# अमेरिकेत एच-१बी व्हिसासाठी दोन लाखांहून अधिक अर्ज

**◆ वॉशिंग्टन, ३ जून**

या वर्षी तब्बल दोन लाखांहून अधिक अमेरिकेत काम करण्यासाठी एच-१बी व्हिसा अर्जदारांनी प्रीमियम प्रक्रिया निवडत एक लाख डॉलर्स (सुमारे ८० लाख रुपये) शुल्क भरल्याची माहिती अमेरिकेच्या गृह सुरक्षा विभागाने दिली.

या निर्णयामुळे एच-१बी व्हिसा प्रक्रियेतील गती आणि खर्च यावर मोठी चर्चा सुरू झाली आहे. आर्थिक वर्ष २०२६ साठी सुमारे दोन लाख ८६ हजार एच-१बी अर्ज प्राप्त झाले आहेत. यापैकी मोठ्या संख्येने अर्जदारांनी अतिरिक्त शुल्क भरून जलद प्रक्रियेचा पर्याय स्वीकारला आहे, असे अमेरिकेच्या सिनेटमधील विनियोग उपसमितीसमोर विभागाचे सचिव मार्कवेन मुलीन यांनी सांगितले. मुलीन यांच्या माहितीनुसार, प्रीमियम शुल्क भरलेल्या अर्जांवर साधारण १५ दिवसांत प्रक्रिया केली जाते, तर सामान्य अर्जांना ७.५ महिन्यांपर्यंत प्रतीक्षा करावी लागते. यामुळे जलद निर्णयासाठी मोठ्या प्रमाणावर अर्जदारांनी हा महागडा पर्याय निवडल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, या मुद्द्यावर सिनेटमध्ये ग्रामीण भागातील डॉक्टर आणि तज्ज्ञांच्या कमतरतेबाबतही चर्चा झाली. सिनेट सदस्या सुसान कॉलिन्स यांनी काही ग्रामीण रुग्णालयांना विदेशी डॉक्टर आणण्यासाठी हा मोठा खर्च करावा लागत असल्याचे सांगितले आणि अशा प्रकरणांमध्ये सवलतीचा विचार करण्याची मागणी केली.

अधिकाऱ्यांनी यावर भविष्यात परिस्थितीनुसार उपाययोजना केल्या जातील असे आश्वासन दिले. तसेच इतर सिनेट सदस्यांनीही ग्रामीण भागातील शिक्षक आणि आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांच्या कमतरतेचा मुद्दा उपस्थित करत एच-१बी धोरणावर पुनर्विचार करण्याची गरज अधोरेखित केली आहे. *(वृत्तसंस्था)*

# एपीएस भरतीत सर्व उमेदवार अपात्र

**◆ लखनौ, ३ जून**

उत्तर प्रदेश लोकसेवा आयोगमार्फत घेण्यात आलेल्या अप्पर प्रायव्हेट सेक्रेटरी (एपीएस) परीक्षा-२०२३ चा निकाल धक्कादायक ठरला आहे. या परीक्षेसाठी बसलेल्या ४,२४० उमेदवारांपैकी एकही उमेदवार अंतिम टप्प्यात पात्र ठरू शकला नाही. यामुळे ३३१ पदे रिक्त ठेवण्यात आली आहेत.

या परीक्षेत हिंदी शॉर्टहँड आणि टायपिंग हा मुख्य निकष होता. नियमांनुसार उमेदवारांना प्रति मिनिट किमान ८० शब्दांची अचूक टायपिंग क्षमता दाखवणे आवश्यक होते. मात्र, एकही उमेदवार चुका न करता ही गती गाठू शकला नाही. यामुळे सर्व उमेदवार अंतिम पात्रता निकषातून बाहेर पडले. प्राथमिक टप्प्याचा निकाल ४ मार्च २०२४ रोजी जाहीर करण्यात आला होता. यामध्ये एकूण ५,८८९ उमेदवारांना पुढील टप्प्यासाठी पात्र ठरवण्यात आले होते. यानंतर २८ जून ते १८ जुलै २०२४ दरम्यान लखनौ येथे दुसरा टप्पा दोन सत्रांमध्ये पार पडला. याच टप्प्यात ४,२४० उमेदवारांनी सहभाग घेतला, मात्र अंतिम निकालात कोणीही यशस्वी ठरले नाही. एपीएस पदासाठी उमेदवाराकडे मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी असणे आवश्यक आहे. वयोमर्यादा २१ ते ४० वर्षे निश्चित करण्यात आली आहे, तसेच राखीव प्रवर्गासाठी नियमांनुसार सवलत लागू आहे. *(वृत्तसंस्था)*

# जपानमधील मशीद बेकायदेशीर



**◆ कावागो, ३ जून**

जपानमधील कावागो शहरात बांधण्यात आलेली एक मशीद बेकायदेशीर ठरली आहे. या मशीदीचे उद्घाटन यावर्षी एप्रिल महिन्यात जपानमधील पाकिस्तानी राजदूत अब्दुल हमीद यांच्या हस्ते करण्यात आले होते. मात्र आता स्थानिक प्रशासनाने ही मशीद बेकायदेशीर बांधकाम असल्याचे स्पष्ट केले आहे.

कावागो सिटी हॉलच्या माहितीनुसार, ही मशीद बांधताना आवश्यक प्रशासकीय परवानगी घेण्यात आलेली नव्हती. जपानमधील नगर नियोजन कायद्यानुसार धार्मिक इमारतींसाठी विशेष मंजुरी आवश्यक असते. ती या प्रकरणात घेतली नसल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. यामुळे मशीदीवर कारवाईची मागणी वाढली असून ती पाडण्याबाबत विचार सुरू आहे. वाद वाढताच पाकिस्तानच्या दूतावासाने या प्रकल्पापासून स्वतःला दूर केले. स्थानिक कायद्यांचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही प्रकल्पाशी त्यांचा संबंध नाही, असे १ जून रोजी जारी केलेल्या निवेदनात दूतावासाने स्पष्ट केले. तसेच पाकिस्तानी समुदायाने जपानमधील नियमांचे काटेकोर पालन करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे. दूतावासाने राजदूत अब्दुल हमीद यांच्या उद्घाटनातील सहभागावरही स्पष्टीकरण दिले आहे. त्यांच्या मते, सर्व कायदेशीर परवानग्या पूर्ण झाल्याचे आश्वासन मिळाल्यानंतरच ते ३ एप्रिल रोजी कार्यक्रमात सहभागी झाले होते. मात्र नंतर ही माहिती चुकीची ठरल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. *(वृत्तसंस्था)*



सोलापूर : कुमार गटाची राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर सुरू आहे. या स्पर्धेतील सिंधदुर्ग विरुद्धच्या सामन्यात सूर मारून बाद करतानाचा बीडच्या आक्रमकाचा बुधवारी टिपलेला क्षण.

(छायाचित्र : सुरेंद्रकुमार विश्वकर्मा, मुंबई) सविस्तर वृत्त पान ६ वर...

# तिसऱ्या पर्वतीय बोगद्याचे काम पूर्ण

## मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पाला गती

**नवी दिल्ली, ३ जून**

मुंबई -अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पांतर्गत महाराष्ट्रातील तिसऱ्या पर्वतीय बोगद्याचे यशस्वी वेधन पूर्ण झाले असून, भारताच्या पहिल्या हाय-स्पीड रेल्वे मार्गिकेच्या उभारणीत आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठण्यात आला आहे. पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील आंबेसरी गावाजवळ हा बोगदा काम पूर्ण करण्यात आले आहे.



४१७ मीटर लांबी आणि १४.४ मीटर रुंदी असलेला हा बोगदा अत्याधुनिक देखरेख व सुरक्षा प्रणालींनी सुसज्ज करण्यात आला आहे. बुलेट ट्रेनच्या सुरक्षित आणि कार्यक्षम संचालनासाठी आवश्यक असलेल्या सर्व आधुनिक तांत्रिक सुविधा या बोगद्यात उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या यशासह, महाराष्ट्रात गेल्या पाच महिन्यांत तीन पर्वतीय बोगद्यांचे काम पूर्ण झाले असून, प्रकल्पाच्या तांत्रिकदृष्ट्या अत्यंत आव्हानात्मक विभागातील कामाला वेग मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे. यापूर्वी एम टी -०५ आणि एम टी -०६ या बोगद्यांचेही यशस्वी वेधन पूर्ण झाले होते. संपूर्ण उत्खनन प्रक्रियेदरम्यान संरचनात्मक स्थिरता, अचूक अंमलबजावणी आणि कामगारांच्या सुरक्षिततेसाठी अत्याधुनिक भूतांत्रिक उपकरणे आणि रिअल- टाइम मॉनिटरिंग प्रणालींचा वापर करण्यात आला.

सरफेस सेटलमेंट पॉइंट्स, थ्री डी टार्गेट्स, स्ट्रेन गेजेस आणि सिस्मोग्राफ्सच्या साहाय्याने कंपने, बोगद्याची स्थिरता आणि सभोवतालच्या संरचनांवर सातत्याने देखरेख ठेवण्यात आली. तसेच, वायुवीजन प्रणाली, अग्निसुरक्षा व्यवस्था, नियंत्रित प्रवेश आणि सतत भूतांत्रिक निरीक्षण यांसारख्या सर्वसमावेशक सुरक्षा उपाययोजना राबविण्यात आल्या.

# पाटण्यातील खान सर यांच्या कोचिंग संस्थेवर दगडफेक, तोडफोड

**पाटणा, ३ जून**

खान सर या नावाने लोकप्रिय असलेले शिक्षक फैजल खान यांच्या कोचिंग संस्थेची पाटणा येथे कथितरित्या दगडफेक आणि तोडफोड करण्यात आली, असे पोलिसांनी बुधवारी सांगितले. संस्थेवर गोळीबारही झाल्याचा दावा त्यांनी केला होता; मात्र, पोलिसांना या घटनेची पुष्टी करता आली नाही. ही घटना मंगळवारी रात्री कदमकुआं पोलिस ठाण्याच्या हद्दीतील खान ग्लोबल कोचिंग इन्स्टिट्यूटमध्ये घडली आहे. पाटण्यातीलच एका दुसऱ्या कोचिंग संस्थेशी संबंधित सुमारे १५ ते २० लोक या दगडफेक आणि तोडफोडीच्या कृत्यात कथितरित्या सहभागी होते, असे प्राथमिक तपास आणि सीसीटीव्ही फुटेजच्या पडताळणीवरून दिसून आले आहे. जवळच्याच एका कोचिंग संस्थेतील काही समाजकंटकांनी मोठ्या प्रमाणावर नुकसान केले; त्यांनी आमच्या सुरक्षारक्षकाला बेदम मारहाण केली आणि गोळीबारही केला, असे तक्रारीत म्हटले आहे. एखाद्या व्यक्तीने विद्यार्थ्यांना इतक्या कमी शुल्कात शिकवून, दरवर्षी हजारो यशस्वी निकाल कसे काय मिळवितात, असा निदर्शकांचा मुख्य संताप आहे. या घटनेत सहभागी असलेल्यांना पकडण्यासाठी विविध ठिकाणी छापे टाकले जात असून, कायद्यानुसार पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल, असे पोलिसांनी स्पष्ट केले.



## अग्रलेख...

# कर्जमाफीच्या पल्याड जायला हवे...

महाराष्ट्र सरकारने राज्यातील ५५ लाख ७२ हजार शेतकऱ्यांना थेट लाभ देणाऱ्या 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने'ला अधिकृत मंजुरी दिली आहे. ही घोषणा पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मवर्षाचे औचित्य साधत, त्यांच्या नावाने जाहीर केली गेली हे स्तुत्य आणि भावनिकदृष्ट्याही सकारात्मक आहे. राजमाता अहिल्यादेवी यांचे संपूर्ण आयुष्य वंचित, शोषित आणि विशेषतः काळ्या मातीत घाम गाळणाऱ्या बळीराजाच्या कल्याणासाठी समर्पित राहिले. त्यांच्या मनात शेतकऱ्यांविषयी अतीव कणव होती. शेतीच्या विकासासाठी त्यांनी विहिरी, बारवा आणि तलावांची निर्मिती केली, दुष्काळात शेतकऱ्यांचा महसूल माफ केला आणि पिढ्यान्‌पिढ्या शेती करणाऱ्या कुळांना संरक्षण दिले. तत्कालीन महसूल अधिकारी शेतकऱ्यांवर जुलूम करीत होते, तेव्हा अहिल्यादेवींनी मध्यस्थी करून शेतकऱ्यांना न्याय दिला. अशा महान, प्रजाहितदक्ष मायमाउलीच्या नावाने ही योजना सुरू होणे, हा महाराष्ट्राच्या कृषी परंपरेसाठी शुभसंकेत मानला पाहिजे.

राज्यातील शेतकऱ्यांची स्थिती बिकट आहे. खरे तर, बिकट स्थिती त्यांच्या पाचवीलाच पूजली आहे. सातत्याने हवामान पावसाचा लहरीपणा, हवामान बदलाचे संकट, कधी कोरडा दुष्काळ तर कधी अतिवृष्टी, या साऱ्यांमुळे शेती करणे म्हणजे जणू जुगार खेळण्यासारखे आहे. कशाचीही निश्चिती नाही, शाश्वती नाही. आंतरराष्ट्रीय बाजारातील चढ-उतार आणि उत्पादन खर्चाच्या तुलनेत पिकाला न मिळणारा भाव यामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. पेरणीसाठी घेतलेले कर्ज फेडणे तर दूरच; कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करावा, असा प्रश्न महाराष्ट्रातल्या लाखो शेतकऱ्यांसमोर आ वासून उभा आहे. या चक्रव्यूहातून बाहेर पडू न शकल्यामुळे अनेक शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत असतात. अशा गंभीर आणि विदारक स्थितीत शेतकऱ्यांना तत्काळ सरकारकडून मदतीची गरज होतीच. त्यामुळे दोन लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज सरसकट माफ करण्याचा आणि नियमित कर्ज फेडणाऱ्यांना ५० हजार रुपयांचा प्रोत्साहन निधी देण्याचा शासनाने घेतलेला निर्णय अगदी योग्य वेळी आला आहे. कारण येणारा पावसाळा फारसा आश्वस्त करणारा नाही, असा वेधशाळेचा अंदाज आहे. त्यामुळे ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची ही तरतूद शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा हलका करणारी ठरेल, अशी आशा करू या.

लोकशाही व्यवस्थेत संकटसमयी नागरिकांच्या, विशेषतः अन्नदात्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे, त्यांचे अश्रू पुसणे ही सरकारची नैतिक आणि घटनात्मक जबाबदारी आहे. महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करीत हा निर्णय घेतला, ही नक्कीच स्वागतार्ह बाब आहे. जेथे देशातील उद्योगपतींचे लाखो-कोटी रुपयांचे कर्ज बुडित खात्यात टाकले जाते किंवा थेट माफ केले जाते, तेथे देशाचा कणा असलेल्या शेतकऱ्याला कर्जमाफी मिळणे हा त्याचा हक्क ठरतो. सरकारनेही आपली जबाबदारी ओळखून ५५ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना थेट लाभ देण्याचा संकल्प सोडला. आचारसंहिता संपताच, म्हणजेच १८ जूननंतर पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ही रक्कम वर्ग केली जाणार आहे. शेतकऱ्यांना हवा असलेला तातडीचा दिलासा महत्त्वाचा आहेच. परंतु, हे असे किती काळ चालू शकेल, हाही प्रश्न आहेच. २००८ ची केंद्र सरकारची कर्जमाफी, २०१७ ची 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१९ ची महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना आणि आता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना. सरकारे बदलतात, योजनांची नावे बदलतात. हजारो कोटी रुपये खर्च होतात. ते फेडायला सरकार पुन्हा कर्ज घेते आणि तरीही शेतकरी कायमचा कर्जमुक्त का होत नाही? बळीराजा पुन्हा पुन्हा कर्जबाजारीपणाच्या त्याच दुष्टचक्रात का अडकतो? आणि त्याच्यासाठी दुष्काळात कायम तेरावा महिनाच का असतो? अशा प्रश्नांची उत्तरेही शोधायला हवीत. कर्जमाफी हे या कर्जबाजारीपणाच्या व्याधीवरचे कायमस्वरूपी औषध नव्हेच. फार फार तर तो तात्पुरता केलेला उपचार आहे. वैद्यकीय उपचारात वेदनाशामक औषधांचे जे महत्त्व आहे, तेच शेतकऱ्यांच्या समस्यांच्या अनुषंगाने कर्जमाफीचे. कर्जमाफीमुळे शेतकऱ्याला तात्पुरता दिलासा मिळतो. त्याची वेदना तात्पुरती शमते. पण, या औषधाचा डोज उतरला की स्थिती पुन्हा जैसे थे. जोपर्यंत शेती फायद्याची होत नाही, जोपर्यंत शेतकऱ्याचा उत्पादन खर्च कमी होत नाही आणि जोपर्यंत त्याच्या शेतमालाला रास्त भाव आणि पर्यायाने नफा मिळत नाही, तोपर्यंत शेतकऱ्यांची कर्जबाजारीपणाच्या विळख्यातून सुटका होण्याची शक्यता नाही. या प्रश्नांची तड लागेपर्यंत कर्जमाफीच्या योजनांची पुनरावृत्तीही होत राहील. पण, वेदनाशामक औषधे किंवा प्रतिजैविकेही फार जास्त देता येत नाहीत. तसेच कर्जमाफीचे आहे. कधी तरी शेतकऱ्यांचे प्रश्न अधिक उग्र झालेले असतील आणि कर्जमाफी देण्याची सरकारची क्षमता संपून जाईल. तो दिवस येऊ नये म्हणून आता तरी उपाय सुरू केले पाहिजेत. सिंचनाची सोय, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, शीतगृहांची साखळी आणि मध्यस्थांची फळी मोडीत काढून थेट बाजाराशी शेतकऱ्याला जोडावे लागेल. पूरक व्यवसायांचे जाळे उभे करावे लागेल. शेतकऱ्यांना मानसिक बळही द्यावे लागेल. हे उपाय तसे नव्याने सुचविण्याचे कारण नाही. सर्वांना सारे काही कळते. वळत नाही, हाच मुद्दा आहे. अनेक समित्या गठित झाल्या. त्यांचे अहवाल आलेत. सर्व अहवालांत या व अशा उपाययोजना दिलेल्या आहेत. पण त्यांच्या अंमलबजावणीचे काय? शेतकऱ्यांचे भले करण्याच्या नावावर अनेक योजना येतात, जातात. वारंवार कर्जमाफी करावी लागते. कर्जमाफी हे यश नव्हे तर आपल्या व्यवस्थेचे अपयश आहे, हे सरकारला समजले पाहिजे. शेतकऱ्यांना कुणाच्या दारावर उभे राहणे आवडत नाही. शेतकऱ्यांची दैना शासनालाही बघवत नसणार. महायुती शासनाला शेतकऱ्यांविषयी ममत्व आहे, असे जाणवते. या ममत्वाला वास्तवाच्या नजरेने पाहिले पाहिजे. कारण, यातून प्रश्न सुटत नाहीत. ते रेंगाळतात. स्थिती अधिक बिकट होत राहते. मंत्रिमंडळाने काल-परवा घोषित केलेल्या बहुतांश योजना किंवा अलिकडच्या काळातील अनेक मोठ्या घोषणा या कर्ज घेतल्याशिवाय पूर्ण होणार नाहीत, अशाच आहेत. आज रोजी महाराष्ट्रावर ६.५ लाख कोटी रुपयांहून अधिकचे कर्ज आहे. राज्याच्या उत्पन्नातील बराच हिस्सा हा या कर्जाचे व्याज फेडण्यात जात आहे. सरकारने नवीन कर्ज काढायचे आणि ते पैसे भांडवली विकासासाठी न वापरता अनुदाने, मोफत योजना आणि कर्जफेडीसाठी वापरायचे, हे राज्याच्या अर्थकारणासाठी फार चांगले नाही. लोकशाही ही कल्याणकारी व्यवस्था असली तरी पैशाचे सोंग फार काळ आणता येत नाही. कर्जाऊ रकमेतून अशा योजना राबविणे ही तात्कालिक गरज असू शकते. सरकारच्या लोकप्रियतेसाठीही त्याचा फायदा होतो. पण दीर्घकालीन आर्थिक आरोग्यासाठी ते धोकादायक आहे. भविष्यात रस्ते, सिंचन प्रकल्प, वीज आणि आरोग्यासारख्या मूलभूत सोयींसाठी पैसा कुठून येणार, याचाही विचार सरकारने केला पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य सरकारने घेतलेला शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय सद्यस्थितीत आवश्यकच होता, यात वाद नाही आणि तो बळीराजासाठी दिलासादायक ठरेल, यात शंका नाही. मात्र, धोरणकर्त्यांनी अशा तात्पुरत्या उपायांच्या पलीकडे जाऊन विचार केला पाहिजे. शेतकऱ्यांना स्वावलंबी बनवण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना युद्ध पातळीवर केल्या पाहिजेत. ज्या असोशीने राज्य सरकार उद्योगांसाठी धावते, गुंतवणूक आणण्यासाठी धडपडते, तसे ते शेतकऱ्यांसाठी कधीच धावपळ करताना दिसत नाही. शेतकऱ्यांच्या स्वावलंबनासाठी शाश्वत व्यवस्था कधी ना कधी निर्माण करावी लागेलच. कर्जमाफीच्या पल्याड जाऊन काम करावे लागेल. कृषीविषयक धोरणात आमूलाग्र बदल करून आणि नव्या धोरणाची अंमलबजावणी निगुतीने करूनच स्थिती सुधारू शकते. तसे प्रयत्न झाले तरच अहिल्यादेवींच्या स्वप्नातील समृद्ध, सुखी आणि कर्जमुक्त शेतकरी आपल्याला बघता येईल. अन्यथा कर्जमाफीच्या समाधानाचे किंवा आनंदाचे इमले कधीच टिकाऊ नसतात, हा इतिहास ताजाच आहे.. ▮

## विशेष

**कमोडोर एस. एल. देशमुख**

# दक्षिण चीन समुद्रावर गैरवाजवी मालकी

दक्षिण चीन समुद्र हा जागतिक व्यापाराच्या भवितव्याचा व आशियातील सत्तासंतुलनाचा कस पाहणारा प्रदेश बनला आहे. शतकानुशतके महासत्तांना एक साधे सत्य माहीत होते- जो समुद्रांवर नियंत्रण ठेवतो, तो राष्ट्रांच्या भविष्याची दिशा ठरवतो. २१ व्या शतकात हे सत्य दक्षिण चीन समुद्राच्या खाऱ्या पाण्यात नव्या तीव्रतेने समोर आले आहे. जागतिक व्यापाराच्या महत्त्वाच्या वाहिन्या ज्या विशाल सागरी मार्गातून जातात, तो हा प्रदेश आहे. आज तो जगातील सर्वात महत्त्वाच्या भूराजकीय संघर्षबिंदूंपैकी एक बनला आहे. जागतिक स्तरावर व्यापारी मालाच्या होणाऱ्या जवळपास चार पंचमांश वस्तूंची वाहतूक या समुद्रमार्गे होते. कच्चे तेल, द्रविभूत नैसर्गिक वायू, मोटारी, इलेक्ट्रॉनिक्स, धान्य, औषधी कच्चा माल आणि इतर उत्पादित ९० टक्के वस्तू ज्या आधुनिक जीवनावश्यक आहेत या सागरी व्यापारमार्गांवर अवलंबून आहेत. या सागरी मार्गांमध्ये दक्षिण चीन समुद्रातून जाणारे मार्ग विशेष महत्त्वाचे आहेत. जगातील सागरी व्यापारापैकी जवळपास एक चतुर्थांश व्यापार या समुद्रातून होतो. या मार्गात दीर्घकालीन अडथळा निर्माण झाल्यास त्याचे परिणाम केवळ पूर्व आशियापुरते मर्यादित राहणार नाहीत तर जगाची आर्थिक नाडी आवळली जाईल.

**चीनचे अवास्तव दावे** : जागतिक व्यापाराचे स्वरूप बदलत असल्याने या प्रदेशाचे महत्त्व आणखी वाढले आहे. आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका यांना जोडणारे नवीन दक्षिण-दक्षिण व्यापार मार्ग वेगाने विस्तारत आहेत. आशियातील अंतर्गत व्यापारही सातत्याने वाढत आहे. त्यामुळे दक्षिण चीन समुद्र हा केवळ प्रादेशिक जलमार्ग न राहता बहुध्रुवीय जागतिक अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू बनला आहे. या तणावाच्या केंद्रस्थानी चीनचा व्यापक प्रादेशिक दावा आहे. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या दृष्टीने परिस्थिती स्पष्ट दिसते. २०१६ मध्ये हेग येथील आंतरराष्ट्रीय लवाद न्यायाधिकरणाने निर्णय दिला की, संयुक्त राष्ट्रांच्या समुद्र कायदा करारानुसार चीनच्या व्यापक दाव्यांना कोणताही कायदेशीर आधार नाही. मात्र, चीनने हा निर्णय स्पष्टपणे नाकारला आणि सैन्य, तटरक्षक दल व सागरी मिलिशियाच्या माध्यमातून आपली उपस्थिती अधिक मजबूत करीत इतर राष्ट्रांची सागरी संपत्ती लाटण्याचा कुटिल डाव रचला आहे.

गेल्या दशकात सामरिक परिस्थिती बदलली आहे. या बेटांवर धावपट्ट्या, क्षेपणास्त्र प्रणाली, रडार केंद्रे आणि नौदल सुविधा उभारण्यात आल्या आहेत. चिनी आणि फिलिपिनी जहाजांमधील चकमकी अधिक वारंवार आणि आक्रमक होत आहेत. त्यामुळे एखादी स्थानिक घटना मोठ्या संघर्षात परिवर्तित होण्याची भीती वाढली आहे. अमेरिकेने फिलिपाईन्सप्रति आपली सुरक्षा बांधिलकी अधोरेखित केली आहे आणि अतिशयोक्त सागरी दाव्यांना आव्हान देण्यासाठी नियमितपणे 'फ्रीडम ऑफ नेव्हिगेशन' मोहिमा राबविल्या आहेत. जपान, ऑस्ट्रेलिया आणि काही युरोपीय देशांनीही मुक्त सागरी व्यवस्थेला पाठिंबा देण्यासाठी आपली नौदल उपस्थिती आणि देखरेख वाढविली आहे. पण हे वरवरचे उपाय कुचकामी ठरले आहेत. दक्षिण चीन समुद्र हा केवळ चीन आणि अमेरिका यांच्यातील संघर्ष नाही. अनेक देशांचे हितसंबंध त्यात गुंतले आहेत. भारतासाठीही या समुद्राचे प्रचंड सामरिक महत्त्व आहे.

**सागरी सुरक्षा** : पारंपरिकदृष्ट्या स्थलसीमांवर लक्ष केंद्रित करणारी शक्ती म्हणून ओळखला जाणारा भारत आता आपल्या आर्थिक भवितव्याचा सागरी सुरक्षेशी असलेला अविभाज्य संबंध ओळखू लागला आहे. भारताचा २०० अब्ज डॉलर्सहून अधिक किमतीचा व्यापार दक्षिण चीन समुद्र आणि मलाक्का सामुद्रधुनीतून जातो. मूल्याच्या दृष्टीने हा भारताच्या एकूण आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या निम्म्याहून अधिक आहे. हे जलमार्ग भारताला जपान, दक्षिण कोरिया, चीन आदी राष्ट्रांसारख्या महत्त्वाच्या आर्थिक भागीदारांशी जोडतात. भारताच्या ऊर्जा आयातीतील मोठा भाग, विशेषतः कच्चे तेल आणि द्रविभूत नैसर्गिक वायू या मार्गांद्वारे येतो. याच मार्गांमुळे भारताच्या वाढीसाठी आवश्यक असलेले इलेक्ट्रॉनिक्स, औषधी कच्चा माल, औद्योगिक कच्चा माल आणि उत्पादित वस्तूंचा पुरवठा होतो. म्हणूनच दक्षिण चीन समुद्रातील नौवहन स्वातंत्र्य हा नवी दिल्लीसाठी दूरचा राजनैतिक विषय नसून एक महत्त्वाचा राष्ट्रीय हितसंबंध आहे. चीनने वादग्रस्त प्रदेशांचे केलेले लष्करीकरण आणि आंतरराष्ट्रीय सागरी नियमांचे पूर्ण पालन करण्यास दाखवलेली अनिच्छा याबद्दल भारताने सातत्याने चिंता व्यक्त केली आहे. विविध राजनैतिक मंचांवर भारताने आंतरराष्ट्रीय कायद्याच्या आधारे सागरी वाद सोडविण्यावर भर दिला आहे. याचबरोबर भारतीय नौदलाने इंडो-पॅसिफिक प्रदेशात आपली कार्यात्मक उपस्थिती वाढविली आहे. दक्षिण चीन समुद्रातील नियमित तैनाती भारताच्या आर्थिक हितसंबंधांचे संरक्षण आणि प्रादेशिक स्थैर्यात योगदान देण्याचा निर्धार दर्शवतात. भारताने आग्नेय आशियाई देशांशी सुरक्षा भागीदारीही मजबूत केली आहे. विशेषतः फिलिपाईन्सला ब्रह्मोस क्षेपणास्त्र प्रणाली पुरवून त्याला मदत केली आहे. या पावलांमधून भारत या प्रदेशात अधिक सक्रिय सामरिक भूमिका स्वीकारण्यास तयार असल्याचे दिसून येते. आशियामध्ये चीनचा आर्थिक प्रभाव अत्यंत व्यापक आहे.

भारताची प्रभाव क्षमता संसाधनांच्या मर्यादा, देशाजवळील इतर सामरिक प्राधान्यांमुळे व आंतरिक राजकारणामुळे काही प्रमाणात मर्यादित आहे. या वास्तवांमुळे भारताला दक्षिण चीन समुद्राविषयीची आपली रणनीती सतत परिष्कृत करावी लागणार आहे. हा उद्दिष्ट संघर्ष नसून धोरणात्मक लवचीकता जपण्याचा मार्ग आहे. व्यापार मार्गांचे संरक्षण, भागीदारी बळकट करणे, आंतरराष्ट्रीय कायद्याला पाठिंबा देणे आणि कोणत्याही एका शक्तीला सागरी प्रवेशाच्या अटी एकतर्फी ठरवण्यापासून रोखणे हे महत्त्वपूर्ण आहे. अमेरिकेचे दिवंगत सिनेट र जॉन सी स्टेनिस यांनी एकदा म्हटले होते की, विविध नौदलांमधील सहकार्य हे उदयोन्मुख धोक्यांविरुद्ध सागरी सुरक्षेचे संरक्षण करण्याच्या सामूहिक निर्धाराचे प्रतीक आहे. वाढत्या भूराजकीय स्पर्धेच्या या युगात, समविचारी लोकतांत्रिक देशांसाठी दक्षिण चीन समुद्र हा आंतरराष्ट्रीय व्यवस्था जागतिक समृद्धी अवलंबून असलेल्या या महत्त्वाच्या जलमार्गांना खुले ठेवणे ही अग्निपरीक्षा आहे. ▮

(लेखक निवृत्त नौदल तांत्रिक वैमानिकीय अधिकारी तसेच संरक्षण व भूराजकीय विश्लेषक आहेत. व्यक्त केलेली मते वैयक्तिक आहेत.)

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# प्रतिकूल परिस्थितीतही अर्थव्यवस्था मजबूत

सध्या जगात अनेक ठिकाणी युद्धे सुरू आहेत. महायुद्ध झाले तर संपूर्ण जीवसृष्टी धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही. परंतु, सध्या तरी महायुद्ध होण्याची शक्यता कुठल्याच अंगाने वाटत नाही. मात्र, छोट्या-मोठ्या युद्धांमुळे विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थांवर गंभीर परिणाम होऊ लागले आहेत. जगात महागाईचा भडका उडाला असून अनेक देशांच्या अर्थव्यवस्था धोक्यात आल्या आहेत. याचा सर्वाधिक फटका गरीब देशांना बसत आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीतही भारताची अर्थव्यवस्था मजबूत आहे. परंतु, अमेरिका-इराण युद्धामुळे आयात-निर्यात धोरण विस्कळीत झाल्याने सकल राष्ट्रीय उत्पन्नवाढीवर परिणाम झाला आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या आकडेवारीनुसार भारताची अर्थव्यवस्था जगात सहाव्या क्रमांकावर आहे. मात्र, क्रयशक्ती समानतेचा आधार घेतला तर भारत जगातील तिसरी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था ठरते. भारताच्या अर्थव्यवस्थेने ४ ट्रिलियन डॉलर्सचा टप्पा पार केला आहे आणि भारतीय अर्थव्यवस्था वाढीचा दर जगात पहिल्या क्रमांकावर आहे.

सध्या भारताकडे जवळपास ६६ लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक परकीय चलन साठा उपलब्ध आहे. यात भारत चौथ्या क्रमांकावर आहे. आगामी काळात हा चलन साठा १ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट रिझर्व्ह बँकेचे आहे. युद्धामळे रुपया कमकुवत होत आहे. ही बाब खरी असली तरी अशा स्थितीवर मात करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरू आहेत.



आर्थिक वर्ष २०२५ मध्ये भारताची एकूण निर्यात ८२५.३ अब्ज डॉलर्सवर होती. हा आजपर्यंतचा एकप्रकारे विक्रम ठरला. हाच निर्यात दर २०२६ मध्येसुद्धा कायम राहिला. अमेरिकेने मोठ्या प्रमाणात व्यापार शुल्क लादूनही निर्यात २.४ टक्क्यांनी वाढली. २०२५ मध्ये थेट विदेशी गुंतवणूक ८१ अब्ज डॉलर्स इतकी नोंदविली गेली. विशेष म्हणजे, २०२६ मध्ये त्यात आणखी वाढ झाली. यावरून हेच सिद्ध होते की, जगाचा विश्वास भारतावर दिवसागणिक वाढत चालला आहे. इराण आणि अमेरिका युद्धामुळे कच्च्या खनिज तेलाच्या किमती प्रचंड वाढल्याने भारताचा विकासदर जवळपास १ टक्क्याने कमी होण्याचा अंदाज वर्तविला जात आहे. भारताला गरजेच्या ८५ टक्क्यांवर कच्चे तेल आयात करावे लागते. त्यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढल्या. भारताची जवळपास ६०-८० टक्के एलपीजी आयात होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होते. हा मार्ग बाधित झाल्याने टंचाई निर्माण झाली आहे. विमानांचे मार्ग बदलावे लागल्याने प्रवास महागला आहे. रासायनिक खतांच्या बाबतीतही हीच स्थिती आहे. भारत दरवर्षी सुमारे ७०० ते ८०० टन सोन्याची आयात करतो. २०२५-२६ या आर्थिक वर्षात भारताने सुमारे ७२१ टन सोन्याची आयात केली. यातून तब्बल ६ लाख कोटी रुपये भारतातून विदेशात गेले. हा सर्व व्यवहार अमेरिकन डॉलर्समध्ये होत असल्याने भारतीय तिजोरीवर मोठा ताण येतो. त्यामुळे परकीय चलन वाचविण्यासाठी आगामी वर्षभर अनावश्यक सोने खरेदी टाळण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. सोबतच इंधन वाचविण्यासाठी पुढाकार घेण्याची विनंती त्यांनी केली आहे. नागरिकांकडून पंतप्रधानांच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. विरोधकांकडून मात्र मोदी यांच्या आवाहनावर टीका होत आहे. १९६८ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी विदेशी चलन टंचाई रोखण्यासाठी गोल्ड कंट्रोल ॲक्ट कडक केला होता, ही बाब विरोधक आज सोयीस्करपणे विसरत आहेत. १४ कॅरेटपेक्षा अधिक गुणवत्तेच्या सोन्याचे दागिने घडविण्यावर त्याकाळी बंदी घालण्यात आली होती. खाद्यतेल निर्मितीत २०३१ पर्यंत आत्मनिर्भर होण्याचा प्रयत्न भारत सरकारचा आहे. परंतु, आज तरी भारताला आपल्या गरजेच्या ६० टक्क्यांपेक्षा अधिक खाद्यतेल आयात करावे लागते. भारत दरवर्षी सुमारे १४० ते १६० लाख मेट्रिक टन खाद्यतेल आयात करतो. भारताला दरवर्षी २५० लाख मेट्रिक टनापेक्षाही अधिक खाद्यतेलाची गरज भासते. या व्यवहारात देशाला जवळपास १.६१ लाख कोटी रुपये खर्च करावे लागतात. भारत पूर्वी शस्त्रास्त्र खरेदी करणारा प्रमुख देश होता. परंतु, या क्षेत्रातही आता भारत आत्मनिर्भर होण्याच्या दिशेने अग्रेसर झाला असून शस्त्रास्त्र निर्यातीतून विदेशी चलन भारतात येऊ लागले आहे. अमेरिकेसारख्या देशाने शस्त्रास्त्रे आणि खनिज तेल विकूनच जगात आपला दबदबा राखला आहे. आता भारतही या स्पर्धेत उतरला असून आगामी २०४७ पर्यंत भारत सर्वच क्षेत्रात आत्मनिर्भर होईल, अशी अपेक्षा करायला हरकत नाही. ▮

९८८१७१६०२७

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# अखेर तृणमूल काँग्रेसमध्ये फूट

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभवाच्या धक्क्यातून सावरण्याच्या आधीच ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसमध्ये फूट पडली आहे. पश्चिम बंगाल विधानसभेत ममता बॅनर्जी यांनी शोभनदेव चट्टोपाध्याय यांना विरोधी पक्षनेता जाहीर केले होते. त्यांचा हा निर्णय पक्षातील बहुतांश आमदारांना मान्य नव्हता. त्यामुळे या आमदारांनी विधानसभेचे सभापती रवींद्रनाथ बोस यांना भेटून ऋतुब्रत बॅनर्जी यांना विरोधी पक्षनेता करण्याची मागणी केली होती. या मागणीला तृणमूल काँग्रेसच्या ८० पैकी ६० आमदारांचा पाठिंबा होता. बहुमताच्या निर्णयाचा आदर करत सभापती बोस यांनी ऋतुब्रत बॅनर्जी यांना विरोधी पक्षनेता म्हणून मान्यता दिली. त्यामुळे तृणमूल काँग्रेसमध्ये उघडउघड फूट पडली आहे. तृणमूल काँग्रेसमध्ये फूट पडणार अशी चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू होती, ती यामुळे प्रत्यक्षात आली आहे. ममता बॅनर्जी याच आमच्या नेत्या आणि सल्लागार असल्याचे बंडखोर गटाने म्हटले असले तरी तृणमूल काँग्रेस हा पक्ष आता त्यांच्या तावडीतून निसटला आहे, ही काळ्या दगडावरची रेघ म्हटली पाहिजे. या निर्णयाचे खापर भाजपावर फोडण्यापेक्षा ममता बॅनर्जी यांनी आत्मपरीक्षण केले पाहिजे.

२९४ सदस्यांच्या विधानसभेत भाजपाने २०८ जागा जिंकत इतिहास घडवला, तर तृणमूल काँग्रेसला ८० जागांवर समाधान मानावे लागले. मात्र हे आमदारही आपल्या एककल्ली वागणुकीमुळे ममतांना टिकवता आले नाही. मुख्यमंत्री असलेल्या ममता बॅनर्जी यांचा यावेळच्या विधानसभा निवडणुकीत पुन्हा पराभव झाला. आता त्यांच्या पक्षाच्या आमदारांनीही त्यांना नाकारले आहे. विरोधी पक्षनेतेपदाबाबत त्यांनी घेतलेला निर्णय झुगारून दिला आहे. विशेष म्हणजे २०२१ च्या विधानसभा निवडणुकीतही त्यांचा पराभव झाला होता, पण त्या पराभवानंतरही त्यांना मुख्यमंत्रिपदाची शपथ घेता आली होती. पण यावेळच्या पराभवानंतर ममता बॅनर्जी यांची स्थिती अधिक दयनीय आणि अगतिक झाली आहे. 'घर फिरले की घराचे वासे फिरतात', असे म्हटले जाते, याचा अनुभव आता ममता दीदींना येत आहे. मुख्यमंत्रिपदाच्या सलग तीन कार्यकाळात ममता बॅनर्जी यांची वागणूक आणि कार्यपद्धती मनमानी आणि एककल्ली होती. ती त्यांना आता भोवली आहे. खरं म्हणजे विरोधी पक्षांचे ८० आमदार ही संख्या कमी नाही. या आमदारांच्या भरवशावर ममता बॅनर्जीसारख्या आक्रमक नेत्याने राज्यातील शुभेन्दू अधिकारी सरकारला सळो की पळो करून सोडले असते. पण आता तृणमूलचे आमदारच ममता बॅनर्जी यांना सळो की पळो करत आहेत. ममता बॅनर्जी आपले भाचे अभिषेक बॅनर्जी यांच्या सल्ल्याने वागतात, निर्णय घेतात, असा तृणमूलच्या आमदारांचा आक्षेप होता. ममतांनी सर्वसहमतीने म्हणजे पक्षाच्या सर्व आमदारांशी चर्चा करून विरोधी पक्षनेतेपदाचा निर्णय घेतला असता, तर त्यांच्या पक्षातील फूट टळली असती. पण विनाशकाले विपरीत बुद्धीसारखी त्यांची स्थिती झाली. शोभनदेव चट्टोपाध्याय यांना विरोधी पक्षनेते करण्याचा निर्णय घेत ममता बॅनर्जी यांनी आपल्या पायावरच नाही तर पक्षावरही दगड पाडून घेतला. ममता बॅनर्जी यांच्यासारख्या नेत्याला पक्षात काय सुरू आहे, याचा अंदाज आला नाही, याचे आश्चर्य वाटते. ऋतुब्रत बॅनर्जी आणि सांदिपन साहा या दोन आमदारांना पक्षातून निलंबित करत ममतांनी आपल्या हाताने पक्षातील फुटीचा पाया घातला, असे म्हणावेसे वाटते.



पश्चिम बंगालचे राजकारण महाराष्ट्रातील राजकारणाच्या पावलावर पाऊल टाकत आहे, असे म्हटले जात होते, ते तेथे घडून आले. शिवसेनेत जशी फूट पडली, तशी फूट तृणमूल काँग्रेसमध्ये पडेल अशी आंशका व्यक्त केली जात होती. ताज्या घटनाक्रमाने ती खरी ठरली. महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेतून एकनाथ शिंदे ४० आमदारांसह बाहेर पडले होते. या बंडखोरीमुळे उद्धव ठाकरे यांचे सरकार कोसळत राज्यात भाजपाचे सरकार सत्तेवर आले. बंगालमध्ये तीनचतुर्थांश बहुमताचे भाजपाचे सरकार निवडणुकीच्या मार्गाने सत्तेवर आले आहे. त्यामुळे राज्यात भाजपाला सरकार स्थापन करण्यासाठी तृणमूल काँग्रेसच्या आमदारांची गरज नव्हती. तृणमूल काँग्रेसचे आमदार पक्षातून बाहेर पडत आपला गट हा मूळ तृणमूल काँग्रेस असल्याचा दावा करू शकतात, असे म्हटले जात होते, ते आता खरे ठरले आहे. तृणमूलच्या बंडखोर आमदारांनी आमचा गटच खरा तृणमूल काँग्रेस असल्याचा दावा करत ममता बॅनर्जी यांची झोप उडवली आहे. तृणमूल काँग्रेस विधिमंडळ पक्षात फूट पडल्यानंतर तृणमूलच्या संसदीय पक्षातही आता फूट पडू शकते.

विधानसभा निवडणुकीच्या आधी स्वत:ला सर्वांत शक्तिमान नेता मानणाऱ्या ममता बॅनर्जी आता सर्वांत अगतिक, दयनीय आणि असहाय नेत्या वाटू लागल्या आहेत. अभिषेक बॅनर्जी आणि कल्याण बॅनर्जी यांच्यावरील हल्ल्यानंतर ममता बॅनर्जी यांनी राजधानी कोलकात्यात धरणे आंदोलनाची घोषणा केली होती. काही दिवसांपूर्वी ममतांच्या तालावर नाचणाऱ्या कोलकाता पोलिसांनी राणी राशमोनी मार्गावर होणाऱ्या या धरणे आंदोलनाला परवानगी नाकारली. पण ममता बॅनर्जी पोलिसांचा बंदी आदेश झुगारून धरण्यावर बसल्या. पण त्यांची सर्वांत मोठी फजिती तेव्हा झाली, जेव्हा तृणमूलच्या ८० पैकी ७३ आमदारांनी या धरणे आंदोलनाकडे पाठ फिरवली.

याआधी ममता बॅनर्जी यांनी कालिघाट या आपल्या निवासस्थानी बोलावलेल्या आमदारांच्या बैठकीला ८० पैकी फक्त २० आमदार उपस्थित होते. ममता बॅनर्जी यांनी बोलावलेल्या बैठकीला आमदारांनी अनुपस्थित राहण्याची ही पहिली वेळ नव्हती. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर आमदारांच्या पहिल्या बैठकीला दहा आमदारांनी दांडी मारली होती. दुसऱ्या बैठकीत ही संख्या ३५ आमदारांपर्यंत गेली. या आमदारांचा रोष हा ममता बॅनर्जी यांच्यापेक्षा त्यांचे भाचे अभिषेक बॅनर्जी यांच्यावर होता. अभिषेक बॅनर्जी हे ममता बॅनर्जी यांच्यानंतर तृणमूल काँग्रेसमधील सत्तेचे दुसरे केंद्र होते. तृणमूल काँग्रेसची सत्ता असताना अभिषेक बॅनर्जी यांनी तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांना आणि आमदारांना कस्पटासमान वागणूक दिली होती. त्याचा राग आता तृणमूल काँग्रेसच्या आमदारांच्या बंडखोर वागणुकीतून समोर आला आहे.

विधानसभा निवडणुकीच्या निकालाला एक महिनाही झाला नसताना तृणमूल काँग्रेसमध्ये पडलेली फूट ममता बॅनर्जीसाठी गंभीर धोक्याचा इशारा आहे. विधानसभा निवडणुकीत यदाकदा तृणमूल काँग्रेसला चौथ्यांदा सत्ता मिळाली असती आणि ममता बॅनर्जी यांनी चौथ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली असती तर त्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा प्रचंड वाढल्या असत्या आणि त्यांना पंतप्रधानपदाची स्वप्ने पडू लागली असती. पण विधानसभा निवडणूक निकालांनी ममता बॅनर्जी यांना राज्यातील जनतेने जमिनीवर आणले आहे. ममता बॅनर्जी यांच्या पराभवाचा भाजपाला जेवढा आनंद झाला नसेल त्यापेक्षा जास्त आनंद काँग्रेसला झाला आहे. कारण ममता बॅनर्जी यांना चौथ्यांदा सत्ता मिळाली असती तर राष्ट्रीय राजकारणातील काँग्रेसचे राजकीय महत्त्व कमी झाले असते आणि ममता बॅनर्जी यांचे महत्त्व वाढले असते. पण ममतांच्या पराभवाने काँग्रेसच्या राजकीय अस्तित्वाला निर्माण होणारा संभाव्य धोका टळला आहे. त्यामुळेच तृणमूल काँग्रेसचे पानिपत झाल्यानंतर काँग्रेसचे राहुल गांधी यांनी पहिला दूरध्वनी ममता बॅनर्जी यांना करत एकप्रकारे त्यांच्या जखमेवर मीठ चोळले होते.

धरणे आंदोलनाच्या ठिकाणी 'ईश्वर अल्लाह तेरो नाम, सब को सन्मती दे भगवान' असे गीत ममता बॅनर्जी यांनी म्हटल्याचे वृत्त आहे. पण हे गीत म्हणायला ममतांनी खूप उशीर केला. आधीपासूनच हे गीत त्यांनी म्हटले असते, तर गुंडागर्दी करणाऱ्या तृणमूलच्या नेत्यांना सद्‌बुद्धी आली असती. ६० आमदार बाहेर पडल्यानंतर तृणमूल काँग्रेसला आपला मूळ पक्षाचा दर्जा आणि निवडणूक चिन्हही गमवावे लागण्याची शक्यता आता नाकारता येत नाही. महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांचे जे राजकीय हाल झाले, तेच पश्चिम बंगालमध्ये आता ममता बॅनर्जी यांचे होणार आहे, यात शंका नाही. ▮

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### सर्वसामान्यांना दिलासा हवा

एकीकडे अमेरिका-इराण आणि दुसरीकडे रशिया-युक्रेन, बलुचिस्तान -पाकिस्तान अशा सर्वत्र युद्धाच्या ज्वाळा उठल्या असताना दुसरीकडे या युद्धांच्या झळा मात्र जगातील कित्येक देशांतील सर्व सामान्य नागरिकांना सोसाव्या लागत आहेत. त्यामुळे गेल्या महिनाभरात देशात तीन ते चार वेळा इंधन दर वाढले. पंतप्रधान काटकसर करण्याचा सल्ला देत असले तरी दैनंदिन जीवनावर या महागाईचा प्रभाव पडलेला आहे. शासकीय नोकरदार आणि व्यावसायिक यांना या महागाईची झळ तितकी पोहचत नसली तरी सर्वसामान्य मजूर, खाजगी नोकरदार वर्ग मात्र यामध्ये भरडला जात आहे.

खाद्यपदार्थांचे भाव गगनाला भिडले असल्याने सर्वांचेच बजेट कोलमडले आहे. तिथेच आता एसटीची भाववाढ पण अटळ आहे. याआधीच टॅक्सी, ऑटोचालकांनी दरवाढ केलेली आहे. पुढे जरी इंधनाचे भाव उतरले तर वरीलपैकी कुणीच आपले दर कमी करणार नाही. जेव्हा इंधनवाढ झाली म्हणून भाडे वाढविले जाते, तिथे इंधन दरात घसरण झाल्यावर कमी का केले जात नाही? या सर्वसामान्य नागरिकांना पडलेल्या प्रश्नाचे उत्तर सध्यातरी सरकारकडे नाहीच. यात फायदा मात्र पेट्रोलियम कंपन्यांचा होतो. आधीच काटकसर करून जगणाऱ्या सामान्य नागरिकांना या महागाईतून दिलासा मिळेल, असे काही केंद्रातून करायला हवे.

**लीलाधर दवंडे**/८४१२८७७२२०

●● ●●

### उपलब्ध जलसंपत्तीचे जतन, संवर्धन आवश्यक

नागपुरात जलक्रांती परिषद नुकतीच पार पडली, यांत मान्यवरांच्या मार्गदर्शनाने जलसंधारण, जलसंवर्धनाचे महत्त्व विशद करण्यात आले. या परिषदेत कितीतरी कल्याणकारी संस्था जलसंवर्धनासाठी कार्यरत आहेत. शिवाय कितीतरी योजना येणाऱ्या काळात राबविल्या जातील. परंतु या देशाचे नागरिक म्हणून सामाजिक जाणिवेतून वाढत्या लोकसंख्येमुळे आणि हवामान बदलामुळे निर्माण होणारे जलसंकट टाळण्यासाठी काही कर्तव्य आपल्याला सुद्धा पार पाडणे आवश्यक आहे. पावसाचे पाणी अडवणे, पाण्याचा अपव्यय टाळणे आणि भूजलाची पातळी वाढविण्याकरिता उपाययोजनांवर कार्य करणे व समाजात, वस्तीत यासंबधाने प्रचार, प्रसार करून जनजागृती करणे गरजेचे असेल.

जलसंधारण संबंधीची माहिती, पाणी बचतीचे महत्त्व शालेय स्तरापासून मुलांमध्ये रुजविणे गरजेचे आहे तसेच वैयक्तिक पातळीवर पाण्याची बचत, उपयोग आणि वापर यासंबंधी जनजागृती होणे गरजेचे आहे.

सरकारणे सुद्ध जलक्रांती परिषदेत आलेल्या सूचनांची दखल घेऊन भूपृष्ठावरील पाण्याची पातळी वाढण्याकरिता कल्याणकारी संस्थेच्या माध्यमातून योजना राबवावी. जसे महामार्गाच्या आसपास किंवा परिसरात पाणी साठविण्याकरिता किंवा पाणी मुरवण्याकरता शास्त्रीय आणि कायदेशीर पद्धतीचा अवलंब करून महामार्गाच्या दुतर्फा पाण्याचा योग्य निचरा होणारी गटारे, स्टार्म वॉटर ड्रेन्स तयार करून पावसाचे पाणी वाहून न जाता जमिनीत मुरावे याकरिता शोष खड्डे किंवा रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टिम तयार करणे ही आजच्या काळाची गरज आहे तसेच या परिसरातील गावांच्या मदतीने महामार्गाच्या सुरक्षित अंतरावर शेत तलाव किंवा पाझर तलाव बांधावे अर्थात असे प्रकल्प कायदेशीर परवानगीने पूर्ण करण्यात यावे. यामुळे भूपृष्ठावरील पाण्याची पातळी वाढण्यास मदत होईल.

पर्यावरणाचा समतोल राखण्यास जलसंधारणासोबत वृक्षारोपण जास्तीत जास्त करणे आवश्यक आहे. कारण यामुळे झाडांच्या मुळांमुळे माती धरून ठेवली जाते ज्यामुळे पाण्याचा भूपृष्ठावरील वेग मंदावतो आणि पाणी जमिनीत मुरण्यास मदत होते.

**संजय श्रौती**/९८६०४५१८४०

●● ●●

### एसटी महामंडळाचा टोल-फ्री क्रमांक असावा

दररोज हजारो प्रवासी एसटी बसने प्रवास करतात, परंतु कधी कधी एसटी बसस्थानकावर केलेल्या फोनला उत्तर दिले जात नाही. वारंवार फोन करून प्रवासी थकून जातात, कारण त्यांच्या फोनला उत्तर दिले जात नाही. आमची परिवहन मंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी टोल-फ्री चौकशी सेवा सुरू करावी. प्रवाशांना दिलासा देण्यासाठी प्रत्येक एसटी बस थांब्यावरील वेळापत्रकावर टोल-फ्री क्रमांक प्रदर्शित करावा. आम्हाला आशा आहे की परिवहन मंत्री याकडे लक्ष देतील आणि प्रवाशांना भेडसावणाऱ्या अडचणी समजून घेतील. ▮



**राजेश कारिया**/अकोला

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# ‘त्या’ वाहकाची चौकशी करा; विभागीय नियंत्रकांचे पंढरपूर आगार व्यवस्थापकांना आदेश

## दिव्यांग प्रवाशाचा अपमान प्रकरण

## वैजिनाथ धेडे यांचा प्रशासनाला इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ जून -**

एसटी बसमध्ये दिव्यांग व्यक्तीसाठी राखीव जागेची मागणी केली असता देण्यास नकार देत दिव्यांगाचा अपमान करणाऱ्या मुजोर वाहकाविरुद्ध आणि फोन बंद ठेवून बेजबाबदारपणा दाखवणाऱ्या आगार व्यवस्थापकाविरुद्ध चौकशीचे आदेश दिले आहेत. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सोलापूर विभागीय नियंत्रकांनी पंढरपूर आगार व्यवस्थापकांना याप्रकरणी तात्काळ सखोल चौकशी करून अहवाल सादर करण्याचे कडक आदेश दिले आहेत.

काटेवाडी (ता.मोहोळ) येथील सामाजिक कार्यकर्ते वैजिनाथ धेडे हे दि. २५ मे रोजी पंढरपूर आगाराच्या बस क्रमांक एम एच १४ बीटी ३३७५ मधून प्रवास करत होते. तेव्हा एका दिव्यांग व्यक्तीसाठी राखीव आसनाची मागणी बस वाहकाकडे केली. मात्र, त्याने जागा उपलब्ध करून देण्यास नकार दिलाच, उलट दिव्यांगाबद्दल अनुद्गार काढून जाहीर अपमान केला. या गंभीर प्रकाराबाबत धेडे यांनी तात्काळ पंढरपूर आगार व्यवस्थापक आणि एडब्ल्युएस यांच्याशी फोनवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला; मात्र त्यांचा फोन बंद होता व त्यांनी कॉल स्वीकारला नाही. त्यामुळे संबंधित प्रवाशाला कामती ते सोलापूर असा संपूर्ण प्रवास उभे राहून, प्रचंड त्रास सहन करत करावा लागला.



**प्रशासनाकडून पत्राद्वारे खेद व्यक्त**

संतापजनक प्रकाराबाबत वैजिनाथ धेडे यांनी सोलापूर विभागीय कार्यालयात तक्रार दाखल केली होती. त्याची दखल घेत विभागीय नियंत्रकांनी धेडे यांना पत्र पाठवून झालेल्या त्रासाबद्दल रा.प.महामंडळातर्फे दिलगिरी व्यक्त केली आहे. तसेच संबंधित वाहक आणि बेजबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करून तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश पंढरपूर आगार व्यवस्थापकांना दिले आहेत. या बाबतचा अहवाल गुरुवारी वरिष्ठांकडे सादर करणार आहे. त्या दिवशी संबंधित एसटीबसमध्ये एकुण चार दिव्यांग प्रवासी प्रवास करीत होते. तीन दिव्यांग प्रवाशांना बसच्या वाहकाने अगोदरच जागा उपलब्ध करुन दिली होती. इतर प्रवाशांची तिकीट काढून तो पाठीमागून पुढे आला व संबंधित चौथ्या दिव्यांग प्रवाशालाही पुढे जागा उपलब्ध करुन दिली, असे पंढरपूर आगारप्रमुख योगेश लिंगायत यांनी सांगितले.

### तर थेट मंत्रालयात, कोर्टात जाणार

संबंधित प्रकरणात मला तात्काळ पूर्ण न्याय मिळाला पाहिजे. प्रशासनाने कागदी घोडे नाचवून दोषींना पाठीशी घालण्याचा प्रयत्न केला, तर परिवहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक , मुख्यमंत्री, परिवहन मंत्री यांच्याकडे दाद मागण्यात येईल. तसेच विभागीय नियंत्रक दालनात तीव्र आंदोलन, उपोषण करण्यात येईल. दोषींना थेट कोर्टात खेचले जाईल.

**- वैजिनाथ धेडे,सामाजिक कार्यकर्ते.**

### तांत्रिक अडचणीमुळे भ्रमणध्वनी बंद

आपला भ्रमणध्वनी रात्रंदिवस प्रवाशांच्या सोयीसाठी सुरु असतो. त्यामुळे संबंधित तक्रारदारांनी फोन केला तेव्हा आपल्या भ्रमणध्वनीमध्ये काहीतरी तांत्रिक अडचण आली असेल. बऱ्याच वेळा अशा तांत्रिक अडचणीमुळे भ्रमणध्वनी लागत नाही त्याला आपण कोणीच काही करु शकत नाही. त्यामुळे तो काही आपण मुद्दाम बंद करुन ठेवला असा तर्क काढणे चुकीचे आहे.

**- योगेश लिंगायत, आगारप्रमुख, पंढरपूर.**

## महत्वाचे...

### बाकलीवाल ट्युटोरियल्सचे जेईई परीक्षेत यश

**सोलापूर, दि. ३ जून-**

बाकलीवाल ट्युटोरियल्स, सोलापूरने यंदाच्या गएए अर्वीरपलशव २०२६ परीक्षेत आपली गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. संस्थेच्या ३१ विद्यार्थ्यांची खखढ प्रवेशासाठी निवड झाली आहे.



गएए अर्वीरपलशव २०२६मध्ये ३१ विद्यार्थ्यांची निवड; द्रुष्टी बाफना सोलापूर जिल्ह्यातून प्रथम अखिल भारतीय रँक (AIR) ३८११ , आयुष टोने सोलापूर जिल्हा दुसरा (AIR)७५३४ आणि कॅटेगरी रँक १७२५ तर पुष्कर पेशवे हा सोलापूर जिल्ह्यातून तिसरा आला आहे (AIR)७५६७ तसेच दिग्विजय हजारे कॅटेगरी रँक १५७१, वरद कोर्टीकर २०२०, प्रेम चव्हाण ३५३७ सानिका कारंडे ३५७०, अर्णव व्हटमुर्गे ४१५१ या विद्यार्थ्यांनी ही चमकदार कामगिरी केलेली आहे. बाकलीवाल ट्युटोरियल्सच्या सेन्टर हेड अभिषेक सिन्हा सरानी सांगितले की, ३१ निवडी ही आकडेवारी आमच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची साक्ष आहे आणि आमच्या संस्थेच्या इतिहासातील एक विशेष टप्पा आहे. गएए अर्वीरपलशव २०२६ मध्ये निवड झालेल्या काही विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे - तनिश शाह, आयुष लिगाडे, अरहान वरेरकर, सानिका कारंडे, यशवर्धन राजमाने, श्रीपाद कोरे सिद्धांत बिरादार, दिवीशा संकलेचा इत्यादी.




### आदिला नाला परिसरातील रेड-ब्ल्यू लाईनचा प्रश्न मार्गी लावा; चंदनशिवे यांचे निवेदन

**सोलापूर, दि. ३ जून-**

सोलापूर महानगरपालिका हद्दीतील आदिला नाला परिसरालगत राहणाऱ्या हजारो नागरिकांवर ओढवलेल्या रेड व ब्ल्यू लाईनच्या संकटाबाबत तातडीने हस्तक्षेप करून बांधकाम परवानग्या पूर्ववत सुरू कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. निवेदनात चंदनशिवे यांनी म्हटले आहे की, सोलापूर शहरातील हिप्परगा तलाव ते देगाव परिसरादरम्यान सुमारे १४ किलोमीटर लांबीच्या आदिला नाला परिसरातील हजारो प्लॉटधारक व नागरिकांचे भवितव्य सध्या अनिश्चिततेत सापडले आहे. गेल्या वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे या भागात पाणी साचले होते. मात्र, यासाठी नाल्यांची अपुरी साफसफाई, रुंदीकरणाचा अभाव तसेच रेल्वे मार्गाजवळ निर्माण झालेला पाण्याचा अडथळा कारणीभूत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. महानगरपालिका प्रशासन स्वतःच्या नियोजनातील त्रुटी झाकण्यासाठी या परिसरावर रेड व ब्ल्यू लाईनचे निर्बंध लादत असल्याचा आरोपही त्यांनी केला. आपत्ती व्यवस्थापन कायद्याचा चुकीचा वापर करून नागरिकांना वेठीस धरले जात असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. यावेळी ओएसडी आनंद रामटेके तसेच इथॉस रियालिटीचे संचालक तुकाराम गायकवाड उपस्थित होते.

# ज्ञानेश्वर माउलींची अमृतवाणी गर्जणार ७५० भक्तांच्या मुखातून

## श्री सिध्देश्वर फाउंडेशनतर्फे ५ ते १२ जूनदरम्यान ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माउली यांच्या ७५० व्या जयंतीनिमित्त आणि अधिक मासाच्या औचित्याने श्री सिद्धेश्वर फाउंडेशनतर्फे ७५० भक्तांच्या सहभागातून ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा ५ ते १२ जूनदरम्यान जामगुंडी लॉन्स येथे संपन्न होणार असल्याची माहिती सोहळा समितीचे अध्यक्ष सतीश मालू आणि डॉ.अनिल सर्जे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



सोहळ्याचे उद्घाटन ५ जून रोजी दुपारी १ वाजता आळंदी येथील श्री ज्ञानेश्वर माउली देवस्थानचे मुख्य विश्वस्त योगी निरंजननाथ यांच्या हस्ते होणार आहे. तर १२ जून रोजी काल्याच्या कीर्तनासाठी विठ्ठल-रुक्मिणी देवस्थानचे अध्यक्ष सद्गुरू ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर उपस्थित राहणार आहेत. कीर्तनानंतर अयोध्येचे जगद्गुरू डॉ. राघवाचार्य यांचे आशीर्वचन होणार आहे.

या पारायणाचे नेतृत्व ह.भ.प. काशीनाथ महाराज सर्जे करणार असून ९ ते ८३ वर्षे वयोगटातील भाविक सहभागी होणार आहेत. दररोज दुपारी २ ते सायंकाळी ७ या वेळेत पारायण होईल. सहभागी भाविकांसाठी अल्पोपहार, चहा व सरबताची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच ज्यांच्याकडे ज्ञानेश्वरी ग्रंथ उपलब्ध नाही, अशा सर्वांना ग्रंथ भेट स्वरूपात देण्यात येणार असून ही सेवा सीमाताई खोडके यांनी दिली आहे.लोकसहभागातून होत असलेल्या या सोहळ्यासाठी विविध भक्तांनी योगदान दिले आहे. सोहळ्याच्या समारोपानिमित्त १२ जून रोजी सकाळी ७ वाजता आसरा दत्त मंदिरापासून ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. त्यानंतर कीर्तन, आशीर्वचन आणि महाप्रसादाचा कार्यक्रम होईल. या धार्मिक सोहळ्याचा लाभ सोलापूरातील सर्व भजनी मंडळे, वारकरी संप्रदायातील भाविक आणि नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन श्री सिद्धेश्वर फाउंडेशनचे मार्गदर्शक नामदेव पुकळे आणि डॉ. अनिल सर्जे यांनी केले. या पत्रकार परिषदेला सिद्धार्थ सर्जे, राजेंद्र बलसुरे, दत्तात्रय पाठक, दिलीप पोतदार , गुरुलिंग कल्लूरकर आदी उपस्थित होते.

# तेलुगु मराठी साहित्यिक संस्था अध्यक्षपदी प्रा.गुंडेली; सचिवपदी इंगळे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

कविवर्य डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली व कविवर्य माधव पवार यांचे मार्गदर्शन व प्रेरणेतून ‘तेलुगु मराठी साहित्यिक संस्था, सोलापूर‘ची स्थापना केली असून कार्यकारणीच्या अध्यक्षपदी कवी प्रा.नरेंद्र गुंडेली, उपाध्यक्षपदी साहित्यिक राजेंद्र भोसले, मुख्य सचिवपदी लेखक कवी दत्तात्रय इंगळे, सहसचिवपदी कवयित्री रेणुका बुधारम, खजिनदारपदी कवी विठ्ठल टाक तर सदस्यपदी कवी विजयकुमार सोनवणे, प्रभाकर भिमनाथ यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

संस्थेची सुरवात म्हणून संस्थेचे कार्यकरणी सदस्य कवी विजयकुमार सोनवणे यांचे काव्य संग्रह ‘जना मनाचा हुंकार‘ या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मान्यवरच्या हस्ते करण्यात येणार आहे. तसेच याच कार्यक्रमात चाळीस मान्यवर कवीचे कविसंमेलन आयोजित केले आहे. वरील कार्यक्रम व संस्थेच्या शुभारंभाचा कार्यक्रम गुरूवार दि. १८ जून रोजी दुपारी ४ ते रात्री ९ च्या दरम्यान कन्ना चौक येथील पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय येथे होणार आहे.

कार्यक्रमासाठी अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठाचे डॉ. श्री शिवाजीराव शिंदे, श्री गोविंद काळे(सार्थ अहिल्या गाथाकार), श्रुतिश्री वडगबाळकर (अध्यक्ष म. सा. प.सोलापूर), अॅड. श्रीनिवास क्यातम (अध्यक्ष पद्मशाली शिक्षण संस्था) दशरथ गोप (सचिव पद्मशाली शिक्षण संस्था, सोलापूर) युवराज मेटे (प्राचार्य, कुचन प्रशाला कनिष्ठ महाविद्यालय व्यवसाय शिक्षण) प्रा. अनिल निंबाळकर (उपप्राचार्य कुचन प्रशाला कनिष्ठ महाविद्यालय व्यवसाय शिक्षण) श्री मल्लिकार्जुन कमटम(अध्यक्ष तेलुगु भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालयम), पांडुरंग दिड्डी (अध्यक्ष- पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय), जेष्ठ लेखक कवी राजेंद्र भोसले, श्री गोपीकृष्णा वड्डेपल्ली(उपाध्यक्ष- उत्कर्ष वाचनालय), लेखिका कवयित्री वंदना कुलकर्णी, धोंडिबा नारायणकर (अध्यक्ष कक्कया समाज सोलापूर), लेखक बाबुराव इंगळे, दस्तगीर जमादार(कादंबरीकार), लेखिका व कवयित्री राजश्री जाधव यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होत आहे.




या कार्यक्रमास सोलापूर व परिसरातील साहित्यिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन संस्थचे अध्यक्ष प्रा. नरेंद्र गुंडेली व मुख्य सचिव दत्तात्रय इंगळे यांनी केले आहे.

# प्राचार्य म्हमाणे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

एसव्हीसीएस हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य संगप्पा म्हमाणे हे ३२ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले त्यानिमित्त काशी जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृत हस्ते सपत्नीक सत्कार थाटात संपन्न झाला. प्रारंभी श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजी व तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. उपमुख्याध्यापक धनंजय नकाते यांनी प्रास्ताविक केले. यावेळी आपल्या आशीर्वाचनातून काशी जगद्गुरु म्हणाले, प्राचार्य संगप्पा म्हमाणे उत्तम प्रशासक, प्रतिभाशाली व्यक्तिमत्व व स्पष्ट वक्तेपणा यांचा त्रिवेणी संगम असून एक शिस्तप्रिय मुख्याध्यापक म्हणून शाळेच्या व संस्थेच्या कार्यात एकसूत्रीपणा आणला आहे. त्यांचे हे कार्य एका दीपस्तंभाप्रमाणे सर्व कर्मचाऱ्यांना प्रेरणादायी व दिशादर्शक ठरेल असे गौरवोद्गार काढले. नाशिक विभागाचे शिक्षण उपसंचालक संजय राठोड म्हणाले, म्हमाणे सरांनी एमआयडीसी शाळेची ओळख शहरातील एक सुंदर व गुणवत्ता पूर्ण शिक्षण देणारी शाळा म्हणून केलेली असून संस्थेची जबाबदारी ही यशस्वीरित्या पेलत असल्याचे सांगितले. यावेळी राज्याचे माजी शिक्षण संचालक गंगाधर म्हमाणे, माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप, सहसंचालक बसवेश्वर पाटील, उपशिक्षणाधिकारी प्रकाश नांगरे, विठ्ठल ढेपे, कोषागार अधिकारी डॉ.वैभव राऊत, डाइटचे प्राचार्य नदाफ, उ.सोलापूरचे गटशिक्षणाधिकारी अविचल महाडीक, माजी गटशिक्षणाधिकारी मल्हारी बनसोडे, विस्तार अधिकारी बापूसाहेब जमादार, गोदावरी राठोड, शेळगी केंद्राचे केंद्रप्रमुख चंद्रकांत वाघमारे आदींनी म्हमाणे सरांचे शाळेतील विविध उपक्रम, समयसूचकता, कागदपत्रांची पूर्तता याबद्दल आपल्या मनोगतातून स्तुती केली. सूत्रसंचालन सहशिक्षिका रोहिणी कल्याणशेट्टी यांनी तर पर्यवेक्षक केदार पटणे यांनी आभार मानले.



# कामचुकार ५७ अधिकारी-कर्मचाऱ्यांना ठोठावला ४५ हजार रुपयांचा दंड

**सोलापूर, दि. ३ जून-**

आपली तक्रार पोर्टल/ माय सोलापूर नागरिकांच्या तक्रारीच्या ॲपवरील तसेच लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत नागरिकांच्या अर्जाचे निराकरण मुदतीत न करणे, केलेल्या कार्यवाहीची माहिती अद्ययावत न करणे या कामकाजातील निष्काळजीपणासाठी महापालिकेच्या ५७ अधिकारी व कर्मचाऱ्यांवर ४५ हजार रुपये दंड आकारला आहे. महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी कारवाईचे आदेश काढले आहेत.

नागरिकांनी नोंदवलेल्या अधिसूचित सेवा वेळेत न निकाली काढणाऱ्या आणि तक्रारी प्रलंबित ठेवणाऱ्या महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांवर दंडात्मक कारवाई केली आहे. ॲपवरील प्रलंबित तक्रारी प्रकरणी २६ अधिकारी व कर्मचाऱ्यांना ९ हजार ५०० रुपये दंड आकारला आहे. लोकसेवा हक्क अधिनियम अंतर्गत अर्ज प्रकरणी ३१ अधिकारी व कर्मचाऱ्यांवर ३५ हजार ५०० रुपये दंडात्मक कारवाई केली आहे. सोलापूर महानगरपालिकेने एकूण ५७ अधिकारी-कर्मचाऱ्यांवर आर्थिक दंड आकारला असून एकूण ४५ हजार रुपयांचा दंड वसूललीचे आदेश आशिष लोकरे यांनी दिले आहेत. हा दंड त्यांच्या जून महिन्याच्या वेतनातून वसूल करणार आहे.

### जेईई ॲडव्हान्समध्ये जोशी महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांची निवड




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

जेईई ॲडव्हान्स २०२६ परीक्षेच्या निकालात ए. डी. जोशी ज्यू कॉलेज महाविद्यालयातील प्रणिती पोळ आणि प्रवर्जित गाडे यांची आयआयटीमध्ये निवड झाली. या दोन्ही विद्यार्थ्यांनी भारतीय तंत्रज्ञान संस्थामध्ये प्रवेश मिळवला आहे. विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे आयएमएस समूहाचे ए. डी. जोशी संस्थापक अध्यक्ष अमोल जोशी, सचिवा सायली जोशी, प्राचार्य प्रविण देशपांडे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**क्वॉटर्समधील विजेची कामे**

वरिष्ठ मंडळ विद्युत अभियंता (General), मध्य रेल्वे, सोलापूर हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी खालील कामांकरिता नामांकित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रॉक्युअरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. टेंडर क्रमांक SUR/ L/T/2026/07 असून कामाचे नाव सोलापूर विभागातील खालील कामांशी संबंधित इलेक्ट्रिकल जनरल सर्व्हिस पोर्शनचे काम असे आहे. या अंतर्गत सोलापूर स्टेशन येथे 6 नग टाईप - IV आणि 8 नग टाईप-III निवासी क्वॉर्टर्सचे बांधकाम केले जाईल. तसेच वाडी (टाईप III - 4 नग), शहाबाद (टाईप II - 4 नग, टाईप III - 2 नग), मार्तूर (टाईप II - 4 नग) आणि नागणसूर (टाईप II - 4 नग) येथे निवासी क्वॉर्टर्सचे बांधकाम समाविष्ट आहे. यासोबतच केम (टाईप II - 4 नग), जेऊर (टाईप II - 4 नग), भाळवणी (टाईप II - 4 नग), वाशिंबे (टाईप II - 4 नग) आणि सोलापूर (टाईप III - 8 नग), वाडशिंगे (टाईप II - 4 नग), माढा (टाईप II - 4 नग), मवे/माहुली (टाईप II - 4 नग) येथे निवासी क्वॉर्टर्स बांधण्यात येतील. होटगी (टाईप III - 2 नग, टाईप II - 8 नग), दुधनी (टाईप II - 4 नग) व अक्कलकोट रोड (टाईप II - 4 नग) येथील निवासी क्वॉटर्सच्या बांधकामाचाही यात समावेश आहे. सोलापूर विभागातील सुगर (टाईप II - 4 युनिट्स), जठारवाडी (टाईप-II - 4 युनिट्स), आरग (टाईप-II - 4 युनिट्स), यळवी (टाईप II - 2 युनिट्स) आणि ढवळास (टाईप II - 2 युनिट्स) येथे नवीन क्वॉर्टर्सचे बांधकाम केले जाणार आहे. या कामाचा अंदाजित खर्च रु. 1,88,22,765.77/- असून बयाणा रक्कम रु. 3,76,500/- निश्चित करण्यात आली आहे. काम पूर्ण करण्याचा कालावधी 12 महिने असून ऑफरची वैधता 60 दिवसांची राहील. वेबसाइटवर टेंडर बंद होण्याची तारीख आणि वेळ 29/06/2026 रोजी दुपारी 15.00 वाजता (3:00 वाजता) आहे. बयाणा रकमेचा भरणा www.ireps.gov.in या वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे करावा लागेल.

**वरिष्ठ मंडळ विद्युत अभियंता (जी),**
**मध्य रेल्वे, सोलापूर.**
DE/Sur-25

सुरक्षित प्रवास करा,
फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.

**जाहीर प्रसिध्दीकरण**

सि. कि. अर्ज नं. ३३१/२०२६
नि. ७

**सोलापूर येथील सिव्हील जज्ज सिनियर डिव्हीजन (वनकोरे साहेब) यांचे कोर्टात**

१) **श्रीमती मनिषा लिंबाजी (पती) पारदे**
वय : ४३ वर्षे, धंदा : नोकरी
२) **पृथ्वीराज (पिता) लिंबाजी पारदे**
वय : १७ वर्षे, धंदा : शिक्षण
३) **विश्वराज (पिता) लिंबाजी पारदे**
वय : १० वर्षे, धंदा : शिक्षण
रा. २७, निर्मिती विहार,
विजापूर रोड, सोलापूर
— **अर्जदार**

विरूध्द

**कोणी नाही** - **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार क्रं. १ यांचे पती व नं. २ ते ३ यांचे वडील हे दि. ०९/०७/२०२१ रोजी सोलापूर येथे मयत झालेले आहेत. मयत लिंबाजी सुभानराव पारदे हे शहर सोलापूर येथील कायमचे रहीवासी होते. त्यांना अर्जदार नं. १ ते ३ यांचेशिवाय कोणीही नजीकचे व कायदशीर असे वारस नाहीत.

मयत लिंबाजी सुभानराव पारदे यांचे मृत्यूनंतर त्यांचे पश्चात त्यांचे नावावरील भविष्य निर्वाह निधी रक्कम रु. ५,२६,२६२/-, कुंटुब निवृत्ती वेतन रक्कम रु. १८,६६०/- व रक्कम रू. ग्रॅच्युएटी रक्कम रु. १४,००,०००/- मिळणेसाठी प्रस्तुतचा वारस दाखला अर्ज, अर्जदार यांनी दाखल केलेला आहे.

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना मयत लिंबाजी सुभानराव पारदे त्यांचे नावावरील भविष्य निर्वाह निधी रक्कम रु. ५,२६,२६२/-, कुंटुब निवृत्ती वेतन रक्कम रु. १८,६६०/- व रक्कम रू. ग्रॅच्युएटी रक्कम रू. १४,००,०००/- मिळणेसाठी सक्सेशन सर्टिफिकेट देणेस कोणाची काही हरकत व तक्रार असल्यास त्यांनी नेमलेली तारीख दि. ०६/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता स्वतः अगर आपल्या वकिलांमार्फत या न्यायालयात हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे. तसेच वरील मुदतीत कोणाची काही तक्रार न आल्यास सदर अर्जावर योग्य तो आदेश केला जाइल याची नोंद घ्यावी. ता. ०२/०६/२०२६

कोर्टाचा शिक्का
**सही/-**
**अधीक्षक**

### चुकीची दुरुस्ती

दै. ‘तरुण भारत’मध्ये दि. ०३ जून २०२६ रोजी लोकमंगल नागरी पतसंस्था मर्या., सोलापूर यांचे स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीसमध्ये स्थळ सांगोला असे प्रसिध्द करण्यात आले. त्या जाहिरातीमध्ये स्थळ **सांगोला** ऐवजी **सोलापूर** असे वाचण्यात यावे.

**जाहीरात व्यवस्थापक**

**जाहीर सूचना**

या जाहीर सूचनेद्वारे जनतेला आवाहन करण्यात येत आहे की परिशिष्टात नमूद मिळकत श्री. नथन गंगाराम मंजाळ आणि सौ. नागरबाई नथन मंजाळ, यांनी श्री. विकास राम मांजळ याचे नावे बक्षीसपत्राने हस्तांतर केलेला आहे आणि ती मिळकत तारण (Mortgage) ठेवण्याचा प्रस्ताव जना स्मॉल फायनान्स बँक लि. शाखा सोलापूर, यांचेकडे दिला असून, आमचे अशिल बँकेने सदर कर्ज मंजूर करण्याची तयारी दर्शविलेली आहे.

सदर मिळकत निर्बंधरहित, निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व हमी मिळकतीच्या पूर्व आणि सद्य मालकांनी दिलेला आहे.

तरी, सदर मिळकतीवर, कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा, हक्क, हिस्सा, हितसंबंध, वाद, अगर कर्ज प्रकरणास हरकत किंवा आक्षेप असल्यास, त्यांनी ही जाहीर सूचना प्रसिध्द झालेपासून चौदा (१४) दिवसांच्या आत, खालील नमूद पत्यावर कागदपत्रांसह लेखी हरकत नोंदवावी. मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

जिल्हा सोलापूर, तालुका - दक्षिण सोलापूर, पैकी मौजे उळे, येथील ग्राम पंचायत मिळकत क्र. ४८९, यासी क्षेत्र ९०० चौ.फू., ची मिळकत.

ही जाहीर सूचना प्रसिद्ध केली दि. ०३/०६/२०२६

**सही/-**
**ॲड. गणेश वसंत कटारे**
**ॲड. मंजुषा ग. कटारे (लोखंडे)**
**कार्यालय क्र. ११, पहिला मजला,**
**स्क्वेअर-वन कॉम्प्लेक्स,**
**१३१, सिध्देश्वर पेठ, सोलापूर-०३**
**मोबाइल क्र. ९८६०११००११**

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
इंद्रभुवन, पुण्यश्लोक अप्पासाहेब वारद पथ, रेल्वे लाईन्स, सोलापूर

**जाहिर प्रसिध्दीकरण**

पावसाळ्याच्या दिवसांत वादळीवारे व पावसामुळे शहरातील जुनी आणि कुमकुवत घरे / चाळी इमारती पावसाच्या माऱ्यामुळे पडण्याची शक्यता असते. तसेच झाडे, इलेक्ट्रीकल पोल इत्यादी कोसळण्याची शक्यता असते. अशा धोक्यामुळे जिवीत व वित्तहानी संभवते. सदर बाबी टाळणेसाठी खालीलप्रमाणे खबरदारी नागरीकांनी घ्यावी.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये आपल्या इमारतीची वेळोवेळी तज्ञ इंजिनिअरकडून पाहणी करवून घेऊन इमारत अथवा इमारतीचा प्रत्येक भाग सुस्थितीत राखण्याची जबावदारी संबंधीत घर मालकांनी / भोगवटदारांनी पाहणीनुसार आवश्यक पाडकाम स्वतः करुन घेणे अथवा दुरुस्त्या महानगरपालिकेची पुर्व परवानगी घेऊन करणे आवश्यक आहे. तसेच धोकादायक इमारतीमधील रहिवाशांनी अशा इमारतीमधून स्थलांतरीत होऊन सुरक्षित ठिकाणी रहिवास करणेबाबत देखील याद्वारे आवाहन करण्यात येत आहे.

यापूर्वी महानगरपालिकेकडून शहरातील ३० वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या इमारतीची रचनात्मक स्थैर्य प्रमाणपत्र (Structural Stability) महानगरपालिकेकडील नोंदणीकृत रचनाकार अभियंता यांचेकडून तपासणी करुन घेऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व शासनाच्या मंजुर एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० मध्ये २.१.७ Repairs to Building तरतूद असून सदर तरतुदीप्रमाणे सोलापूर महानगरपालिकेस कळवून परवानाधारक आर्कटिक्ट. लायसन्स इंजिनिअर / स्ट्रक्चरल इंजिनिअर यांच्या देखरेखीखाली आवश्यकतेप्रमाणे धोकादायक भागाची दुरुस्ती करुन घ्यावी. नोंदणीकृत स्ट्रक्चरल इंजिनिअर/परवानाधारक इंजिनिअर यांची यादी नगर रचना कार्यालयाकडे नागरीकांकरीता उपलब्ध करण्यात आलेली आहे.

एखाद्या इमारतीचा भाग अचानक कोसळल्यास झाडे, पोल, इत्यादी पडल्यास अग्निशामक दल फोन नं. २७४०३६४ व ६८, १०१. नगर अभियंता स्टोअर ०२१७-२७४०३३५. या कार्यालयांना नागरीकांनी त्वरीत कळवावे.

तरी सर्व घर मालकांनी, भोगवटदारांनी व नागरीकांनी पावसाळ्यात इमारती झाडे व इलेक्ट्रीकल पोलपासून होणारा संभाव्य धोका टाळण्यास आणि जिवीत व वित्तहानी होऊ न देण्यास सोलापूर महानगरपालिकेस सहकार्य कारावे.

**सही/-**
**डॉ. सचिन ओंबासे (भा.प्र.मे.)**
**आयुक्त,**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## राज्य डायव्हिंग स्पर्धेत श्रावणी सूर्यवंशीची ५ 'सुवर्ण'ची कमाई



**सोलापूर, दि. ३ जून-** येथील मार्कंडेय जलतरण तलावावर झालेल्या राज्य डायव्हिंग स्पर्धेत येथील श्रावणी प्रताप सूर्यवंशी हिने ५ सुवर्ण पदकांची कमाई केली आहे. श्रावणी सूर्यवंशी हिने १ मीटर स्प्रिंगबोर्ड, ३ मीटर स्प्रिंगबोर्ड, हाईबोर्डमध्ये अनुक्रमे २४६.८५, २९३.२५, ३०४.४० गुणासह ३ सुवर्ण पदके आपल्या नावावर केली. तसेच मुंबई येथिल गोरेगांव स्पोर्ट्स क्लब येथे झालेल्या राज्य स्पर्धेतही श्रावणीने ३ मीटर स्प्रिंगबोर्ड व हाईबोर्डमध्ये अनुक्रमे १५१.३० व १८२.०५ गुणासह २ सुवर्ण पटकाविली. तिला आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक श्रीकांत शेटे यांचे मार्गदर्शन लाभले.

**आतापर्यंत ७२ पदकांची कमाई**

श्रावणीने आजपर्यंत शालेय आणि फेडरेशनच्या राज्य स्पर्धेत ३० सुवर्ण, ६ रौप्य, १ कांस्य व राष्ट्रीय पातळीवर २० सुवर्ण, ५ रौप्य २ कांस्य तर आतंरराष्ट्रीय २ सुवर्ण, ४ रौप्य व २ ब्रॉंझ अशी एकूण ५२ सुवर्ण, १५ रौप्य, ५ कांस्य अशी ७२ पदकांची कमाई केली. अवघ्या १७व्या वर्षात तिने ही कामगिरी केली आहे.

# प्रज्ञानंदची विजेतेपदाकडे कूच

### ■ नॉर्वे बुद्धिबळ ■ कार्लसेनला पुन्हा धक्का ■ विश्वविजेत्या गुकेशच्या आशा संपुष्टात

**ओस्लो, ३ जून**

भारताचा युवा ग्रॅण्डमास्टर आर. प्रज्ञानंदने, स्थानिक हिरो आणि प्रथम विश्वमानांकित मॅग्नस कार्लसेनला पुन्हा एकदा जबरदस्त धक्का दिला. नॉर्वे बुद्धिबळ २०२६ स्पर्धेत या नॉर्वेच्या कार्लसनचा क्लासिकल प्रकारातील डावात दुसऱ्यांदा पराभव करून आर. प्रज्ञानंदने या प्रतिष्ठित स्पर्धेचा पहिला भारतीय विजेता होण्याच्या आपल्या दाव्याला अधिक बळ दिले आहे. गुकेशचा फिरौझाकडून पराभव विश्वविजेत्या डी. गुकेशच्या विजेतेपदाच्या आशा संपुष्टात आल्या.

आठव्या फेरीत गुकेशला फ्रान्सचा ग्रॅण्डमास्टर अलीरेझा फिरौझाकडून पुन्हा एकदा मोठा पराभव स्वीकारावा लागला. या पराभवामुळे तो गुणतालिकेत आठ गुणांसह तळाच्या स्थानावर फेकला गेला आहे. तसेच, २०२४ मध्ये विश्वविजेतेपद पटकावल्यानंतर सुरू झालेली त्याची वाईट कामगिरीची मालिका रोखण्यात त्याला अद्यापही यश आलेले नाही. प्रज्ञानंद या वर्षी क्लासिकल डावांमध्ये कार्लसेनचा दोनदा पराभव करणारा एकमेव खेळाडू ठरला आहे; या कामगिरीने त्याचे वाढते महत्त्व व दर्जा अधोरेखित झाला




आहे. स्पर्धेच्या आणखी दोन फेऱ्या बाकी असताना, या विजयामुळे २० वर्षीय प्रज्ञानंद १२ गुणांसह गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे. १३ गुणांसह अलीरेझा दुसऱ्या स्थानावर आहे, तर अमेरिकन ग्रॅण्डमास्टर वेस्ली सो हा जर्मनीच्या व्हिन्सेंट कीमरवर आर्मागेडन टाय-ब्रेकमध्ये विजय मिळवून १४ गुणांसह अजूनही गुणतालिकेत अव्वल स्थानी कायम आहे.

बुधवारच्या विश्रांतीच्या दिवसानंतर होणाऱ्या नवव्या व स्पर्धेतील शेवटच्या आधीच्या फेरीत, प्रज्ञानंद गुकेशविरुद्ध खेळेल. पराभवासह दिव्याची घसरण नॉर्वे महिला बुद्धिबळ स्पर्धेच्या आठव्या फेरीत दोन निर्णायक क्लासिकल सामने व एका आर्मागेडन लढतीचा निकाल लागला. या फेरीत बिबिसारा असाउबायेवाने विजेतेपदाच्या शर्यतीवरील आपली पकड अधिकच मजबूत केली. कझाकस्तानच्या या खेळाडूने दिव्या देशमुखवर क्लासिकल प्रकारात महत्त्वपूर्ण विजय मिळविला. भारतीय खेळाडू दिव्याला वेळेच्या कमतरतेमुळे अडचणींचा सामना करावा लागल्यानंतर बिबिसाराने सामन्याचे चित्रच पालटून टाकले आणि पूर्ण तीन गुण आपल्या खात्यावर जमा केले. चीनच्या झू जिनरनेही क्लासिकल प्रकारात विजय नोंदवला. तिने विद्यमान महिला विश्वविजेती जू वेनजुनचा पराभव करीत १० गुणांसह दिव्याच्या बरोबरीने स्थान मिळवले. विद्यमान विजेती ॲना मुझीचुक आणि कोनेरू हम्पी यांच्यातील क्लासिकल सामना बरोबरीत सुटला. त्यानंतर झालेली आर्मागेडन लढतही बरोबरीतच संपली; मात्र हम्पीकडे काळ्या मोहर असल्याने तिला नियमानुसार बोनस गुण मिळाले. स्पर्धेच्या केवळ दोन फेऱ्या बाकी असताना, बिबिसारा १५.५ गुणांसह आघाडीवर आहे. तिच्या पाठोपाठ १०.५ गुणांसह मुझीचुक दुसऱ्या स्थानावर आहे, तर दिव्या आणि झू या दोघीही १० गुणांसह बरोबरीच्या स्थितीत आहेत.




## 'पानगल'च्या निकहत बागवानला राष्ट्रीय शूटिंग व्हॉलिबॉल स्पर्धेत सुवर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

आंध्रप्रदेश गुंटूर येथील दोस्ती क्लब हसनापूर यांच्या वतीने बापटला एप्पल मैदानावर झालेल्या झालेल्या ४४व्या खुल्या राष्ट्रीय शूटिंग व्हॉलीबॉल स्पर्धेत महाराष्ट्राने सुवर्ण पदक पटकाविले. या संघात एम. ए. पानगल अँग्लो उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या निकहत हसन बागवान हिचा समावेश होता. महाराष्ट्र संघाने अंतिम सामन्यात तामिळनाडूचा २-० असा पराभव केला. तिचे प्राचार्य डॉ. हारून रशीद बागबान, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, क्रीडा शिक्षक नावेद मुन्शी, इक्बाल दलाल, अल्ताफ सिद्दिकी व सोलापूर शूटिंग बॉल असोसिएशनचे फैज अहमद बेगमपुरे, बागवान जमियतचे सर्व मित्र परिवाराने अभिनंदन केले.

## नॅशनल स्पोर्ट्स ऑफ इंडियाच्या रन स्पर्धेत साईश्वर गुंटूक प्रथम




**सोलापूर, दि. ३ जून-** राजस्थान स्पोर्ट्स ऑफ इंडियातर्फे आयोजित करण्यात आलेल्या नॅशनल स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडिया या स्पर्धेत राष्ट्रीय धावपटू साईश्वर केशव गुंटूक याने १६ वर्षांखालील गटात प्रथम क्रमांक पटकाविला. या स्पर्धेत साईश्वरने १० किलोमीटर अंतर ३५ मिनिटे ९ सेकंदात ही स्पर्धा पूर्ण केले. साईश्वरला नॅशनल स्पोर्ट्स क्लब तर्फे ट्रॉफी, मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. साईश्वर गेल्या ८ ते ९ वर्षापासून लांब पल्ल्याचे धावण्याचा सराव करत आहे. साईश्वरला सिनियर ऑलिंपियन केशवराज सिंह यांचे मार्गदर्शन लाभत आहे. त्याचे जुळे सोलापूर येथील स्वामी विवेकानंद प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य अंबादास पांढरे, प्राचार्य चिदानंद माळी, क्रीडा प्रशिक्षक कृष्णा कोळी आदींनी अभिनंदन केले.

# 'मास्टर्स रॉयल्स' संघास विजेतेपद

### मास्टर्स क्रिकेट अकॅडमी आंतर अकॅडमी स्पर्धा: धनराज बंदपट्टे 'सामनावीर' आणि 'मालिकावीर'



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

येथील मास्टर्स क्रिकेट अकॅडमीच्या क्रीडांगणावर आयोजित केलेल्या आंतर अकॅडमी क्रिकेट स्पर्धेत 'मास्टर्स रॉयल्स' संघाने अंतिम सामन्यात अटीतटीच्या लढतीत मास्टर्स चॅलेंजर्सचा ३ गडी राखून पराभव करत स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

अंतिम सामन्यात मास्टर्स चॅलेंजर्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र, मास्टर्स रॉयल्सच्या अचूक गोलंदाजीसमोर त्यांचा डाव २२.५ षटकांत सर्वबाद १०५ धावांवर आटोपला. चॅलेंजर्सकडून फलंदाजीत विरेश मठपतीने ५१ धावांची उत्कृष्ट अर्धशतकी खेळी केली, तर लाव्या दुर्गमने १९ धावांचे योगदान दिले. रॉयल्सतर्फे घातक गोलंदाजी करताना धनराज बंदपट्टे याने ५.५ षटकांत अवघ्या १९ धावा देत ७ बळी मिळवले आणि प्रतिस्पर्धी संघाला बॅक्फूटवर ढकलले.

विजयासाठी आवश्यक असलेल्या १०६ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना मास्टर्स रॉयल्स संघाने २२.३ षटकांत ७ गड्यांच्या मोबदल्यात १०७ धावा करत विजय साकारला. यामध्ये धनराज बंदपट्टे याने फलंदाजीतही चमक दाखवत ३६ धावा केल्या, तर मडीअप्पाने २२ धावांची उपयुक्त खेळी केली. मास्टर्स चॅलेंजर्सकडून गोलंदाजीत जानवी हिरेमठ हिने ५ षटकांत १७ धावा देऊन ३ बळी मिळवले, मात्र ती आपल्या संघाचा पराभव टाळू शकली नाही. अखेर मास्टर्स रॉयल्सने ३ गडी राखून चषकावर आपले नाव कोरले.

स्पर्धेच्या विजेता आणि उपविजेता संघातील सर्व खेळाडूंना राजेश बुरा, जगदीश पाटील काका, दत्तात्रय बडगू, चंद्रशेखर उदगिरी, राजेश येमुल आणि राजवर्धन जिल्हा यांच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात आली.

या स्पर्धेत पंच म्हणून नबीलाल पटेल व दर्शन करली यांनी तर गुणलेखक म्हणून निर्विक बनसोडे यानी काम पहिले.

**वैयक्तिक पुरस्कार विजेते खेळाडू**

सामनावीर : धनराज बंदपट्टे, मालिकावीर : धनराज बंदपट्टे, फलंदाज: विरेश मठपती, गोलंदाज: अयान नदाफ, क्षेत्ररक्षक: जानवी हिरेमठ, यष्टीरक्षक : मयूर इंगळे



# रोहन केवडे 'अहिल्या केसरी'चा मानकरी

### पु. अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त कुस्ती स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ जून-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त पाथरी येथे झालेल्या कुस्ती स्पर्धेत रोहन केवडे 'अहिल्या केसरी'चा मानकरी ठरला.

या कुस्ती मैदानात १०० रुपयांपासून ते ५ हजार रुपयांपर्यंतच्या अनेक चुरशीच्या कुस्त्या रंगल्या. मात्र सर्वांचे लक्ष लागून राहिलेली अंतिम लढत पैलवान रोहन केवडे आणि पैलवान शुभम मगर यांच्यात झाली. तब्बल एक तास रंगलेल्या या अटीतटीच्या कुस्तीत रोहन केवडे याने गुणांच्या आधारे विजय मिळवत मैदान गाजवले. ९विजयी पैलवान रोहन केवडे यांचा ७५ हजार रुपये रोख रक्कम आणि चांदीची गदा देऊन सत्कार करण्यात आला. या विजयानंतर रोहन केवडे याला 'अहिल्या केसरी' किताबाचा मान मिळाला. या कुस्ती मैदानास राष्ट्रकुल सुवर्णपदक विजेते पैलवान रणजित नलवडे, उपमहाराष्ट्र केसरी पैलवान भरत मेकाले, सामाजिक कार्यकर्ते पैलवान माऊली हेगडे, नॅशनल चॅम्पियन पैलवान सुरेश ऐवळे, पैलवान सिद्धू माने, पैलवान तुकाराम कांबळे, पैलवान प्रकाश घोडके, गणेश नरूटे आणि रामभाऊ दुधाळ यांची प्रमुख उपस्थिती लाभली. स्पर्धेचे पंच म्हणून डबल महाराष्ट्र चॅम्पियन श्रीकांत बंडगर, वस्ताद चंद्रकांत मारकड, दिनकर बंडगर, अमोल बंडगर, हरी बंडगर, सचिन आबा बंडगर, प्रेम बंडगर, उद्धव बंडगर, म्हाळाप्पा बंडगर, सरपंच संजय वाघमोडे, विष्णू बंडगर, नागनाथ मळगे आणि रवी जाधव यांनी काम पाहिले.




# वैभव सूर्यवंशीचा आदर्श घ्या; खो-खोमध्येही मोठी कामगिरी करा!

### माजी आमदार दिलीप माने यांचे खेळाडूंना प्रेरणादायी आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ जून-**

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या कुमार आणि मुली गटातील खो-खोपटूंनी क्रिकेटमधील युवा सनसनाटी वैभव सूर्यवंशी याचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून स्पर्धेत आपली सर्वोत्तम कामगिरी साकारावी, असे प्रेरणादायी आवाहन माजी आमदार दिलीप माने यांनी केले.

कमी वयात सातत्य, मेहनत आणि दर्जेदार कामगिरीच्या जोरावर वैभव सूर्यवंशीने आयपीएल आणि देशांतर्गत क्रिकेटमध्ये स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्याचप्रमाणे खो-खो खेळाडूंनीही जिद्द, शिस्त आणि सातत्याच्या जोरावर राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचा झेंडा उंचावावा, असे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने, सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशन आणि किरण स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५२व्या कुमार व मुली राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेचे उद्घाटन नेहरूनगर येथील शासकीय मैदानावरील स्वर्गीय अजितदादा पवार क्रीडा नगरीत उत्साहात पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे होते.

प्रारंभी स्पर्धा अध्यक्षा अलकाताई राठोड, नागेश बिराजदार, स्पर्धा सचिव मोहन रजपूत आणि शिवशंकर राठोड यांनी मान्यवरांचे स्वागत केले. या उद्घाटन सोहळ्याला महाराष्ट्र खो-खो संघटनेचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव, खजिनदार गोविंद शर्मा, सहसचिव डॉ. राजेश सोनवणे, डॉ. पवन पाटील, डॉ. प्रशांत इनामदार, माजी सचिव संदीप तावडे, शिवसेनेचे शहराध्यक्ष सचिन चव्हाण, डॉ. बापूसाहेब अडसूळ, नगरसेविका अश्विनी चव्हाण, डॉ. अरुण मनगोळी, जि.प. सदस्या सविता उंबरजे, सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर, उपाध्यक्ष श्रीकांत ढेपे, अजितकुमार संगवे, सुनील चव्हाण, खजिनदार श्रीरंग बनसोडे, सचिव उमाकांत गायकवाड, सहसचिव राजाराम शितोळे, अजित शिंदे आणि संतोष कदम आदी उपस्थित होते

प्राचार्य अंबादास पांढरे यांनी प्रास्ताविक केले, सचिन मिसाळ यांनी सूत्रसंचालन केले, तर श्रीकृष्ण कोळी यांनी आभार मानले.

**'खेळाडू शपथ पाळतात; आम्ही राजकारणी नाही!'**

कार्यक्रमात सोलापूरची राष्ट्रीय खो-खोपटू स्नेहा लामकाने हिने उपस्थित खेळाडूंना क्रीडा शपथ दिली. या शपथविधीचा संदर्भ घेताना दिलीप माने यांनी उपस्थितांमध्ये हशा पिकवणारे, पण तितकेच वास्तववादी विधान केले. 'खेळाडू नेहमी प्रामाणिकपणे घेतलेल्या शपथेचे पालन करतात आणि खेळाडूवृत्ती जपतात; मात्र आम्ही राजकारणी लोक त्याप्रमाणे आचरण करत नाही,' अशी प्रांजळ कबुली त्यांनी दिली. त्यांच्या या वक्तव्याला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.

**राज्य स्पर्धांसाठी 'रॉयल्टी' कायमची बंद**

यावेळी महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी अत्यंत महत्त्वाची घोषणा करे ली. महाराष्ट्र खो-खो संघटनेचे तत्कालीन अध्यक्ष स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या स्मरणार्थ यापुढे राज्यस्तरीय स्पर्धांच्या आयोजनासाठी कोणत्याही जिल्हा संघटनेकडून किंवा आयोजक संस्थेकडून 'रॉयल्टी' आकारली जाणार नाही, असे त्यांनी जाहीर केले.

त्यांच्या या घोषणेचे उपस्थितांनी जोरदार स्वागत केले. तसेच या स्पर्धेतून निवडले जाणारे महाराष्ट्राचे कुमार व मुली संघ हिमाचल प्रदेश येथे होणाऱ्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत राज्याचा गौरव वाढवतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

# मध्यंतराच्या पिछाडीवरून लातूरची जालन्यावर थरारक मात

### ५२ वी कुमार-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा

### नंदुरबार-धुळेच्या मुलींचीही उपांत्यपूर्व फेरीत धडक




सोलापूर : मुलींच्या गटातील नांदेड विरुद्धच्या सामन्यात जालन्याचा आक्रमकाचा पोलवर टिपलेला क्षण. (छायाचित्र : केवल तिवारी)

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून :**

स्वर्गीय अजितदादा पवार क्रीडा नगरी, नेहरूनगर येथील शासकीय मैदानावर सुरू असलेल्या ५२व्या कुमार-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेत बुधवारी रंगलेल्या साखळी फेरीतील सामन्यांनी स्पर्धेची उत्कंठा अधिकच वाढवली. मुलींच्या गटात नंदुरबार आणि धुळे यांनी चुरशीच्या लढतीत निसटते विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला, तर कुमार गटात मध्यंतराला पिछाडीवर असलेल्या लातूरने जालनावर शानदार पुनरागमन करत विजय मिळवला. महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने, सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशन व किरण स्पोर्ट्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

**नंदुरबारची विजयी घोडदौड**

मुलींच्या गटातील अत्यंत रंगतदार सामन्यात नंदुरबारने जळगाववर ३६-३१ अशी मात करत उपांत्यपूर्व फेरीतील स्थान निश्चित केले. मध्यंतराला १९-१७ अशी मिळालेली आघाडी अखेर निर्णायक ठरली. नंदुरबारच्या कृतिमा नाईक (२ मि. संरक्षण व ६ गुण) हिने अष्टपैलू खेळ करत विजयाचा पाया रचला. तिला सोनल वसावे (६ गुण) आणि प्रतीक्षा गावित (६ गुण) यांनी आक्रमणात मोलाची साथ दिली. जळगावकडून गौरी जाधव (८ गुण) हिने झुंजार खेळी केली, मात्र तिचे प्रयत्न संघाला विजय मिळवून देण्यासाठी अपुरे पडले.

**धुळ्याने रायगडची मुसंडी रोखली; नंदिनी सिसोदियाची कमाल**

दुसऱ्या चुरशीच्या सामन्यात धुळ्याने रायगडचा ३१-२८ असा निसटता पराभव करत पुढील फेरी गाठली. मध्यंतराला १२-२२ अशी पिछाडी असूनही रायगडने जोरदार पुनरागमनाचा प्रयत्न केला. साक्षी शेट्टी (२ मि. संरक्षण व ६ गुण) आणि अनया अरसुल (२.३० मि. संरक्षण व ६ गुण) यांनी अखेरपर्यंत संघर्ष केला. मात्र धुळ्याच्या नंदिनी सिसोदिया (१.२० मि. संरक्षण व १० गुण) हिने एकहाती आक्रमण करत सामना फिरवला, तर हर्षदा कोळी (२.५० मि. संरक्षण व २ गुण) हिने भक्कम साथ दिली आणि धुळ्याचा विजय निश्चित केला.

**लातूरची दमदार कमबॅक**

कुमार गटातील दिवसातील सर्वाधिक लक्षवेधी सामन्यात लातूरने मध्यंतराच्या १३-१६ अशा पिछाडीवरून पुनरागमन करत जालनाचा ३४-३१ असा ३ गुणांनी पराभव केला. लातूरच्या विजयात आदित्य जाधव (२ मि. संरक्षण व ६ गुण) आणि श्रीशैल बिराजदार (१.३० व ३.२० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी निर्णायक भूमिका बजावली. जालन्याकडून आयन पठाण (३.२० मि. संरक्षण व ४ गुण) याने चिवट झुंज दिली; मात्र त्याला सहकाऱ्यांची अपेक्षित साथ मिळाली नाही.

**प्रतीक नगारेच्या अष्टपैलू खेळीने धुळ्याची परभणीवर सरशी**

कुमार गटातील आणखी एका चुरशीच्या सामन्यात धुळ्याने परभणीवर ४०-३४ असा ६ गुणांनी विजय मिळवला. धुळ्याकडून प्रतीक नगारे (२.३० व १ मि. संरक्षण व ८ गुण) याने अष्टपैलू कामगिरी करत संघाच्या विजयात सिंहाचा वाटा उचलला. परभणीकडून शिवराज चिंचलवाड (१.२० मि. संरक्षण) याने प्रयत्नांची पराकाष्ठा केली; मात्र धुळ्याची सरस कामगिरी त्यांच्यासाठी अडथळा ठरली.

**एकतर्फी सामन्यांत प्रतिस्पर्ध्यांचा धुव्वा**

दिवसभरातील बहुतांश अन्य सामने पूर्णपणे एकतर्फी झाले. अनेक संघांनी प्रतिस्पर्ध्यांचा अक्षरशः धुव्वा उडवत किंवा दणदणीत पराभव करत पुढील फेरीतील आपली दावेदारी भक्कम केली. स्पर्धेची पातळी आणि संघांमधील स्पर्धात्मकता पाहता पुढील बाद फेरीतील सामने अधिक रंगतदार होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केलेले संघ**

**कुमार गट :** धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, धुळे, सांगली, लातूर, पुणे, पालघर, सातारा, रत्नागिरी, मुंबई उपनगर, नाशिक, ठाणे, बीड, अहिल्यानगर आणि मुंबई.

**मुली गट :** सांगली, नंदुरबार, ठाणे, परभणी, धाराशिव, मुंबई उपनगर, सोलापूर, पालघर, नाशिक, अहिल्यानगर, पुणे, जालना, सातारा, मुंबई, रत्नागिरी आणि धुळे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### आनंदराज आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त फळे वाटप

**माळीनगर, दि. ३ जून-**

रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांच्या २ जून रोजीच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रिपब्लिकन सेनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ.सुशील सूर्यवंशी यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत रिपब्लिकन सेना माळशिरस तालुक्यातर्फे आंबा केळी व बिस्किट यांचे किट वाटप केले. उपजिल्हा रुग्णालय अकलूज येथील रुग्ण तसेच लहान गरजू मुलांना फळे व बिस्किटांच्या किटचे वाटप केले. लहान मुलांच्या हस्ते केक कापून वाढदिवस साजरा केला. प्रदेश सचिव सोम नाथ भोसले यांच्या हस्ते रुग्णांना आंबा, केळी व बिस्किटांच्या किटचे वितरण केले. भोसले यांनी यावेळी आनंदराज आंबेडकर हे सम ाजातील वंचित, गरीब आणि दुर्बल घटकांसाठी सतत झटणारे नेतृत्व आहे. त्यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ उत्सव साजरा न करता सम ाजोपयोगी कार्य करून वाढदिवस साजरा करत आहे. गरीब, गरजूंच्या चेहऱ्यावर हसू आणणे हेच आमचे ध्येय असल्याचे सांगितले. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. ओहाळ, रिपब्लिकन सेनेचे माळशिरस तालुकाध्यक्ष विश्वास उगाडे, युवक तालुकाध्यक्ष विकी लोंढे, पंढरपूर तालुका उपाध्यक्ष गणेश गायकवाड, अकलूज शहराध्यक्ष शिवाजी खडतरे, शहर उपाध्यक्ष साजिद बागवान, तालुका सरचिटणीस दयानंद कांबळे, तालुका संपर्कप्रमुख राजू बागवान, अकलूज शहर कार्याध्यक्ष रवी कोळी, अरुण कोळी, जगू कोळी, अर्जुन कोळी, सागर कोळी, अर्जुन जाधव उपस्थित होते.



### हिंदकेसरी महेंद्र गायकवाडचा सांगोल्यात सन्मान

**सांगोला, दि.३ जून-**

सातारा येथे नुकत्याच पार पडलेल्या ५२ व्या हिंदकेसरी कुस्ती स्पर्धेत मंगळवेढा तालुक्यातील शिरसी गावचे सुपुत्र पै.महेंद्र गायकवाड यांनी अत्यंत चुरशीच्या लढतीत हिंदकेसरी किताबाला गवसणी घातल्याबद्दल त्यांचा माजी आ.शहाजीबापू पाटील यांनी त्यांच्या संपर्क कार्यालयात अभिनंदन करून सत्कार केला. यावेळी जि.प.सदस्य दादासाहेब लवटे, माजी नगराध्यक्ष रफिक नदाफ, युवासेना तालुकाप्रमुख गुंडादादा खटकाळे, उद्योजक योगेश खटकाळे व कार्यकर्ते उपस्थित होते.



### 'फॅबटेक'मध्ये संशोधन, प्रकाशन व नैतिकता विषयावर कार्यशाळा

**सांगोला, दि. ३ जून-**

फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च, सांगोला येथील संशोधन व विकास कक्ष अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि इन्स्टिट्यूशन्स इनोव्हेशन कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने रिसर्च, पब्लिकेशन अँड एथिक्स या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत डॉ.सोम नाथ ठिगळे यांनी संशोधन लेखनाची रचना, संदर्भ शैली तसेच रेफरन्स मॅनेजमेंट टूल्सचा प्रभावी वापर तर डॉ.आशिष जोशी यांनी आय ईईई, स्प्रिंगर, सायन्स डायरेक्टर यांसारख्या आंतरराष्ट्रीय संशोधन डेटाबेसचा वापर, योग्य जर्नलची निवड, इम्पॅक्ट फॅक्टर तसेच स्कोपस इंडेक्सिंगची ओळख आणि निकष यावर मार्गदर्शन केले. सहभागी विद्यार्थी व प्राध्यापकांनी तज्ज्ञांशी संवाद साधत आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी संशोधन व विकास कक्ष प्रमुख डॉ.सोमनाथ ठिगळे, आय.क्यू.एसी समन्वयक प्रा.गणेश मिसाळ, आय.आय.सी समन्वयक प्रा.जगदीश हल्लूर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## निधन वृत्त...

### शाम कल्पवृक्ष



**सोलापूर, दि. ३ जून-**

महालक्ष्मी मंदिर, शेळगी येथील रहिवासी शाम छट्टुसा कल्पवृक्ष (वय ५७) यांचे मंगळवार, दि. २ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. माजी नगरसेवक दत्तात्रय कल्पवृक्ष यांचे ते लहान बंधू होत.

### उषा राऊत



**बार्शी, दि.३ जून -**

राऊत चाळ येथील उषा प्रभाकर राऊत (वय ७३) यांचे मंगळवार दि. २ जून रोजी हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले. तेरणा सहकारी साखर कारखान्याचे माजी मॅनेजिंग डायरेक्टर प्रभाकर राऊत यांच्या त्या पत्नी होत्या. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, सुन, नातवंडे, पुतणे, पुतणी असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर बुधवारी सकाळी मंगळवार पेठेतील मोक्ष धाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# दारु विक्रीबाबत विशेष प्रतिबंधात्मक मोहीम

■ पुण्यातील गंभीर घटनेच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन दक्ष

■ सर्व यंत्रणांना संयुक्तपणे काम करण्याचा जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांचा आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

पुणे येथे मिथेनॉलमिश्रित विषारी मद्य प्राशनामुळे घडलेल्या गंभीर घटनेच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्यात अवैध मद्यनिर्मिती, गावठी दारू विक्री तसेच मि थेनॉलच्या गैरवापराविरुद्ध राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत विशेष प्रतिबंधात्मक मोहीम राबविण्यात येत आहे. सदर घटनेच्या अनुषंगाने जिल्हयातील सर्व यंत्रणांनी संयुक्त व प्राधान्य क्रमाने काम काज करणेविषयी जिल्हाधिकारी सोलापूर यांनी आदेशित केले आहे.

पुण्यातील घटनेत मिथेनॉल या विषारी रसायनाचा वापर झाला होता. मिथेनॉल हे प्रचंड विषारी असून, त्याच्या वापराने कायमस्वरुपी अंधत्व, कोमात जाणे, किडनी निकामी व तात्काळ मृत्यु अशा गंभीर घटना घडतात. त्यामुळे नागरिकांनी असे अवैध मद्यप्राशन, रसायन युक्त दारु, ढाबे, टपऱ्यातील विना परवाना अवैध मद्याच्या आमिषास बळी पडू नये.

संबंधित प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून सर्व विभागांनी संयुक्त व परिणामकारक कार्यवाही करणे अपेक्षित आहे. जिल्ह्यातील आयुक्त सोलापूर महानगरपालिका, सर्व नगर परिषद मुख्याधिकारी व नगर पंचायत मुख्याधिकारी यांनी तात्काळ लेखी आदेश देऊन घंटागाड्यांद्वारे नियमित ध्वनीफीत वाजवून जनजागृती करावी. संबंधित ध्वनीफीत व्यापक स्तरावर प्रसारणाचे आदेश निर्गमित केले आहेत.

अवैध हातभट्टी दारु निर्मिती व विक्री केंद्रांवरील अधिकृत अथवा अनधिकृत वीज जोडण्या तात्काळ खंडित करण्यासाठी विशेष मोहीम राबवावी, राज्य उत्पादन शुल्क विभागासोबत समन्वयाने संयुक्त कारवाई करून अवैध वीज पुरवठा कायमस्वरुपी खंडीत करण्याविषयी अधीक्षक अभियंता महावितरण सोलापूर यांना आदेशीत केले आहे.



मिथेनॉल हा विषय अन्न व औषध प्रशासनाच्या अखत्यारित असल्याने त्याच्या पुरवठाधारकांचे व्यवहार तपासून अहवाल सादर करणेविषयी संबंधित विभागास आदेशीत केले आहे. मिथेनॉल उत्पादन, खरेदी, विक्री, साठवणूक व वितरण करणाऱ्या सर्व आस्थापनांची माहिती संकलित करून विशेष देखरेख ठेवत आहे.

बेकायदेशीर वापर किंवा संशयास्पद व्यवहार आढळल्यास तात्काळ फौजदारी कारवाई होईल. हातभट्टयांवर अनेकदा खराब काळा गुळ, जळणासाठी लाकुड मोठ्या प्रमाणात आढळते. गुळाच्या व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर गुळ घेणारे, सदर गुळाचा अवैध मद्यनिर्मितीसाठी बेकायदा वापर केला जाणार नाही याची खात्री करावी व संबंधितांच्या पुरवठा तपासणीचे संयुक्त कारवाईचे आदेश अन्न व औषध विभाग व राज्य उत्पादन शुल्क विभागास दिले आहेत.

राज्य उत्पादन शुल्क विभागाला अवैध मद्यनिर्मिती व विक्री रोखण्यासाठी मदत करणे ही सर्व संबंधित विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था, महसूल अधिकारी, पोलिस पाटील, ग्रामसेवक, तलाठी व इतर शासकीय कर्मचाऱ्यांची जबाबदारी आहे. मात्र संबंधितांकडून आवश्यक सहकार्य न झाल्यास किंवा स्थानिक माहिती देण्यात निष्काळजीपणा करणाऱ्यांची जिल्हा प्रशासन गांभीर्याने दखल घेऊन मानधन बंद व शिस्तभंगाची कार्यवाही करेल, असा इशारा जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे. त्या संबंधित प्रतिबंधात्मक कारवाईच्या नोटीस व लेखी आदेश निर्गमित केले आहेत. सद्यस्थितीत पोलिस विभाग व राज्य उत्पादन शुल्क विभाग यांचेकडून जिल्हयात संयुक्त परिणामकारक कारवाया सुरु आहेत.

या कारवायांची तीव्रता वाढवून सातत्यपूर्ण कारवायांनी हातभट्टीचे समूळ उच्चाटन करणेविषयी आदेशीत केले आहे. अवैध मद्यनिर्मिती व विषारी रसायनांच्या गैरवापराबाबत माहिती नागरिकांनी तात्काळ राज्य उत्पादन शुल्क विभागास, पोलिसांना कळवावी. त्यांचे नांव गोपनीय ठेवण्यात येईल. संबंधित गुन्ह्यांबाबत शून्य सहनशीलतेचे धोरण अवलंबले आहे.

## सांगोला विद्यामंदीरच्या प्राचार्यपदी चारूदत्त जगताप

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.३ जून-**

सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्यपदी चारूदत्त दिगंबर जगताप यांची पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली. सुरवातीला गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या तैलचित्रास पुष्पहार अर्पण करून संस्था सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, सहसचिव प्रशुद्धचंद्र झपके यांचे हस्ते प्राचार्य पदाचे नियुक्तीपत्र देऊन चारूदत्त जगताप यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी संस्था सदस्य दिगंबर जगताप, माजी प्राचार्य बिभीषण माने, पर्यवेक्षक उत्तम सरगर, काकासो नरूटे, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

प्राचार्य चारूदत्त जगताप यांनी सांगोला विद्यामंदिर प्रशालेत ११ आणि नाझरा विद्यामंदिर येथे १६ वर्षे सहशिक्षक म्हणून कार्य केले. त्यानंतर कोळा विद्यामंदिर येथे २ वर्षे पर्यवेक्षक म्हणून आणि सांगोला विद्यामंदिर येथे उपमुख्याध्यापक म्हणून त्यांनी आपल्या गतिमान



प्रशासनाची चुणूक दाखवली. त्यांच्या नियुक्ती बद्दल संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके, उपाध्यक्ष ॲड.विजयसिंह चव्हाण, खजिनदार शंकरराव सावंत, सदस्या शीलाकाकी झपके, विश्वेश झपके, पर्यवेक्षक प्रदीप धुकटे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

> संस्थाध्यक्ष प्रा.प्रबुद्धचंद्र झपके यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय प्रशासनात आधुनिकता आणतानाच विद्यार्थ्यांच्या बौद्धिक आणि कौशल्यात्मक विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल. मैदानावर अखंड परिश्रम करण्याची वृत्ती आणि सांघिक नेतृत्वगुण आता प्रशासकीय कार्यात प्रभावीपणे राबवून सांगोला विद्यामंदिरच्या चौफेर प्रगतीसाठी व शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी मी संपूर्ण क्षमतेने प्रयत्नशील राहीन.
>
> **-चारूदत्त जगताप,** नूतन प्राचार्य



## पत्रकार खराडे यांच्यावरील हल्ल्याचा पत्रकारांकडून निषेध

**हल्लेखोरांवर तात्काळ कठोर कारवाईची मागणी**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. ३ जून-**

बार्शीतील पत्रकार प्रशांत खराडे यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा बार्शीतील पत्रकारांनी तीव्र निषेध व्यक्त केला आहे. हल्लेखोरांवर तात्काळ कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

बार्शीतील पत्रकार आणि विविध पत्रकार संघटनांच्या वतीने तहसीलदार एफ. आर. शेख यांना निवेदन देण्यात आले. पत्रकार प्रशांत खराडे यांनी दिनांक ३१ मे रोजी एका दगड खाणीतील अवैध उत्खननासंदर्भात वार्तांकनासाठी छायाचित्रण केले होते. सदर छायाचित्रे प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी संबंधित कार्यालयालाही पाठवली होती. मात्र, ही बाब काही व्यक्तींना खटकली असून, बार्शीतील सचिन ऊर्फ बाळू जाधव याने खराडे यांच्या घरात घुसून त्यांना मारहाण केली. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी बार्शी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पत्रकारांवर हल्ले हे केवळ एखाद्या व्यक्तीवरील हल्ले नसून ते लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर आणि सत्य मांडणाऱ्या पत्रकारितेवर केलेले हल्ले आहेत. अशा प्रवृत्तींना वेळीच आळा घालणे अत्यंत आवश्यक असल्याचे पत्रकारांनी निवेदनात नमूद केले आहे.

बार्शी परिसरात यापूर्वीही पत्रकारांना धमकावण्याच्या आणि दहशत निर्माण करण्याच्या घटना घडल्या आहेत. मात्र अशा प्रवृत्तींवर कठोर कारवाई होत नसल्याने गुन्हेगारांचे मनोबल वाढत असल्याची खंत पत्रकारांनी व्यक्त केली. संबंधित हल्लेखोरांवर लवकरात लवकर कठोर कारवाई करण्यात यावी, अन्यथा बार्शीतील सर्व पत्रकार एकत्रितपणे तीव्र स्वरुपाचे आंदोलन छेडतील, असा इशाराही निवेदनाद्वारे दिला आहे.

तहसीलदार एफ. आर. शेख यांना निवेदन सादर करताना बार्शी प्रेस क्लबचे अध्यक्ष सचिन अपसिंगकर, उपाध्यक्ष चंद्रकांत करडे, सचिव गणेश गोडसे, खजिनदार उमेश पवार, शहाजी फुरडे, विनोद ननवरे, गणेश शिंदे, शाम थोरात, प्रवीण पावले, मयूर थोरात, भूषण देवकर, भीमराज जानराव, विजय शिंगाडे, किरण माने उपस्थित होते.

## पंचांगकर्ते मोहन दाते यांना 'धर्मभूषण किताब प्रदान





**पंढरपुरातील ज्योतिष व वास्तू अधिवेशनात झाला सन्मान**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३ जून-**

श्री अत्रेय ज्योतिष वास्तू-अध्यात्म संस्था तथा सद्गुरु अण्णा महाराज दत्तप्रबोधिनी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने पंढरपूर मांजरादेवी संस्थेत एकदिवसीय ज्योतिष व वास्तूअधिवेशन झाले. यात पंचांगकर्ते मोहन दाते यांना धर्मभूषण किताबाने सन्मानित केले. पंढरपूरचे ज्योतिर्विद राधेश बादले पाटील यांना ज्योतिष कार्य गौरव पुरस्कार दिला. ज्योतिर्विद, अभिजीत अवताडे-उपाध्ये यांना अध्यात्म उपासना शिरोमणी पुरस्काराने गौरविण्यात आले.

राज्यभरातील ज्योतिषाचार्य, वास्तुतज्ज्ञ, अध्यात्मअभ्यासक व विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत हे अधिवेशन पार पडले. अधिवेशनात आधुनिक काळातील ज्योतिषशास्त्राची उपयुक्तता, बदलत्या परिस्थितीत ज्योतिषांनी स्वीकारावयाच्या नवीन पद्धती, जातकांना शास्त्रशुद्ध व सकारात्म क मार्गदर्शन करण्याचे तंत्र तसेच ज्योतिष शास्त्राचे वैज्ञानिक पैलू यांवर विविध तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. विविध चर्चासत्रे, व्याख्याने व संवाद सत्रांमधून उपस्थित ज्योतिषाचार्यांना मौल्यवान माहिती मिळाली. कार्यक्रमास विजय जकातदार, डॉ.प्रसन्न मुळे, अंजली पोतदार, प्रिया मालवणकर, प्रकाश गोडसे, ओंकार दाते, ॲड.रश्मी बीडकर, अंजली गाडे, प्रा.दत्तप्रसाद शिरगुरकर आदी मान्यवरांचीही प्रमुख उपस्थिती होती. अधिवेशनाचे आयोजन श्री अत्रेय ज्योतिष वास्तू-अध्यात्म संस्थेच्या सर्वेसर्वा प्रिया मालवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली केले.

> **दाते यांची प्रकट मुलाखत**
>
> कार्यक्रमात मोहन दाते यांची प्रकट मुलाखत घेण्यात आली. मुलाखतीमध्ये धार्मिक विषयावर लोकांना पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे त्यांनी समाधानपूर्वक दिली. त्यामुळे उपस्थितांचे समाधान झाले.

> **कोणतेही शास्त्र कधीच खोटे ठरत नाही**
>
> श्री विठ्ठल रुक्मि णी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनाही आमंत्रित केले होते. यावेळी त्यांनी कोणतेही शास्त्र हे कधीच खोटे ठरत नाही, ज्योतिषशास्त्र तर नाहीच नाही असे ठासून सांगितले. उपस्थितांनी त्यांच्या विचारांना भरभरून दाद दिली.

> **विविध पुरस्कारांनी यांचा सन्मान**
>
> पंचांगकर्ते मोहन दाते यांना धर्मभूषण पुरस्कार, आरती घाटपांडे, डॉ.विकास खिलारे, श्रीनिवास रामदास यांच्यासह अनेक मान्यवरांना विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्याबद्दल पुरस्कार देण्यात आले. राधेश बादले पाटील यांना ज्योतिष कार्य गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. अभिजीत अवताडे-उपाध्ये यांना ज्योतिष, अध्यात्म, साहित्य व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल अध्यात्म उपासना शिरोमणी पुरस्काराने गौरविण्यात आले.

### विवेकानंद केंद्राचे योग शिबिर ५ जूनपासून

**सोलापूर, दि. ३ जून-**

विवेकानंद केंद्र कन्याकुमारीच्या वतीने ५ ते १४ जूनपर्यंत योग शिबिर आयोजित केले आहे. हे शिबिर सकाळी ६ ते ७.३० यावेळात रेल्वे लाईन येथील दमाणी सांस्कृतिक भवनात होईल. इच्छुकांनी नोंदणीसाठी रमेश वड्डेपल्ली (९९२२२२१४९९) अथवा ९४२०४९२२०६) यांच्याशी संपर्क साधावा.

## ऐतिहासिक वारसा ते दिल्लीच्या तख्ताचे स्वप्न

### सुशिक्षितांचे आगार 'शेळगाव आर' गावाचा गौरवशाली इतिहास

**तभा वृत्तसेवा । प्रभाकर क्षीरसागर**
**वैराग, दि. ३ जून-**

बार्शी तालुक्यातील 'शेळगाव आर' या गावाला इतिहास, उच्च विद्याविभुषितांची परंपरा आणि समृद्ध संस्कृतीचा त्रिवेणी संगम आहे. शिपायापासून ते थेट क्लास वन अधिकाऱ्यांपर्यंत आणि क्रीडा क्षेत्रापासून ते भारतीय संरक्षण दलापर्यंत गावातील सुपुत्रांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे.

शेळगाव आर गावात पुरातन काळातील प्रसिद्ध, वास्तुकलेचा अद्भूत नमुना असलेली हेमाडपंती महादेव मंदिर आणि खंडोबा मंदिर आहे. ही मंदिरे गावाच्या प्राचीनतेची आणि सांस्कृतिक वैभवाची साक्ष देतात. गावाच्या विकासात शिक्षणाचा सिंहाचा वाटा आहे. गायकवाड घराण्यातील शिक्षणमहर्षींनी गावात तब्बल १३ शैक्षणिक संस्थांचे जाळे निर्माण करून ग्रामीण भागातील मुलांना ज्ञानाची कपाटे खुली केली. गावात प्रामुख्याने एल. जी. शिक्षण संकुल शेळगाव आणि शेळगाव शिक्षण प्रसारक मंडळ या दोन मोठ्या नामांकित शिक्षण संस्था कार्यरत आहेत. गावात १०० पेक्षा जास्त शिक्षक असून जिल्हा परिषद शाळा आणि ४ अंगणवाड्या अविरतपणे सुरू आहेत.

**प्रशासकीय वैभवात गावातील मुला-मुलींची भरारी**

शेळगाव आर मधील गायकवाड आणि शिंदे घराण्यांत प्रत्येकी २ क्लास वन अधिकारी आहेत. तसेच अन्यही तरुणांनी प्रशासकीय कारभारात महत्त्वाची पदे प्राप्त केली आहेत. डॉ. ऋचा गोडगे: देशात ८४ वा क्रमांक मिळवून वैद्यकीय अधिकारी,अतुल देवकर: उपवनरक्षक, राजन शिंदे: सहायक उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रदीप गायकवाड: डेप्युटी एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, सार्वजनिक बांधकाम विभाग, रोहित बादगुडे: डेप्युटी एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, अमृता गुंड: कक्ष अधिकारी, मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, अशी पदे भुषवित आहेत. वैद्यकीय क्षेत्रातही गावांतील मुलांनी झेंडा




रोवला आहे. डॉ. मंगेश देवकर: स्त्रीरोग व प्रसुतीतज्ज्ञ, डॉ. कीर्ती ताकमोगे वैद्यकीय अधिकारी, वाशी, डॉ. महेश शेरखाने (एम्स -नागपूर), डॉ. विश्वजीत गायकवाड, अंबाजोगाई, डॉ. अभिजित खंडागळे अमरावती, डॉ. अनिकेत नितिन शेरखाने सोलापूर, देवराज जाधव: एम.डी. (आयुर्वेदिक) इसलापूर, डॉ. योगेश गायकवाड: बीडीएस बेळगाव, समर्थ उबाळे: आयव्हीएफ एम्ब्रियोलॉजिस्ट,

तांत्रिक, अभियांत्रिकी व आयटी क्षेत्रा अमोल देवकर: बहुराष्ट्रीय कंपनीत सोल्यूशन आर्किटेक्ट मॅनेजर, युवराज देवकर: आयआयटी हैदराबाद येथून गावातील पहिले आयआयटी इंजिनियर, पृथ्वीराज गायकवाड: एनआयटीम धून एम.टेक, प्रसाद देवकर : एम.टेक पूर्ण करून हिंजवडी आयटी पार्क येथे कार्यरत, आरती देवकर : एनआयटी मेघालय येथे उच्च शिक्षण घेत आहेत. कर विषयक व इतर प्रशासकीय सेवेत मदन शिंदे- राज्य कर निरीक्षक, पुणे, भैरु सिरसाट - राज्य कर निरीक्षक, मुंबई, राहुल कांबळे: सहायक अभियंता, महावितरण बार्शी, नागनाथ मोरे: सहायक अभियंता, पीडब्ल्यूडी जालना, राधा अडसूळ: औद्योगिक निरीक्षक, जनक गुंड: एएसओ व लोको पायलट, सीता बादगुडे: कृषी सेवक, शैक्षणिक, सुरक्षा व क्रीडा क्षेत्रात डॉ. पल्लवी गायकवाड: केमिस्ट्री विषयात पीएचडी, वसंत गायकवाड: प्राध्यापक उमरगा, रामकृष्ण जाधव: राज्य उत्पादन शुल्क, शांता देवकर: डी.जी. ऑफिस, मुंबई. तसेच संचिता लपारे: १६ वर्षांखालील महिला क्रिकेट संघात राज्यस्तरीय खेळाडू. इंडियन आर्मीत ९ मेजर व सैनिक (ज्यामध्ये राम खंडागळे देशाचे रक्षण करत आहेत) आणि नौदलात २ सुपुत्र सेवा बजावत आहेत. गावात कार्यालयीन शिपाई वर्गात १५ जण कार्यरत आहेत.

**शहराला मात देणाऱ्या आधुनिक सुविधा**

आज शेळगाव आर हे गाव पूर्णपणे हायटेक आणि स्वावलंबी बनले आहे. 'डी मार्ट'च्या धर्तीवर गावात अत्याधुनिक 'एस मार्ट' यशस्वीपणे उभे राहिले आहे. शेतकऱ्यांसाठी मोठे दूध संकलन केंद्र आणि आर्थिक व्यवहारांसाठी नॅशनल बँकेची शाखा आहे. सुसज्ज सरकारी दवाखाना, गावातील काही सुपुत्रांनी महाराष्ट्राचे उपनेते पद तर काहींनी उपसभापती पद भूषवून गावाचा नावलौकिक वाढवला आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### पत्नीला व्हिडिओ बनवून चारित्र्याबाबत सल्ला देत पतीची गळफास घेत आत्महत्या

**सोलापूर, दि. ३ जून-**

सेंट्रिंगचे काम करणाऱ्या पतीने पत्नीला चारित्र्याबाबत सल्ला देणारा व्हिडीओ बनवत नई जिंदगी भागातील आनंद नगर भाग १ येथे आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी रात्री साडेआठ वाजता उघडकीस आली. जाकीर अब्दुल रजाक पटेल (वय ३८, रा. इंदिरा नगर झोपडपट्टी ,सोलापूर) असे मयत पतीचे नाव आहे. मंगळवारी रात्री त्यांनी गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. नातेवाईकांनी त्यांना खाली उतरवून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मृत जाकीर यांचे पत्नीसोबत सकाळी वाद झाले होते. या वादातून त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले. आत्महत्येपूर्वी जाकिर यांनी जवळपास ६ मिनिटांचा व्हिडीओ बनवला आहे, अशी माहिती नातेवाईकांनी दिली. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले असा परिवार रस्त्याची माहिती नातेवाईकांनी दिली आहेत.



### आजारपणाला कंटाळून दमानी नगरमध्ये सुरक्षा रक्षकाची गळफास घेवून आत्महत्या

**सोलापूर, दि. ३ जून-**

आजाराला कंटाळून एका सुरक्षारक्षकाने गळफास घेऊन आत्महत्या केली. दमानी नगर भागात मंगळवारी ही घटना घडली. मनोजसिंग चव्हाण (वय ४८, रा लक्ष्मी पेठ, दमानी नगर ) असे वॉचमनचे नाव आहे. मंगळवारी सायंकाळी त्यांनी घरामध्ये गळफास घेतल्याचे निदर्शनास पडले. नातेवाईकांच्या सहाय्याने त्यांना खाली उतरवून येथील शासकीय रुग्णालयात फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे पोलिस हवालदार ए.व्ही. शेळके यांनी दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. मनोज सिंग हे काही दिवसापासून आजाराने त्रस्त होते. यातूनच त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची माहिती नातेवाईकांनी दिली

### दारुच्या नशेतील ज्येष्ठ नागरिकाच्या गळ्यातील सोन्याची चैन तिघांकडून लंपास

**बार्शी दि. ३ जून-**

बार्शी शहरातील अभिजीत देशीदारु हॉटेल परिसरात एका ज्येष्ठ नागरिकाच्या गळ्यातील १६ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन तीन व्यक्तींनी चोरुन नेली. याप्रकरणी बार्शी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. कल्याण गोवर्धन नांदवटे (निवृत्त शिक्षक) हे मंगळवारी सकाळी कपडे आणण्यासाठी घराबाहेर गेले होते. दुपारपर्यंत ते घरी परत न आल्याने त्यांचा मुलगा प्रज्योतने मोबाईलवर संपर्क साधला असता अभिजीत देशीदारु हॉटेलच्या व्यवस्थापकाने त्यांना वडिलांची प्रकृती बिघडल्याचे सांगितले. प्रज्योत व त्यांचे मित्र निखील ढावारे हे संबंधित ठिकाणी पोहोचले असता कल्याण नांदवटे हे हॉटेलबाहेरील कट्ट्यावर बसलेले दिसून आले. त्यावेळी त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन गायब असल्याचे निदर्शनास आले. याबाबत विचारणा केली असता, काही वेळापूर्वी तीन अनोळखी व्यक्ती आपल्या संपर्कात आले आणि त्यांच्याचकडून चेन चोरल्याचा संशय कल्याण नांदवटे यांनी व्यक्त केला. संशयितांपैकी एकाने राखाडी टी-शर्ट व काळी जिन्स, दुसऱ्याने पांढरा टी-शर्ट व निळ्या रंगाच्या फुलांची डिझाईन असलेले वस्त्र तसेच निळी जिन्स, तिसऱ्याने फिकट पांढऱ्या रंगाचा चौकडीचा हाफ शर्ट व काळी पॅन्ट परिधान केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. चोरीस गेलेल्या दागिन्यात १५ ग्रॅमची सोन्याची चेन व १ ग्रॅमचा बदाम असा एकूण १६ ग्रॅम वजनाचा सोन्याचा ऐवज आहे. पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करुन संशयितांचा शोध घेण्याचे काम सुरु आहे.




# सोलापुरातील दोन उड्डाणपुलांच्या कामांना मिळणार गती

## सर्व संबंधित विभागांनी समन्वय साधून प्रक्रिया गतीमान करावी : महापौर कोंड्याल

### महापालिकेत महापौरांच्या अध्यक्षतेखाली बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

प्रस्तावित उड्डाणपूल हे सोलापूरच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे पायाभूत सुविधा प्रकल्प आहेत. या कामांमुळे वाहतूक कोंडी कमी होऊन वेळ व इंधनाची बचत होईल. सर्व संबंधित विभागांनी समन्वय साधून प्रक्रिया गतीमान करावी. हे प्रकल्प प्राधान्याने वेळेत पूर्ण करण्यासाठी महापालिका सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे, असे महापौर विनायक कोंड्याल यांनी स्पष्ट केले आहे.

शहरातील वाढती वाहतूक कोंडी कमी करून नागरिकांना सुरक्षित, सुलभ आणि जलद प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रस्तावित उड्डाणपूल प्रकल्पांच्या कामांचा आढावा महापौर विनायक कोंड्याल यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. महापालिकेच्या कौन्सिल हॉल येथील महापौर कक्षात झालेल्या बैठकीत जुना पुणे नाका ते पत्रकार भवन आणि जुना बोरामणी नाका ते मोरारका बंगला या दोन महत्त्वाच्या उड्डाणपूल प्रकल्पांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीस उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, नगरसेविका रोहिणी तडवळकर, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगर अभियंता सारिका आक्कुलवार, कार्यकारी अभियंता नीलकंठ मठपती, सहायक नगररचना संचालक समीर सितोळे, नॅशनल हायवे विभागाचे सुनील फुलारी, एस. पी. काळे, महेश येमूल, उद्धव कांबळे, विजय काकडे, उपअभियंता प्रकाश दिवाणजी, मनोज जाधव तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. केंद्र व राज्य शासनासह रेल्वे, पोलीस, पोस्ट, बीएसएनएल, संरक्षण विभाग आणि खासगी मालमत्ता धारकांच्या जागांबाबत आवश्यक समन्वय साधण्यावर भर देण्यात आला. महापौर कोंड्याल यांनी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय राखून आवश्यक कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, अशा सूचना महापौरांनी दिल्या.



### या विषयांचा घेण्यात आला आढावा

यावेळी प्रकल्पांमुळे बाधित होणाऱ्या जागांचा तपशील संबंधित विभागांनी सादर केला. उड्डाणपुलांच्या उभारणीसाठी आवश्यक जमीन संपादन, हस्तांतरण, ना-हरकत प्रमाणपत्रे (एनओसी), तांत्रिक मंजुरी आणि प्रशासकीय प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला.भविष्यातील वाहतूक गरजा लक्षात घेऊन प्रकल्पांची वेळेत अंमलबजावणी करण्यावरही त्यांनी भर दिला.

# न्यायप्रविष्ट दिव्यांग निवासी शाळा वादात; जिल्हा परिषदेच्या हस्तक्षेपावर प्रश्नचिन्ह ?

### गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे अहवाल मागविल्याने नवा वाद

### यु-डायस क्रमांक रद्द करण्याच्या कार्यवाहीची चौकशी की जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न?

### शिक्षण क्षेत्रात चर्चेला उधाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ जून-**

सांगोला तालुक्यातील जनजागृती प्रबोधन मंच संचलित दिव्यांग निवासी शाळेच्या वादग्रस्त प्रकरणात जिल्हा परिषद प्रशासनाच्या एका पत्रामुळे नवा वाद निर्माण झाला आहे. न्यायप्रविष्ट असलेल्या या प्रकरणात शिक्षण विभाग किंवा दिव्यांग कल्याण विभागामार्फत वस्तुस्थिती तपासण्याऐवजी थेट सांगोला गटशिक्षणाधिकाऱ्यांकडून अहवाल मागविण्यात आल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

जनजागृती प्रबोधन मंचच्या संस्थापक अध्यक्षांच्या निधनानंतर संस्थेची शाळा टेंभुर्णी येथे स्थलांतरित करण्यात आल्याचा दावा संस्थेच्या व्यवस्थापनाकडून करण्यात आला आहे. मात्र काही शिक्षकांनी या स्थलांतराला विरोध करत सांगोला येथेच शाळा सुरू ठेवली. यानंतर संस्था व्यवस्थापन आणि शिक्षक गट यांच्यातील वाद न्यायालयापर्यंत पोहोचला असून विविध मुद्द्यांवर सुनावणी सुरू आहे.

दरम्यान, जिल्हा परिषद प्रशासन विभागाने उच्च न्यायालयाच्या १४ नोव्हेंबर २०२५ च्या आदेशाचा संदर्भ देत सांगोला गटशिक्षणाधिकारी यांना पत्र पाठविले आहे. न्यायालयीन आदेशानुसार आवश्यक कार्यवाही तातडीने करून त्याचा अहवाल सादर करण्याचे निर्देश या पत्रातून देण्यात आले आहेत. तसेच कार्यवाही न झाल्यास अवमान याचिकेची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर राहील, असा उल्लेखही करण्यात आला आहे.

मात्र या प्रकरणातील तक्रारदारांच्या मते, शाळेच्या स्थलांतरासंदर्भातील मूळ वाद अद्याप न्यायालयात प्रलंबित असून २८ नोव्हेंबर २०२४ पासून 'स्टेटस-को' आदेश लागू आहे. असे असताना वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशाविना व प्रत्यक्ष शाळा तपासणी न करता तयार करण्यात आलेल्या अहवालाच्या आधारे शाळेचा यु-डायस क्रमांक रद्द करण्यात आला. त्यामुळे शाळेतील ४४ दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नोंदी व भवितव्य धोक्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारदारांनी यु-डायस क्रमांक पूर्ववत सुरू करण्यासाठी अनेकदा पाठपुरावा केल्याचा दावा केला आहे. न्यायालयाच्या निदर्शनास ही बाब आणल्यानंतर यु-डायस संदर्भात निर्देश देण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे आता या संपूर्ण प्रकरणाची चौकशी स्वतंत्र यंत्रणेमार्फत व्हावी, अशी मागणी होत आहे.

दुसरीकडे, संस्थेच्या मुख्याध्यापिका शैलजा पाटील यांनी दिव्यांग आयुक्तांच्या परवानगीने शाळेचे स्थलांतर करण्यात आल्याचा दावा केला आहे. संबंधित शिक्षकांनी नव्या ठिकाणी रुजू होण्यास नकार दिल्याने नियमानुसार समितीमार्फत त्यांच्यावर कारवाई करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. न्यायालयाने केवळ थकीत वेतनाबाबत निर्णय दिला असून त्याचा चुकीचा अर्थ लावून प्रशासनाकडून पत्रव्यवहार करण्यात आल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

न्यायालयीन प्रक्रियेत असलेल्या या प्रकरणात प्रशासनाने घेतलेली भूमिका, यु-डायस क्रमांक रद्द करण्यामागील प्रक्रिया आणि संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी याबाबत आता शिक्षण वतुर्ळात व्यापक चर्चा सुरू झाली आहे.

### चुकीचा आधार घेत प्रशासनाचे पत्र

दिव्यांग आयुक्तांच्या परवानगीने आम्ही शाळा टेंभुर्णी येथे स्थलांतरित केली आहे. संबंधित शिक्षक येथे हजर न झाल्याने आम्ही त्यांना रीतसर समिती नेमून काढून टाकले आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. थकीत वेतनाबाबत कोर्टाने निर्णय दिला आहे. चुकीचा आधार घेत जिल्हा परिषद प्रशासनाने आपल्या अधिकारात असे पत्र काढणे चुकीचे आहे. याबाबत आम्ही कायदेशीर दाद मागत आहोत.

**- शैलजा पाटील, मुख्याध्यापिका**



# जिल्ह्यात १५ टँकरने पाणीपुरवठा

### उजनीसह इतर प्रकल्पातील पाणी पिण्यासाठी राखीव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

यंदा जिल्ह्याच्या दाही दिशांना मुबलक पाणीसाठा असल्याने आजतागायत जिल्ह्यात अवघ्या १५ पाणीटँकरने पाणीपुरवठा चालू असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी (महसूल) लक्ष्मण कुसेकर यांनी दिली.

दरवर्षीप्रमाणे यंदाही मार्च-एप्रिल महिन्यात जिल्हा परिषद अन् जिल्हा प्रशासनाकडून जिल्ह्यातील पाणीटंचाईवर बैठका होवून उन्हाळी पाणीपुरवठ्यासाठी पाणीटँकरचे नियोजन केले होते. गतवर्षी याच महिन्यात ६० पेक्षा अधिक टँकरद्वारे पाणीपुरवठा होत होता. यंदा चांगल्या पावसाने या महिन्यात अवघे १५ पाणीटँकर सुरू आहेत. मागणी तसा पुरवठा जिल्हा प्रशासनाकडून होत आहे. सध्या माळशिरस ६, बार्शी-अक्कलकोट तालुका प्रत्येकी १, उत्तर सोलापूर ४ आणि सांगोला २, द. सोलापूर २ अशा १५ टँकरने ग्रामीण भागात पाणीपुरवठा सुरू आहे.

उन्हाळा सुरू झाला की, काही गावे, वाड्या-वस्त्यांवर पाण्याची समस्या जाणवत असते. यंदा पाऊस लांबणीवर पडण्याची भीती हवामान विभागाकडून व्यक्त होत असल्याने अजून टँकर वाढण्याची शक्यता आहे. त्यासाठी जिल्ह्यातील सर्व पाणीस्त्रोत पिण्यासाठी राखीव ठेवले आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील तालुकानिहाय पिण्याच्या पाण्याची स्थिती व टंचाईचा आढावा घेऊन जल जीवन मिशनच्या कामांना प्राधान्यक्रम देण्याचे काम जिल्हा परिषदेकडून सुरू आहे. जिल्हा प्रशासनाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून मागेल त्या गावाला पाणीटँकर पुरवठा करण्यात येत आहे.

# समायोजनाची काटेकोर अंमलबजावणी करा, अन्यथा वेतन रोखणार ?


## अतिरिक्त शिक्षक रुजू अहवाल सादर करेपर्यंत मुख्याध्यापकांसह शिक्षकांचे वेतन होणार स्थगित

### अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनासंदर्भात माध्यमिक शिक्षण विभागाची कठोर भूमिका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ जून-**

जिल्ह्यातील माध्यमिक शाळांमधील अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समायोजन प्रक्रियेसंदर्भात माध्यमिक शिक्षण विभागाने कठोर भूमिका घेतली आहे. शासनाच्या निर्देशानुसार समायोजन आदेशांच्या प्रभावी अंमलबजावणीवर भर दिला आहे. संबंधित प्रक्रिया वेळेत पूर्ण न करणाऱ्या संस्था, शाळा व्यवस्थापन तसेच मुख्याध्यापकांविरुद्ध कारवाई करणार असून, संबंधित मुख्याध्यापक तसेच शिक्षकांचे वेतन स्थगित करणार असल्याचे विभागाकडून स्पष्ट केले आहे.

शिक्षण विभागाकडून उपलब्ध माहितीनुसार, जिल्ह्यात एकूण ६३ अतिरिक्त शिक्षकांची नोंद केली होती. शासन मान्यताप्राप्त आकृतिबंध व उपलब्ध पदसंख्येनुसार या शिक्षकांच्या समायोजनाची कार्यवाही सुरू केली आहे. त्यापैकी काही शिक्षकांचे समायोजन पूर्ण झाले असून ९ शिक्षकांनी संबंधित शाळांमध्ये प्रत्यक्ष रुजू होऊन कार्यभार स्वीकारला आहे. तथापि, उर्वरित शिक्षकांचे समायोजन अद्याप पूर्णत्वास गेलेले नसल्याचे आढळून आले आहे. सप्टेंबर २०२६ च्या संचमान्यतेनुसार राबविण्यात येत असलेल्या या प्रक्रियेत सुमारे ३५ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. शाळानिहाय उपलब्ध मनुष्यबळाचा संतुलित वापर, रिक्त पदे असलेल्या शाळांमध्ये आवश्यक कर्मचारी उपलब्ध करून देणे तसेच शैक्षणिक कार्यात सातत्य राखणे, या उद्देशाने समायोजन प्रक्रिया राबविण्यात येत आहे.



मात्र काही संस्था व शाळांकडून समायोजन आदेशांची अपेक्षित अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. काही प्रकरणांमध्ये समायोजित शिक्षकांना नियोजित शाळांमध्ये कार्यभार स्वीकारण्यास विलंब होत असल्याचेही आढळून आले आहे. यापार्श्वभूमीवर माध्यमिक शिक्षण विभागाने संबंधित संस्था व मुख्याध्यापकांना निर्देश जारी केले असून समायोजन आदेशांची तात्काळ अंमलबजावणी करण्यास सांगितले आहे. समायोजन प्रक्रियेसंदर्भातील शासन आदेशांचे पालन न झाल्यास संबंधित संस्था, मुख्याध्यापक तसेच जबाबदार अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येणार असून आवश्यकतेनुसार पुढील प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल. तसेच आदेशांचे पालन न करणाऱ्या प्रकरणांमध्ये वेतन अदा करण्यास स्थगिती देण्याचा प्रस्ताव विचाराधीन असल्याचेही शिक्षण विभागाच्यावतीने सांगितले आहे.

शासनाच्या शैक्षणिक धोरणानुसार उपलब्ध मनुष्यबळाचा कार्यक्षम व परिणामकारक वापर सुनिश्चित करण्यासाठी अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे समायोजन निर्धारित कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यामुळे संबंधित सर्व संस्था, शाळा व्यवस्थापन आणि मुख्याध्यापकांनी समायोजन प्रक्रियेस सहकार्य करून आदेशांची काटेकोर अंमलबजावणी करावी, असे आवाहन शिक्षण विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत ठाण्याचा डंका

## टीजेएसबी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**ठाणे, दि. ३ जून-**

जागतिक सहकार क्षेत्राच्या इतिहासात भारतीय नागरी सहकारी बँकिंग क्षेत्राचा बहुमान झाला आहे. अमेरिका येथील न्यूयॉर्क शहरातील संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयात दिनांक २८ आणि २९ मे रोजी आंतरराष्ट्रीय सहकारी संस्थांचे जागतिक चर्चासत्र संपन्न झाले. या आंतरराष्ट्रीय परिषदेत भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान टीजेएसबी सहकारी बँक लिमिटेडचे अध्यक्ष शरद गांगल यांना मिळाला. सहभागामुळे आंतरराष्ट्रीय पटलावर भारतीय सहकार क्षेत्राची दखल घेतली गेली आहे. ठाणेकर शरद गांगल यांचा सहभाग समस्त ठाणेकरांसाठी गौरवास्पद आणि टीजेएसबी सहकारी बँकेसाठी अभिमानास्पद ठरला आहे.

या परिषदेत जनता सहकारी बँक पुणे चे अध्यक्ष रवींद्र हेजीब हेही सहभागी झाले होते. जागतिक स्तरावर सहकारी बँकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या इंटरनॅशनल को-ऑपरेटिव्ह अलायन्सच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या इंटरनॅशनल को-ऑपरेटिव्ह बँकिंग असोसिएशन द्वारे या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. भारतीय नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रातील योगदानाची दखल घेऊन ICA ने शरद गांगल यांना विशेष निमंत्रण पत्र पाठवून आमंत्रित केले होते. सर्वसमावेशक आर्थिक वृद्धी हा परिषदेचा केंद्रबिंदू होता.या दोन दिवसीय उच्चस्तरीय जागतिक परिषदेमध्ये, सहकारी बँका आणि क्रेडिट युनियन्सच्या माध्यमातून शाश्वत वित्तीय प्रणाली कशी उभारता येईल, यावर विचारमंथन झाले. सहकारातून समताधिष्ठित आणि शाश्वत विकास यावर परिषदेत भर देण्यात आला. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवण्यासाठी वित्तीय साहाय्य करून त्याचे सक्षमीकरण, शेतकरी आणि महिला उद्योजकांच्या आर्थिक उन्नतीसाठी नाविन्यपूर्ण योजना राबवणे, समाजातील वंचित, दुर्बल आणि गरजू घटकांना मुख्य आर्थिक प्रवाहात आणणे. आणि मध्यमवर्गीयांची घराच्या स्वप्नपूर्तीसाठी मध्यमवर्गीय सुलभ गृहकर्ज उपलब्ध करून देणे यावर चर्चा झाली. संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयात जागतिक धोरणांवर चर्चा झाली. आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय नागरी सहकारी बँकिंग कार्यप्रणालीची अधिकृत नोंद घेतली गेली. टीजेएसबी बँकेच्या नेतृत्वामुळे ठाण्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या परिषदेत केवळ बँकिंग व्यवहारांवरच नव्हे, तर युनायटेड नेशन्सच्या जागतिक विकास उद्दिष्टांशी सुसंगत समाजाभिमुख वित्तीय प्रणाली कशी विकसित करता येईल, यावर जगभरातील तज्ज्ञांनी धोरणात्मक चर्चा केली. टीजेएसबी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल यांनी चर्चासत्रात भारतीय सहकारी चळवळ प्रभावीपणे मांडली.



TJSB BANK
TJSB Sahakari Bank Ltd.
Vishwas Zindagi Bhar Ka

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## महत्वाचे...

### सासरच्या छळास कंटाळून विवाहितेची आत्महत्या

**सोलापूर, दि. ३ जून-**

मूल होत नसल्याच्या कारणावरून व वारंवार पैशाची मागणी करून एका विवाहितेस आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी तिचा नवरा व दिरा विरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रवि हुच्चे- पती, किरण हुच्चे- दिर (रा. कुमठा नाका, सोलापूर ) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत मयत विवाहितेचा भाऊ लक्ष्मण शंकर औरंगे (रा. शिवाजी चौक, ढोबळे गल्ली, विजापूर कर्नाटक ) यांनी फिर्याद दिली आहे.यातील फिर्यादीची बहिण सविता ही १४ एप्रिल २०१२ ते दि. २६ एप्रिल २०२६ दरम्यान कुमठा नाका सोलापूर येथे सासरी नांदत असताना वरील आरोपींनी फिर्यादीच्या बहिणीकडे वारंवार पैशाची मागणी करुन, तीस मुल होत नाहीत असे हिणवून, विविध कारणाने सतत मारहाण करुन, शारीरीक व मानसिक त्रास देवून तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करुन तिचे मृत्यु होणेस कारणीभुत झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. फौजदार वाघमारे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

### घर घेण्यासाठी पैसे आण म्हणून विवाहितेचा छळ

**सोलापूर, दि. ३ जून-**

घर घेण्यासाठी पैसे आण म्हणून एका विवाहितेस शारीरिक व मानसिक त्रास देऊन दमदाटी केल्याप्रकरणी कोथरूड येथील एका पतीसह चौघा जणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रणव- पती, दिपक- सासरे, सुवर्णा- सासु आणि पल्लवी हुब्बळ्ळी-नणंद (रा. सहजानंद सोसायटी जवळ, कोथरुड, पुणे ) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत गायत्री प्रणव आमले (रा. २ बी योगीनाथ हौसिंग सोसायटी, शेळगी, सोलापूर ) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी हि दि. १३ मार्च २०२३ रोजी ते आजतागायत सासरी नांदत असताना वरील आरोपीनी तिच्याकडे घर घेण्यासाठी पैशाची मागणी करुन, नोकरी वरुन पैसे आणुन दे असे म्हणून फिर्यादीस शारीरीक, मानसिक व आर्थिक त्रास दिला . व वेळोवेळी शिवीगाळ करुन हाताने मारहाण करुन दमदाटी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे . फौजदार येडे हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

### रागाने बघण्याच्या कारणावरून फायटरने मारहाण; दोघे जखमी

**सोलापूर, दि. ३ जून-**

रागाने बघण्याच्या कारणावरून दोघा तरुणांना लोखंडी रॉड फायटर व लाथा बुक्क्यांनी मारहाण करून जखमी करण्यात आल्याची घटना लोधी गल्ली येथे आज बुधवारी सकाळी दहा वाजता घडली. शुभम चरणसिंग मनसावाले (वय २६ वर्ष) आणि रोहित चरण सिंग मनसावाले (वय २१ वर्ष, दोघे राहणार बेडरपूल) अशी त्या जखमींची नावे असून ते दोघे आज सकाळी लोधी गल्ली येथील जुनी तालीम येथे असताना त्यांना शंकर बुरहानपुर, विकी, विशाल व इतर चार ते पाच जणांनी मिळून मारहाण केली. यात दोघे मार लागून जखमी झाल्याने उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात ते स्वतः सकाळी दाखल झाले.

### घरगुती वादात पत्नीने खाल्ले ब्लेडचे लहान तुकडे

**सोलापूर, दि. ३ जून-**

घरगुती वादातून एका पत्नीने ब्लेडचे लहान लहान तुकडे करून ते खाल्ल्याची घटना ७० फूट भारतरत्न इंदिरानगर येथे मंगळवारी सायंकाळी घडली. नंदिनी गजानन खरात (वय १९ वर्ष , रा.७० फूट रोड, इंदिरानगर, सोलापूर) असे त्या पत्नीचे नाव आहे .मंगळवारी सायंकाळी साडेसहा वाजता घरामध्ये वाद झाल्याने त्या रागाच्या भरात नंदिनी हिने ब्लेडचे लहान तुकडे करून ते खाऊन टाकले .याचा त्रास होऊ लागल्याने तिला उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात पती गजानन याने मध्यरात्री दाखल केले.

### ब्लेडने शरीरावर वार करून घेऊन तरुण जखमी

**सोलापूर, दि. ३ जून-**

दारूच्या नशेत एका तरुणाने ब्लेडने हाता पायावर मारून घेऊन जखमी झाल्याची घटना विजापूर नाका येथील झोपडपट्टी क्रमांक दोन येथे आज बुधवारी दुपारी बारा वाजता घडली.फिरोज मोहम्मद अन्वर शेख (वय ३५ वर्ष , राहणार दोन नंबर झोपडपट्टी, सोलापूर) असे त्या जखमी तरुणाचे नाव असून तो आज दुपारी दारू पिऊन घरी आला असता त्याने नशेत अज्ञात कारणावरून स्वतःहून ब्लेडने आपल्या हात व पायावर मारून घेतले. यात जखमा झाल्याने त्याला उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात पत्नीने दुपारी चार वाजता दाखल केले.

# कोण रणांगणात, त्यांनाच आमचा पाठिंबा; काँग्रेसची पाठिंब्यासाठी सावध भूमिका

### बुधवारी कोणाचीही माघार नाही

### आज अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सोलापूर विधान परिषद मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज छाननीची प्रक्रिया मंगळवारी पूर्ण झाली असून, अंतिम उमेदवार यादी जाहीर करण्यात आली आहे. या निवडणुकीत प्रमुख राजकीय पक्षांसह अपक्ष उमेदवारांनीही मैदानात उडी घेतल्याने निवडणुकीची रंगत वाढली आहे. सध्या अंतिम यादीत एकूण सात उमेदवारांचा समावेश असून, आता प्रचाराच्या रणधुमाळीला वेग येणार आहे. दरम्यान, या निवडणुकीच्या रणांगणातून माघार घेण्यासाठी उद्या ४ जून ही अंतिम तारीख असल्याने यानंतर जो कोणी तगडा उमेदवार रणांगणात राहील; त्यांना काँग्रेस पक्ष पाठिंबा देईल, अशी सावध भूमिका शहर-जिल्हा काँग्रेसने घेतली असल्याची माहिती सूत्राकडून मिळाली.

महाविकास आघाडीकडून केशव दौलतराव बनगर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. ते राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) व काँग्रेसच्या पाठिंब्यावर निवडणूक लढवत आहेत. तर भारतीय जनता पक्षाने



राजेंद्र राऊत यांच्यावर विश्वास व्यक्त करत उमेदवारी दिली आहे. त्यामुळे या दोन्ही प्रमुख उमेदवारांमध्ये थेट सामना होण्याची शक्यता राजकीय जाणकारांकडून व्यक्त केली जात आहे. याशिवाय अक्कलकोट नागेश हरिभाऊ बाबराव, जीवन उत्तमराव जानकर, धनंजय महादेव डिकळे, महेश देविदास साठे आणि रमेश नागनाथ बारस्कर यांनी अपक्ष म्हणून निवडणुकीच्या रिंगणात प्रवेश केला आहे. अपक्ष उमेदवारांच्या उपस्थितीमुळे काही प्रमाणात मतांचे विभाजन होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांमधून ही निवडणूक होत असल्याने जिल्ह्यातील राजकीय समीकरणांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. सर्व प्रमुख पक्षांनी आपल्या मतदारांना एकत्र ठेवण्यासाठी आणि पाठिंबा मिळवण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. आगामी काही दिवसांत प्रचारसभा, बैठका आणि संपर्क मोहिमा यांना वेग येणार आहे.

दरम्यान, उमेदवारी अर्ज माघारीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाले आहे. आता स्थानिक स्वराज्य संस्थांतील मतदारांचा कौल कुणाच्या पारड्यात पडतो, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. विधान परिषदेच्या या निवडणुकीत प्रमुख पक्षांबरोबरच अपक्ष उमेदवारांची भूमिका देखील महत्त्वाची ठरणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. एकंदरीत, ४ जून रोजी अर्ज माघार घेण्याचा अखेरचा दिवस असल्याने यानंतरच कोण-कोण निवडणूक लढविणार हे कळणार आहे. या निवडणुकीसाठी १८ जून रोजी मतदान अन् २२ जून रोजी मतमोजणी होणार आहे.

#### स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारांवर नेत्यांचे लक्ष

विधान परिषद निवडणुकीत जिल्हा परिषद, पंचायत समित्या, महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींतील निवडून आलेले सदस्य मतदान करणार आहेत. त्यामुळे पक्षीय ताकद, गटबाजी आणि स्थानिक राजकीय समीकरणांचा निकालावर मोठा प्रभाव पडण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर सर्वच उमेदवारांनी मतदारांशी संपर्क वाढवण्यास सुरुवात केली आहे. मात्र भाजपाची सदस्य संख्या आणि पदाधिकारी मोठ्या प्रमाणात असल्याने भाजपाचाच उमेदवार निवडून येणार असा दावा भाजपाच्या गोटातून केला जात आहे.

# बाजार समितीच्या सत्ताधाऱ्यांवर टांगती तलवार?

### सभापती माने यांच्यासह १२ संचालकांची १९ जूनला लातूरला सुनावणी





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ जून**

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीसंदर्भातील वाद पुन्हा एकदा चर्चेत आला असून, सभापती दिलीप माने, उपसभापती ब्रम्हानंद कळके यांच्यासह १२ संचालकांच्या निवडीविरोधात दाखल करण्यात आलेल्या निवडणूक याचिकेची सुनावणी १९ जून रोजी जिल्हा उपनिबंधक कार्यालय, लातूर येथे होणार आहे. त्यामुळे कृषी व सहकार क्षेत्रासह राजकीय वतुर्ळातही या प्रकरणाची चर्चा रंगली आहे.

तक्रारदार मिलिंद मुळे आणि राहुल बनसोडे यांनी बाजार समितीच्या निवडणुकीतील काही संचालकांच्या पात्रतेवर आक्षेप घेत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या प्रकरणी उच्च न्यायालयाने एप्रिल २०२५ मध्ये दिलेल्या आदेशानुसार महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणूक नियम २०१७ मधील नियम ७२ (अ) अंतर्गत निवडणूक याचिका दाखल करण्याचा मार्ग खुला करण्यात आला होता. त्यानुसार संबंधितांनी जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडे अपील दाखल केले. मात्र प्रक्रियेदरम्यान विविध प्रशासकीय कारणांमुळे हे प्रकरण प्रथम सोलापूर, त्यानंतर धाराशिव आणि अखेरीस राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या आदेशानुसार लातूर येथे वर्ग करण्यात आले. गेल्या काही महिन्यांपासून सुनावणी रखडल्याने अपीलकर्त्यांनी वारंवार पाठपुरावा केला होता.

# पुणे विमानतळावर स्लॉट मिळूनही 'तिरूपती'च्या उड्डाणाला विलंब

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

तिरुपती बालाजीच्या दर्शनासाठी थेट विमानसेवेची आतुरतेने वाट पाहणाऱ्या सोलापूरकरांची प्रतीक्षा आणखी लांबणार असल्याचे चित्र आहे. जूनच्या पहिल्या आठवड्यात सुरू होण्याची अपेक्षा असलेली पुणे-सोलापूर-तिरुपती विमानसेवा अद्यापही कागदावरच असून, विमान कंपन्यांच्या नियोजनातील विलंबामुळे या




मार्गावरील उड्डाणाला ब्रेक लागला आहे.

स्टार एअर कंपनीला पुणे विमानतळावर व्यावसायिक उड्डाणांसाठी आवश्यक स्लॉट मिळाल्यानंतर पुणे, सोलापूर आणि तिरुपती या शहरांना जोडणारी विमानसेवा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला होता. त्यामुळे सोलापूरकरांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली होती. मात्र, उड्डाणांचे वेळापत्रक, बुकिंग व्यवस्था आणि मनुष्यबळ नियोजन अद्याप अंतिम झाले नसल्याने सेवा सुरू होण्यास विलंब होत आहे. दरम्यान, फ्लाय ९१ एअरलाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक मनोज चाको यांनी तिरुपती विमानसेवेबाबत पावसाळ्यानंतरच सकारात्मक विचार केला जाईल, असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे यंदाच्या आषाढीपूर्वी तिरुपतीसाठी थेट विमानसेवा सुरू होण्याची शक्यता धूसर झाली आहे.

सोलापूरच्या होटगी रस्ता विमानतळावरून सध्या सुरू असलेल्या मुंबई, हैदराबाद आणि गोवा विमानसेवेला प्रवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. व्यावसायिक, उद्योजक, पर्यटक आणि सर्वसामान्य प्रवाशांकडून या सेवांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असल्याने विमान कंपन्यांनाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. तिरुपती बालाजीच्या दर्शनासाठी सोलापूर आणि परिसरातून दरवर्षी हजारो भाविक प्रवास करतात. त्यामुळे या मार्गावर विमानसेवा सुरू झाल्यास प्रवाशांची संख्या लक्षणीय राहील आणि विमान कंपन्यांना चांगला महसूल मिळू शकतो, असा विश्वास विमान वाहतूक क्षेत्रातील जाणकार व्यक्त करत आहेत. दरम्यान, गोवा, मुंबई आणि हैदराबाद विमानसेवेच्या यशानंतर आता तिरुपती विमानसेवेकडे सोलापूरकरांचे लक्ष लागले आहे. मात्र, पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नवीन मार्ग सुरू करण्याबाबत कंपन्या सावध भूमिका घेत असल्याने भाविकांना थेट विमान प्रवासासाठी आणखी काही दिवस प्रतीक्षा करावी लागणार आहे.

# 'खतासाठी सक्तीची 'लिंकिंग' कराल तर होणार गुन्हा दाखल



### खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाचा विक्रेत्यांना इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ जून-**

खरीप हंगामाच्या तोंडावर खतांच्या विक्रीत होणाऱ्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी कृषी विभागाने कठोर भूमिका घेतली आहे. अनुदानित खत खरेदी करताना शेतकऱ्यांवर विनाअनुदानित खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, जैवखते किंवा जैव उत्तेजक घेण्याची सक्ती केल्यास संबंधित विक्रेत्यांवर थेट पोलीस कारवाईसह परवाना रद्द करण्याचा इशारा जि.प.चे कृषी विकास अधिकारी हरिदास हावळे यांनी दिला.

शेतकरी खरीप हंगामासाठी तयारीला लागले असताना अनेक ठिकाणी खतांच्या लिंकिंगबाबत तक्रारी समोर येत आहेत. आवश्यक असलेले अनुदानित खत देताना अतिरिक्त उत्पादने खरेदी करण्यासाठी दबाव आणला जात असल्याच्या तक्रारी वाढल्यानंतर शासनाने हा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांना आवश्यक तेवढेच खत घेण्याचा अधिकार असून कोणत्याही प्रकारची सक्ती सहन केली जाणार नसल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

यंदा जिल्ह्यात खरीप हंगामासाठी पुरेशा प्रमाणात रासायनिक खतांचा साठा उपलब्ध असल्याचा दावा कृषी विभागाने केला आहे. युरिया, डीएपी, एनपीके, एमओपी आणि एसएसपी या प्रमुख खतांचा पुरवठा नियमित सुरू असून भविष्यात टंचाई निर्माण होणार नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे खत उपलब्धतेबाबत शेतकऱ्यांनी चिंता करण्याचे कारण नसल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. खरीप हंगामात शेतकऱ्यांची फसवणूक रोखण्यासाठी कृषी विभागाने घेतलेली ही भूमिका दिलासादायक मानली जात असून, आता अंमलबजावणी किती प्रभावी होते याकडे शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

#### संबंधित विक्रेत्यांवर कठोर कारवाई

जिल्ह्यात खतांचा पुरेसा साठा उपलब्ध असून शेतकऱ्यांनी कोणत्याही दबावाला बळी पडू नये. अनुदानित खतांसोबत इतर उत्पादने घेण्याची सक्ती होत असल्यास तत्काळ कृषी विभागाकडे तक्रार करावी. तक्रारीत तथ्य आढळल्यास संबंधित विक्रेत्यांवर कठोर कारवाई केली जाईल. असेही श्री. हावळे यांनी सांगितले.

#### तक्रारीसाठी क्यूआर कोडची सुविधा उपलब्ध

लिंकिंगच्या प्रकारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर भरारी पथके स्थापन करण्यात आली आहेत. तसेच प्रत्येक खत विक्री केंद्राबाहेर 'लिंकिंगला नाही म्हणा' असे फलक लावण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांना तक्रार करणे सुलभ व्हावे यासाठी क्यूआर कोडची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या क्यूआर कोडद्वारे नोंदविलेली तक्रार थेट वरिष्ठ प्रशासनापर्यंत पोहोचणार आहे.

# विडी कामगारांच्या लढ्याला मोठे यश मिळणार

### किमान वेतनावर सरकार ठाम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

महाराष्ट्रातील लाखो विडी कामगारांच्या किमान वेतनाच्या प्रश्नावर आज मंत्रालयात पार पडलेली बैठक अत्यंत सकारात्मक आणि आशादायी ठरली. विडी कामगारांना शासनाने जाहीर केलेले किमान वेतन आणि त्याचा फरक तात्काळ मिळावा, या मागणीवर सरकारने ठाम भूमिका घेतल्याने कामगारांमध्ये समाधान आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असल्याचे ज्येष्ठ कामगार नेते, माजी आमदार कॉ. नरसय्या आडम मास्तर यांनी सांगितले.

आडम मास्तर यांनी २०१४ पासून विडी कामगारांना किमान वेतन मिळावे यासाठी सातत्याने संघर्ष उभारला आहे. आंदोलने, निवेदने, मंत्रालयीन बैठका आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळेच हा प्रश्न निर्णायक टप्प्यावर पोहोचला असल्याची भावना कामगारांनी व्यक्त केली. मंगळवार, २ जून रोजी कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या मंत्रालयातील कार्यालयात विडी कामगारांच्या किमान वेतन, रोख मजुरी व पेन्शनच्या प्रश्नासंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत कामगार संघटना, कारखानदार संघटना आणि शासनाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या किमान वेतनाच्या प्रश्नावर सरकारने पहिल्यांदाच इतकी ठाम भूमिका घेतल्याने विडी कामगारांच्या न्याय्य हक्काच्या



लढ्याला नवे बळ मिळाले आहे. बैठकीत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे रोख मजुरी संदर्भातील निर्णयही शासनाकडून घेण्यात येणार असल्याचे संकेत देण्यात आले. त्यामुळे मजुरी देण्यातील अनियमितता, कपात आणि पारदर्शकतेच्या प्रश्नांवरही मार्ग मोकळा होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

#### वृद्ध विडी कामगारांच्या पेन्शनच्या प्रश्नालाही नवी आशा

विडी कामगारांना किमान १० हजार मासिक पेन्शन मिळावी, या मागणीवरही सकारात्मक चर्चा झाली. याबाबत कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निर्णयासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे वृद्ध विडी कामगारांच्या पेन्शनच्या प्रश्नालाही नवी आशा निर्माण झाली आहे.

#### दोन दिवसांत निर्णयाची घोषणा

याबैठकीत विडी कारखानदारांच्या प्रतिनिधींनी किमान वेतन लागू करण्यास विरोध दर्शवत, 'किमान वेतन देणे शक्य नाही; मात्र दर हजार विड्यांमागे १० ते २० रुपये मजुरी वाढ देऊ,' अशी भूमिका मांडली. मात्र, या भूमिकेला राज्याचे कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी स्पष्ट आणि ठाम शब्दांत उत्तर दिले. तुम्ही कोणतीही भूमिका घ्या, पण सरकार दोन दिवसांत आपला निर्णय जाहीर करणार आहे. शासनाचा निर्णय सर्वांना बंधनकारक असेल आणि त्याची अंमलबजावणी करावीच लागेल.मंत्री फुंडकर यांनी घेतलेल्या या स्पष्ट आणि निर्भीड भूमिकेमुळे बैठकीत कामगारांच्या बाजूने वातावरण निर्माण झाले.

# जुनी मिल परिसरातील 'त्या' संस्थांवर कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

जुनी मिलच्या १३७ एकर जागेतील बोगस गृहनिर्माण संस्थांवर कठोर कारवाई करून सर्व अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे हटवावीत, अशी मागणी जुनी मिल बेकार कामगार, वारसदार आणि जनहित संघर्ष समितीचे सचिव डॉ. संदीप आडके यांनी पत्रकार परिषदेत केली.

उपनिबंधक सहकारी संस्था कार्यालयाने नुकतीच उमा सहकारी गृहनिर्माण संस्था अवसायनात काढून अवसायकाची नियुक्ती केली आहे. यापूर्वीही उमा समूहातील अनेक संस्था व इतर गृहनिर्माण संस्था अवसायनात काढण्यात आल्या आहेत. माहिती न देणे, लेखापरीक्षण अहवाल सादर न करणे आणि निवडणुका न घेणे यासह विविध कारणांमुळे ही कारवाई करण्यात आली आहे. जुनी मिल ट्रस्टच्या मालकीच्या १३७ एकर जागेवर बोगस कागदपत्रांच्या आधारे भूखंड विक्री, बांधकामे आणि इतर व्यवहार झाल्याचा आरोप समितीने केला. संबंधित जागांवरील ले-आऊट, मोजणी व खरेदी-विक्री प्रक्रियाही विविध विभागांनी बंद केल्याचा दावा त्यांनी केला आहे.

दरम्यान, जागेतील सर्व अनधिकृत बांधकामधारकांना नोटिसा बजावण्यात आल्या असून जागा रिकामी न केल्यास फौजदारी कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. जुनी मिल ट्रस्टच्या सभासदांना त्यांच्या हक्काच्या जागांचे कायदेशीर वाटप लवकरच करण्यात येणार असल्याचा दावा समितीने केला. या पत्रकार परिषदेत डॉ. डायना आडके, डॉ. दिलीप दामले, दीपक पेंढारकर, केशव जहागीरदार, रमाकांत गड्डम आदी उपस्थित होते.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १४६१

**तूं अझुनी कां न विचारिशी। काय हे चिंतितु आहासी।।**
**स्वधर्मु तो विसरलासी। तरावें जेणें।।**

श्रीकृष्ण परमात्मा विविध उदाहरणे देऊन अर्जुनाला कर्तव्य पार पाडण्यासाठी प्रवृत्त करीत आहेत. पण कृष्णांच्या लक्षात आले की आपण एवढे पोटतिडकीने सांगत असतानाही अर्जुनाच्या मनात काहीतरी वेगळेच चालु आहे. म्हणून श्रीकृष्ण म्हणाले अर्जुना, मी तुला एवढे बोलत असतांनाही तू अजुन देखील योग्य विचार का करीत नाहीस. तुझ्या मनात वेगळेच चिंतन चाललेले दिसते. आपल्या जीवनातही अनेकवेळा असेच घडत असते. आपण आपल्या मुलांना किंवा संबंधितांना एखादी गोष्ट, एखादा विषय पोटतिडकेने समजाऊन सांगण्याचा प्रयत्न करीत असतो, पण त्याचे लक्ष आपल्या ठिकाणी नसते किंवा आपणाला कोणीतरी समजाऊन सांगत असतो, पण आपले त्याच्याकडे लक्ष नसते. म्हणून अशा वेळी सांगणारा चिडून म्हणतो, मला काय करायचे आहे, माझे ऐकायचे नसेल तर तुला सुधरेल ते कर. अर्थात, समोरचा ऐकत नाही म्हणून आपण चिडतो व समोरच्याला सांगायचे सोडून देतो.



पण श्रीकृष्ण परमात्म्याच्या बाबतीत असे घडले नाही. अर्जुनाच्या मनात वेगळेच काही तरी चालत आहे. याची जाण असतांनाही श्रीकृष्ण परमात्मा रागावले किंवा चिडले नाहीत. त्यांनी अर्जुनाला विश्वासात घेण्याचा प्रयत्न चालूच ठेवला. ते शांत चित्ताने कर्तव्य व स्वधर्माची आठवण देवू लागले.

खऱ्या मित्राची, मार्गदर्शकाची खरी परिभाषा हीच असते. समोरचा ऐकत नाही म्हणून मार्गदर्शकाने, हितचिंतकाने सांगायचे सोडायचे नसते. अडचणीत सापडलेल्या किंवा मोहात अडकलेल्या माणसाची द्विधा अवस्था होत असते. काय करावे, किंवा काय करु नये याचा निर्णय त्याला घेता येत नाही. अशावेळी त्याला चांगल्या मार्गदर्शकाची गरज असते. मार्गदर्शकानेच जर अशावेळी माझे का ऐकत नाही म्हणून रागाने सांगायचे सोडून दिले तर ही केवळ ऐकणाऱ्याची हार नाही. तर सांगणाऱ्याची व ऐकणाऱ्याची दोघाचीही हार असते. आई-वडील सुध्दा बऱ्याचवेळा आपले मुल सांगूनही ऐकत नाही म्हणून मुलाला सांगायचे सोडून देतात. जा तुला सुधरेल ते कर असे म्हणतात. आई-वडीलांची अशी माघार म्हणजे त्यांच्या मुलांची आयुष्यभराची माघार होऊ शकते. म्हणून शांत चित्ताने परिस्थिती पाहून मुलाला योग्य प्रकारे मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न चालुच ठेवला पाहिजे. मुलं हीच खरी धनसंपदा असल्याने त्यांना योग्य मार्ग दाखविणे ही आपली केवळ जबाबदारीच नाही तर ते कर्तव्यही आहे, याची जाण पालकांनी ठेवलीच पाहिजे. गुरुजनांनाही या प्रसंगी निवेदन करु इच्छितो की त्यांनी विदयार्थी आमचे ऐकत नाहीत, ते आता ज्ञानी किंवा निगरगट्ठ झाले आहेत. त्यामुळे आम्ही सांगण्याचा प्रयत्न करणार नाही. असे न म्हणता परिस्थितीनुरुप त्यांच्यात परिवर्तन करुन त्यांना योग्य मार्ग दाखविण्याचा प्रयत्न करायला हवा. विद्यार्थी किंवा मुलं ही बुध्दीवादी आहेत. पुन्हा-पुन्हा मार्गदर्शन ऐकत गेले तर कधीना कधी तरी परिवर्तन झाल्याशिवाय राहाणार नाही. मोहग्रस्त अर्जुनात परिवर्तन होऊ शकते तर आपल्या मुलांत होणार नाही काय ?

**ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : गुरूवार,
दि. ४ जून २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - अधिक, कृ. पंचमी
ऋतु - वसंत ।
नक्षत्र- उत्तराषाढा (२७.४१)
योग - योग (०९.०२)
करण - बव (१०.२७)
राहू काल : गुरूवार
दु. १.३० ते ३.००

दिनविशेष :
१६७४: छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकापूर्वी त्यांची सुवर्णतुला झाली.
२००१: नेपाळचे शेवटचे राजे 'ज्ञानेंद्र' राज्यपदावर आरूढ झाले.महत्त्वाच्या व्यक्तींचे जन्म.
१९३६: प्रसिद्ध मराठी व हिंदी चित्रपट अभिनेत्री नूतन यांचा जन्म मुंबई येथे झाला.
:१९१८: गोविंद वासुदेव कानिटकर, नामवंत मराठी साहित्यिक यांचे निधन झाले.



# बळीराजाला आता मोठ्या पावसाची प्रतिक्षा

## मृग बरसताच पेरणी होणार सुरू; जूनमध्येही रणरणते ऊन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

शहर आणि जिल्ह्याच्या काही भागात मंगळवारी रोहिण्याचा पाऊस बरसला असला तरी बळीराजाला खरिपाच्या पेरणीसाठी मोठ्या पावसाची गरज आहे. मृग नक्षत्राचा चांगला पाऊस झाला की, बळीराजा तिफणीवर हात ठेवतो.

दरम्यान, मंगळवारी जरी जोरदार पाऊस झाला असला तरी दिवसभर रणरणते ऊन मात्र कायम आहे. यामुळे दुपारच्या सत्रात लोक बाहेर पडण्यास सध्याही घाबरत आहेत. जून महिन्यातही ऊनच पडू लागल्याने पाऊस लांबतो की काय? अशीही भीती जाणकार नागरिकांतून व्यक्त होत आहे.

राज्यात मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली असून, मुंबईसह पुणे, नाशिक आणि सोलापूर भागात विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडत आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस राज्यात वादळी पावसाचा 'येलो अलर्ट' जारी केला असून, मान्सून केरळमध्ये दाखल होण्यासाठी परिस्थिती अनुकूल झाली आहे. सोलापूर शहर-जिल्ह्यातही मान्सूनपूर्व सरींनी दमदार आगमन केले असून, जोरदार वाऱ्यासह पाऊस कोसळत आहे. हवामान विभागाने पुढील तीन दिवस पावसाचा यलो अलर्ट दिला आहे.

पुण्यातही पूर्वमोसमी पावसाने हजेरी लावली आहे. सोलापूर आणि लगतच्या लातूर भागात वादळी वाऱ्याने फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान, मान्सून येत्या ४८ तासांत केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता असून, महाराष्ट्रात मान्सूनचे आगमन वेळेवर होण्याची शक्यता आहे.

यामुळे आता मृगाचा पाऊस जोरात पडताच आणि चांगली ओल गेली की, बळीराजा तिफणीवर हात ठेवतो. जूनच्या दुसऱ्या आठवड्यात मृगधारा बरसतात आणि १५ जूननंतर बळीराजा हळूहळू पेरणीस आरंभ करतो.



# संघ शिक्षा वर्गास आमदार कोठेंनी दिली भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

संघ शिक्षा वर्गास आ. देवेंद्र कोठे, शहराचे प्रथम नागरीक विनायक कोंडयाल (महापौर), शहरातिल नगरसेवकांनी ५००० सीडबॉल ( बीजगोळे) केलेल्या ठिकाणी भेट दिली, तसेच या कार्याचे कौतुक आमदार व महापौर यांनी केले.

या सीडबॉल कार्यशाला मधे प्रवीण तळे (प्रांत मंडल सदस्य, पर्यवरण संरक्षण गतिविधी), जयोस्तुते फाउंडेशन- शैलेश स्वामी, शिरीष गोलवलकर, करपे, रुद्रप्पा बिराजदार, वैभव हेगडे, अरविंद सालक्की, यशवंत पाथरुट अनेक जनांचें सहकार्य लाभले. तसेच नगरसेवक ज्ञानेश्वर म्याकल यांना १२ प्रकाराच्या झाडांचे १५०० सीडबॉल शहरातिल विविध उद्यानांमध्ये लावण्यासाठी देण्यात आले.

# वेतन वेळेत मिळण्यासाठी आज दंडवत आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

आदिवासी विकास विभाग अंतर्गत अनुदानित आश्रम शाळा वैराग, या शाळेचे सहशिक्षक प्रदीप काशिनाथ पाटील यांच्यासह काही कर्मचाऱ्यांचे नियमित वेतन मागील पाच महिने प्रलंबित आहे व प्रदीप काशिनाथ पाटील यांची शाळा मान्यता रद्द झाल्यानंतर मोहा आश्रम शाळेतील संस्थापकांनी समायोजन केल्यामुळे त्यांची नऊ महिन्याची प्रतिक्षा कालावधी वाढला आहे.

यामुळे गुरूवार, दि. ४ जून रोजी सोलापुरात दंडवत आंदोलन करणार असल्याचा इशारा जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद सीईओंना एका निवेदनाद्वारे दिला आहे.

या कालावधीचे वेतन आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक यांचे १ एप्रिल २०२६ चे वेतन शासनाच्या नियमित धोरणानुसार अनुज्ञेय असताना सुद्धा प्रकल्प अधिकारी व संस्थापक खानदेश स्वर्गीय स्मिता पाटील शै. सेवा सोसायटी शिरपूर, जि. धुळे यांनी प्रलंबित ठेवण्याचे कार्य केले असून, नियमित व प्रतीक्षा कालावधी वेतन न झाल्यामुळे प्रदीप पाटील यांनी सोलापुरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करून पार्क चौक ते प्रकल्प कार्यालय सोलापूर सात रस्ता पर्यंत दंडवत आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

दंडवत आंदोलन करून सुद्धा जर नियमित व प्रतीक्षा कालावधीचे वेतन काढले नाही. तर दि. ५ जून रोजी सकाळी १० वा आमरण उपोषण पुनम गेट जिल्हा परिषद सोलापूर समोर बसणार आहे. तरीही प्रतिक्षा कालावधीतील वेतन नियमित चालू पाच महिन्यांचे वेतन अदा करण्याची कार्यवाही झाली नाही तर अपर आयुक्त ठाणे, प्रकल्प अधिकारी सोलापूर, मुख्याध्यापक, संस्था यांच्या दुर्लक्षितपणाचा जाहीर निषेध म्हणून दि ८ जून रोजी सकाळी ११ वा पुनम गेट जिल्हा परिषद सोलापूर येथे मुंडन आंदोलन करण्यात येणार आहे.

# 'दक्षिण' मधील ३५ शिक्षकांचा सेवापूर्तीनिमित्त सत्कार




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

जिल्हा परिषद सोलापूर अंतर्गत गटशिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती दक्षिण सोलापूर यांच्यावतीने जानेवारी ते मे महिन्यापर्यंत सेवानिवृत्त झालेल्या तालुक्यातील ३५ शिक्षकांचा सेवापूर्ती सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. जुने जिल्हाधिकारी कार्यालय येथील बहुउद्देशीय सभागृहात हा कार्यक्रम पार पडला.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे पुण्यश्लोक अहिल्यादेवी विद्यापीठाचे सहाय्यक कुलसचिव शिवाजी शिंदे, मोहोळचे गटशिक्षणाधिकारी अविचल महाडिक, जिल्हा शिक्षण विस्तार अधिकारी हरिष राऊत, दक्षिणचे प्र. गटशिक्षणाधिकारी जयश्री सुतार,शिक्षण विस्तार अधिकारी मल्लिनाथ स्वामी, विस्तार अधिकारी गुरुबाळ सणके उपस्थित होते. प्रास्ताविक जयश्री सुतार यांनी केले. प्रमुख पाहुणे शिवाजी शिंदे म्हणाले, शिक्षक हा समाजाचा आधारस्तंभ आहे. देशाच्या विकासात शिक्षकांचे योगदान अनमोल असून विविध शासकीय जबाबदाऱ्याही शिक्षक यशस्वीपणे पार पाडत असतात. त्यामुळे शिक्षकांनी समाजासाठी कार्यरत राहावे, असे त्यांनी सांगितले. याप्रसंगी सेवानिवृत्त शिक्षकांचा फेटा, शाल तसेच पेरू व पिंपळाचे रोप देऊन सत्कार करण्यात आला. पेरूची रोपे आधार प्रतिष्ठानच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आली. सूत्रसंचालन ज्योती वाघमारे यांनी केले तर नागनाथ स्वामी यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व केंद्रप्रमुख, सर्व विशेष शिक्षक, बीआरसी कर्मचारी, किरण सगेल, अमृता कोठेकर, बी. डी. राठोड आदींनी परिश्रम घेतले.



# गोव्यात भारतीय जैन संघटनेचा भ्रमण कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

जैन समाजासह इतरही समाजात सातत्याने परिवर्तन व्हावे, यासाठी भारतीय जैन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शांतीलालजी मुथ्था व मॅनेजिंग डायरेक्टर कोमल जैन सातत्याने प्रयत्नशील असतात. त्याचाच एक भाग म्हणून भ्रमण कार्यक्रम २८ ते ३१ मे च्या दरम्यान गोव्यात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राज्याध्यक्ष केतन शहा यांनी मायक्रो प्लॅनिंग केले होते, राज्य महामंत्री प्रवीण पारख, सचिवा संतोष बंब गेल्या दोन महिन्यांपासून प्रयत्नशील होते.

भ्रमण कार्यक्रमात राज्यातील १२ विभागांपैकी ७ विभागातील १८ जिल्ह्यातील १५० कार्यकर्त्यांनी सपत्निक सहभाग नोंदविला होता.

यात सोलापूर जिल्ह्यातील ४२ कार्यकर्ते विमानाने प्रवास करून उपस्थित होते. या चार दिवसीय भ्रमंण कार्यक्रमात बालाजी मंदिर मंगेशी मंदिर, जुना गोवा चर्च, डोना- पोला, जैन मंदिर, डॉल्फिन पॉईंट, बागा बिच, इ स्थळांना भेटी देऊन क्रुझ वरील नृत्य, मनोरंजनात्मक कार्यक्रमात भाग घेतलेले आबाल- वृद्ध आनंद तुटत होते.

मॅनेजिंग डायरेक्टर कोमल जैन, गोवा राज्याध्यक्ष भरत पाटील, राज्यसचिव राजू देवरमनी इ. मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.



# प्रा.अतुल भावठणकर यांचा सेवानिवृत्त निमित्त सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

एस.ई.एस. पॉलिटेक्निक सोलापूरचे कॅम्पस डायरेक्टर तथा माजी प्राचार्य प्रा. अतुल भावठणकर यांनी संस्थेतील तब्बल ४० वर्षांची प्रदीर्घ व उल्लेखनीय शैक्षणिक सेवा पूर्ण करून सेवानिवृत्त झाले. त्यानिमिमित्त निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी सर्व विभागांच्या वतीने प्रा. अतुल भावठणकर यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष रणजित देसाई, सचिव ॲड. विजय मराठे, संचालक प्रशांत देगावकर, सदस्य राजीव देसाई, प्राचार्य एम. सी. पाटील, उपप्राचार्य विनील कोंगारी उपस्थित होते. यावेळी प्राचार्य एम. सी. पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना प्रा. भावठणकर यांच्या नेतृत्वगुणांचा, कार्यतत्परतेचा व संस्थेच्या विकासासाठी केलेल्या कार्याचा गौरव केला. यावेळी पी. आर. नागणसुरे, रितेश मदने, एन.एस. सुरवसे, निलेश एखंडे, संस्थेचे अध्यक्ष रणजित देसाई व सचिव ॲड. विजय मराठे यांची भाषणे झाली. कार्यक्रमासाठी संदीप कुनूरकर, सूरज घेराडे, अविनाश यमपुरे, व्ही. व्ही. समर्थ व एम. एम. मदने यांनी परिश्रम घेतले.

# सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची संधी

**सोलापूर दि. ३ जून-**

भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना Combined Defence Service या परीक्षेची पूर्व तयारी करुन घेणेसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व नवयुवतीसाठी दि.१५ जून २०२६ ते २८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत CDS कोर्स क्र. ६७ आयोजीत करण्यात येत आहे. कोर्स कालावधीत प्रशिक्षणार्थींना नि:शुल्क प्रशिक्षण, निवास व भोजन दिले जाते. तरी सोलापूर जिल्हयातील इच्छुक उमेदवारांनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे दिनांक १० जून रोजी सकाळी ११ वाजता मुलाखतीस हजर रहावे. मुलाखतीस येते वेळी त्यांनी Combined Defence Service यांच्या वेबसाईटवर सर्च करुन त्यामधील DSW यांच्या वेबसाईटवर सर्च करून त्यामधील CDS -६७ कोर्ससाठी प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिशिष्टांची प्रिंट घेऊन व ते पूर्ण भरुन सोबत घेऊन यावेत. अधिक माहितीसाठी training.pctcnashikgmail.com व दुरध्वनी क्र. ०२५३-२४५१०३२ किंवा व्हाटसअॅप क्रं. ९१५६०७३३०६वर संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर मिलिंद तुंगार यांनी केले आहे.

# वसंतराव नाईक विकास महामंडळाच्या कर्ज योजनांसाठी अर्ज सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या.), जिल्हा कार्यालय सोलापूर अंतर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता विविध कर्ज योजनांसाठी अर्ज स्वीकारण्यास सुरुवात झाली आहे. पात्र लाभार्थ्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक के. एम. गिऱ्हे यांनी केले आहे.

या अंतर्गत मुख्य कंपनीसह राजे उमाजी नाईक, पैलवान मारुती चव्हाण-वडार, श्रीकृष्ण, ब्रम्हलिन आचार्य दिव्यानंद पुरीजी महाराज, विणकर समाज आणि शिव गोरक्षनाथ नाथपंथी समाज आर्थिक विकास महामंडळ या उपकंपन्यांमार्फत विविध कर्ज योजना राबविण्यात येत आहेत.

ही योजना पूर्णपणे ऑनलाईन असून लाभार्थ्यांनी www.vnvjntdc.org या संकेतस्थळावर नोंदणी करून अर्ज सादर करावा. सर्व आवश्यक कागदपत्रे पोर्टलवर अपलोड करणे बंधनकारक आहे.

अधिक माहितीसाठी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या.), जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, दुसरा मजला, सात रस्ता येथे किंवा ०२१७-२९९२०८० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

# उन्हापासून बचावासाठी माथाडी कामगारांना अत्यावश्यक किट

## ज्ञानज्योती फाउंडेशन व श्री सिद्धयोगी प्रतिष्ठानचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

ज्ञानज्योती फाउंडेशन (बेळगावी) व श्री सिद्धयोगी प्रतिष्ठानच्या वतीने रणरणत्या उन्हापासून दिलासा मिळण्यासाठी श्री सिद्धेश्वर मार्केट यार्ड येथील १०० माथाडी कामगारांना दैनंदिन जीवनावश्यक किट देण्यात आले.




अडत व्यापारी सिद्धाराम उमदी, ज्ञानज्योती फाउंडेशनचे समन्वयक मयूर शिरशी, बाजार समिती माजी संचालक शिवानंद पुजारी, वीरशैव व्हिजन उत्सव समिती अध्यक्ष विजयकुमार बिराजदार, अब्बास शेख, शिरीष गवसने, रोहित लिगाडे, संगमेश्वर बिराजदार यांच्या हस्ते सदर किटचे वाटप करण्यात आले.

यावेळी उपस्थित कामगारांना आरोग्य स्वच्छता मार्गदर्शन करण्यात आले. कामगारांना देण्यात आलेल्या किटमध्ये एनर्जी सॉफ्ट ड्रिंक, ग्लुकोज पावडर, दंत क्रिम, खोबरेल तेल, हँडवॉश बॉटल या साहित्याचा समावेश आहे. यावेळी विजयकुमार बिराजदार, संतोष कापसे, प्रकाश तडकल, प्रशांत लिगाडे, शिवलिंग बणजगोळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# काटेरी झुडपात नेऊन अल्पवयीन मुलीचा विनयभंग

## आरोपीवर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. ३ जून-**

एका अल्पवयीन मुलीला दुचाकी वरून घेऊन जाऊन तिचा विनयभंग करून स्वतःचे व मुलीच्या जीवाचे बरे वाईट करण्याची धमकी दिल्याप्रकरणी एका तरुणाविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपी मयूर अंबादास पुजारी (रा. आशा नगर, सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून याबाबत पीडित मुलीच्या आईने फिर्याद दिली आहे. आरोपी मयूर याने फिर्यादीची मुलगी ही अल्पवयीन असल्याचे माहित असतानाही तिला २४ मे २०२६ रोजी संध्याकाळी भेटायला बोलावले. त्यानंतर त्याने तिला दुचाकीवरून विटभट्टीजवळील एका निर्जन ठिकाणी असलेल्या काटेरी झुडपांच्या आतील बाजूस नेले. तेथे आरोपीने तिचा हात धरून ''तू मला खूप आवडतेस, मी तुझ्याशिवाय जगू शकत नाही'' असे म्हणत जवळ ओढून मुलीशी लज्जा वाटेल असे कृत्य केले. तेव्हा पीडित मुलीने घाबरून त्याला असे काही करू नकोस असे म्हंटले असता, आरोपीने ''तू मला बोलत व भेटत जा, नाहीतर मी माझ्या किंवा तुझ्या जीवाचे बरे वाईट करेन अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे . सहाय्यक पोलीस निरीक्षक चंदनशिव हे गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## कोल्ड्रिंक्सचे गोडाऊन फोडून ४१ हजारांचा मुद्देमाल लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ जून-**

धसपिंपळगाव रोडवरील अध्यात्मा आश्रम परिसराजवळ असलेल्या एका कोल्ड्रिंक्सच्या गोडाऊनमधून अनोळखी चोरट्यांनी धाडसी चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. चोरट्यांनी गोडाऊनच्या छताचे पत्रे उचकटून आत प्रवेश केला आणि ४१,००० रुपये किम तीचे 'स्टिंग' कोल्ड्रिंक्सचे ८२ बॉक्स चोरुन नेले. याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात अनोळखी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी संदीप राजेश जगताप (वय ३२, रा. १४ नंबर शाळेच्या पाठीमागे, सुभाषनगर, बार्शी) यांचा कोल्ड्रिंक्स विक्रीचा व्यवसाय आहे. धसपिंपळगाव रोडवर अध्यात्मा आश्रम जवळ त्यांचे विविध प्रकारच्या कोल्ड्रिंक्सचे गोडाऊन आहे. रविवारी फिर्यादी जगताप यांनी आपले गोडाऊन नेहमीप्रमाणे व्यवस्थित बंद करुन मुख्य दरवाजाला कुलूप लावले होते आणि ते घरी गेले होते. त्यानंतर सोमवारी सकाळी जगताप हे नेहमीप्रमाणे गोडाऊन उघडण्यासाठी आले असता, त्यांना गोडाऊनच्या छताचा एक पत्रा वर उचकटून तोडलेल्या अवस्थेत दिसला. गोडाऊनमध्ये काहीतरी विपरीत घडल्याची शंका आल्याने त्यांनी तातडीने आत जाऊन तपासणी केली. गोडाऊनची पाहणी केली व असता, आतमध्ये विक्रीसाठी ठेवलेले 'स्टिंग' कोल्ड्रिंक्सचे ८२ बॉक्स गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. चोरट्यांनी इलेक्ट्रिक मीटरच्या वायर आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्याची बटणेही बंद केली होती, असे तपासात समोर आले आहे. त्यानंतर संदीप जगताप यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात धाव घेऊन रीतसर तक्रार दाखल केली. पोलिसांकडून तपास सुरु आहे.



### महत्त्वाचे...



## बार्शी आगारात एसटीचा वर्धापनदिन साजरा; प्रवाशांना गुलाबपुष्प वाटप

**बार्शी, दि. ३ जून-**

सोमवार दि. १ जून रोजी बार्शी आगारात एसटी बसचा ७८ वा वर्धापनदिन केक कापून साजरा करण्यात आला. बस स्थानकावरील एसटीची प्रतिकृती असलेल्या वाहतूक नियंत्रक कक्षाला व सर्व फलाटाला विद्युत रोषणाई करण्यात आली. एसटी महामंडळाचा लोगो रांगोळी स्वरुपात महिला कर्मचाऱ्यांनी वाहतूक नियंत्रक कक्षासमोर काढला. तसेच बार्शी- मुंबई बसला हार, फुगे इत्यादी वस्तू लावून सजविले होते. निवृत्त कर्मचारी रमेश देशमुख, माजी उपयंत्र अभियंता यांच्या हस्ते वर्धापनानिमित्त केक कापण्यात आला. प्रवाशांना व कर्मचाऱ्यांना साखरपेढा वाटला. यावेळी आगार व्यवस्थापक संजय भोसले, सहाय्यक वाहतूक अधीक्षक विजय हांडे, गणेश चव्हाण वाहतूक निरीक्षक, विजय बुटे लेखाकर, राम मेंडके सहाय्यक वाहतूक निरीक्षक, भरत नलवडे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी वरिष्ठ लिपीक महेंद्र क्षीरसागर, वरिष्ठ लिपीक पुरुषोत्तम वाघुरकर, संदेश थोरात लिपीक, बाबा नाईकवाडी यांचे सहकार्य लाभले.



## भाजप महिला तालुका उपाध्यक्षांचा मविसेपात प्रवेश

**माळीनगर, दि.३ जून-**

भाजप महिला आघाडी पंढरपूर तालुका उपाध्यक्ष लक्ष्मी धोत्रे यांनी त्यांच्या शेकडो समर्थकासह महाराष्ट्र विकास सेना पार्टीमध्ये राष्ट्रीय अध्यक्ष किरण साठे यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर पक्ष प्रवेश केला. महाराष्ट्र विकास सेना पार्टीचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष राजेश खरे यांच्या नेतृत्वाखाली हा पक्षप्रवेश अकलुजमध्ये पार पडला. यावेळी युवा सेना जिल्हा संघटक साईराज अडगळे, करकंब शहर प्रसिद्धी प्रमुख धीरज शिंदे, अकलूज शहर संघटक चेतन साठे, माळखांबी शहराध्यक्ष महादेव साठे, शिवाजी शिंदे उपस्थित होते. सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नावर भाजपमध्ये काम करू दिले जात नाही, असा आरोप लक्ष्मी धोत्रे यांनी केला. महाराष्ट्र विकास सेना पार्टीच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नासाठी सतत काम केले जात आहे,त्यांच्या प्रश्नाला न्याय देण्यासाठी पार्टीच्या माध्यमातून पाठपुरावा केला जात आहे. महाराष्ट्र विकास सेना पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष किरण साठे हे सर्वसमावेश नेतृत्व आहे. ते पुरोगामी महाराष्ट्राच्या विचार वाचविण्यासाठी काम करीत असून सर्व समाजाला बरोबर घेऊन काम करीत आहेत, असेही त्यांनी सांगितले.

## लोणारी समाजाच्या मागण्यांसंदर्भात आ. देशमुख यांचे मंत्री सावे यांना निवेदन

**सांगोला, दि. ३ जून-**

लोणारी समाजाच्या मागण्या संदर्भात आ.डॉ. बाबासाहेब देशम ुख यांनी राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण विकास विभागाचे मंत्री अतुल सावे यांना निवेदन दिले. विष्णुपंत दादरे लोणारी आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून विविध प्रकारची कर्जे घेण्यासाठी ऑनलाइन अर्ज करताना अर्ज प्रणालीमध्ये लोणारी समाजाचे नाव व जात क्रमांक १८३ उपलब्ध नसणे तसेच कर्ज योजनामधील जाचक अटी व अपुरी कर्ज मर्यादा यामुळे अनेक पात्र लाभार्थी योजनांपासून वंचित राहत आहेत. तरी ऑनलाइन प्रणालीमधील लोणारी समाजाचे नाव व जात क्रमांक १८३ समावेश करावा, कर्जाची मर्यादा वाढवावी, अल्प कर्जासाठी दोन जामीन दाराची अट शिथिल करावी, शासकीय सेवक व ८ वर्षे सेवा शिल्लक असलेल्या जामीनदाराची अट हटवावी तसेच ग्रामीण भागातील युवक, महिला व उद्योजकांना सुलभ निकषांवर कर्ज उपलब्ध करुन द्यावे अशी मागणी देशमुख यांनी केली आहे.

## रेशन धान्य अनियमितताप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी

**सोलापूर, दि.३ जून-**

मंगळवेढा तालुक्यातील धान्य वितरण प्रक्रियेत अनियमितता होत असल्याचा आरोप करत संबंधित ठेकेदार, पुरवठा अधिकारी आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी म हाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा समन्वयक नारायण गोवे यांनी पत्रकार परिषदेत केली आहे. १५ मे रोजी मंगळवेढा शहरातील किल्ला भागात एका सोसायटीमध्ये धान्य वितरण सुरू असताना काही गोण्यांमध्ये धान्य कमी असल्याचा संशय आल्याने पुरवठा निरीक्षकांना घटनास्थळी बोलावण्यात आले. त्यानंतर करण्यात आलेल्या तपासणीत अनेक गोण्यांमध्ये प्रत्येकी २ ते ३ किलो धान्य कमी भरल्याचे निदर्शनास आल्याचा आरोप करण्यात आला. याबाबत पंचनामा करण्यात आला असून संबंधित सोसायटी व्यवस्थापकाचा जबाबही नोंदविण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला आहे.घटनेला २० दिवसांहून अधिक कालावधी उलटूनही संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत, अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलनाचा इशारा त्यांनी दिला आहे.

# गावगाड्याचे राजकारण ऐन पावसाळ्यात तापणार!

### जिल्ह्यातील ७०१ ग्रामपंचायतीत निवडणुकीचा उडणार धुराळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

राज्य निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील १५ हजारांहून अधिक ग्राम पंचायतींसाठी सदस्य आरक्षण सोडत कार्यक्रम जाहीर केला असून, सोलापूर जिल्ह्यातही याच धर्तीवर ७०१ ग्राम पंचायतींच्या सदस्य आरक्षणाची सोडत देखील १२ जून रोजी काढली जाणार आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासन, तालुका प्रशासनाकडून तयारी सुरू झाली आहे. या गावगाड्यांच्या आरक्षण आणि निवडणुकाही ऐन पावसाळ्यात असून, यामुळे गावखेड्यांचे राजकारण ऐन पावसाळ्यात तापणार असल्याचे सध्याचे चित्र आहे.

आरक्षण सोडतीची प्रमुख वैशिष्ट्ये पाहिली तर असे दिसून येते की, या ग्रामपंचायतींमध्ये महिलांसाठी एकूण जागांपैकी ५० टक्के जागा राखीव राहणार आहेत. नागरिकांच्या मागासप्रवर्गासाठी २७ टक्के जागा राखीव ठेवल्या जातील, मात्र हे आरक्षण ५० टक्क्यांच्या मर्यादितच राहील. तर एससी/एसटी आरक्षणाम ध्ये अनुसूचित जाती आणि जम ातींसाठी जागा लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव ठेवल्या जातील. या निवडणुकीसाठी ८ जूनला विशेष ग्रामसभेची सुचना देण्यात येईल. १२ जून: विशेष ग्रामसभेत आरक्षण सोडत काढण्यात येईल. १७ जून: प्रभागनिहाय आरक्षणाच्या प्रारूप अधिसूचनेला जिल्हाधिकाऱ्यांची मान्यता दिली जाईल आणि १९ जुनला प्रभागनिहाय आरक्षणाची यादी प्रसिध्द करणे, १९ ते २५ जून पर्यंत हरकती आणि सुचना दाखल करण्याचा कालावधी राहणार आहे. ३ जुलैला उपविभागीय अधिकाऱ्यांनी अभिप्राय विचारात घेवून अभिप्राय द्यावा. यानंतर ८ जुलैला अंतिम अधिसुचनेस मान्यता आणि १० जुलै रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी मान्य केलेल्या अंतिम प्रभाग रचनेला मान्यता देणे. असा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. तर यानंतर म्हणजेच ऐन दिवाळीपूर्वी किंवा दिवाळी सणातच ग्रामपंचायत निवडणुकीचा डबल धमाका बार उडणार आहे.



सन २०२४, २०२५ मध्ये तसेच २०२६ अखेर मुदत संपणाऱ्या आणि नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतींमधील सदस्य पदांसाठी ही आरक्षण प्रक्रिया आहे. आगामी ग्रामपंचायत निवडणुकांच्या दृष्टीने या प्रक्रियेला विशेष महत्त्व आहे.

### आठ जूनला नोटीस; १२ जूनला विशेष ग्रामसभा

आरक्षण निश्चितीसाठी सोमवार, ८ जून रोजी विशेष ग्रामसभांची नोटीस प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यानंतर शुक्रवार, १२ जून रोजी विशेष ग्रामसभा घेणार असून तहसिलदारांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली आरक्षणाची सोडत काढणार आहे. या प्रक्रियेत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग, अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला, मागासवर्गीय महिला तसेच सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी आरक्षण निश्चित करणार आहे.

- **लक्ष्मण कसेकर,** उपजिल्हाधिकारी (महसूल)

### अनेक इच्छुक उमेदवारांनी बांधले गुडघ्याला बाशिंग

जिल्ह्यातील ग्रामीण राजकारणात हालचालींना वेग आला आहे. संभाव्य उमेदवार, इच्छुक नेते आणि स्थानिक राजकीय गटांनी आपापल्या मतदारसंघातील समीकरणांची चाचपणी सुरू केली आहे. ग्रामपंचायत निवडणुकांमधील आरक्षणाचा थेट परिणाम स्थानिक सत्तासमीकरणावर होत असल्याने या प्रक्रियेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अकलूजमध्ये दोन लाखांचा मावा जप्त

### अन्न व औषध प्रशासनाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३ जून-**

अन्न आणी औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी माळिशरस तालुक्यात कारवाई करण्याचा धडाका लावला असून मंगळवारी सकाळी ग्राहकाकडून बोहनी होण्याची वाट पाहत बसलेल्या येथील एका पानपट्टीवर धडक कारवाई करत मावा बनवण्याचा सुमारे दोन लाख रुपयांचा माल जप्त केला आहे.



अकलूज पंचक्रोशीमध्ये प्रसिद्ध असलेल्या बाबाचा मावा या दुकानावर अन्न व औषध प्रशासन विभागाचे सोलापूरचे अन्न सुरक्षा अधिकारी डॉ. मंगेश लवटे व पथकाने ही धाड टाकून जुने पोलीस ठाण्याच्या समोर असलेल्या बाबा पान शॉप येथून गुटखा, मावा, पानमसाला व सुगंधित तंबाखू यांसारखे प्रतिबंधित असलेल्या अन्न पदार्थांचा सुमारे १ लाख ९१ हजार रुपये किमतीचा साठा, मावा तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या दोन इलेक्ट्रिक मशीन जप्त करून दोन दुकान गाळे सील केले आहेत.

सुरक्षित व निर्भेळ अन्न पदार्थांचा पुरवठा होण्याच्या दृष्टिने अन्न सुरक्षा कायदा २००६ अंतर्गत सर्व तरतुदींचे पालन करण्याचे आवाहन सहाय्यक आयुक्त साहेबराव देसाई, सहाय्यक आयुक्त सुनिल जिंतूरकर व अन्न सुरक्षा अधिकारी मंगेश लवटे यांनी केले आहे. दुकान मालक हर्षद शिवाजी होनप व तानाजी शिवाजी भोसले यांना अटक केली आहे.

## मंगळवेढ्यातून २४ वर्षीय परिचारिका बेपत्ता

**मंगळवेढा, दि. ३ जून-**

मंगळवेढा शहरातील एका हॉस्पिटलमध्ये काम करणारी २४ वर्षीय विवाहिता तथा परिचारिका अचानक बेपत्ता झाली आहे. याप्रकरणी तिच्या वडिलांनी मंगळवेढा पोलिसात तक्रार दिली आहे. बेपत्ता परिचारिका ही मंगळवेढा शहरातील एका हॉस्पिटलमध्ये कामास आहे. तिचा दि.११ मे २०२६ रोजी विवाह झाला असून ती ग्रामीण भागात रहावयास आहे. सणानिमित्त ती तिच्या माहेरी गेली होती. दि.१ जून रोजी ती कुटूंबियास दवाखान्यात ०कामावर जाते असे सांगून बसने निघून आली होती. मात्र ती घरी न परतली नाही. पोलिसा तिचा कसून तपास घेत आहेत.

## पेशंटसब रिलीफ असोसिएशन येथे रविवारी स्मृतिदलनाचा उद्घाटन समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

पेशंटसब रिलीफ असोसिएशन सोलापूर , भावे रुग्णोपयोगी वस्तू संग्रह या संस्थेच्या स्मृतिदालनाचा उद्घाटन समारंभ रविवार दि. ७ जून २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता नवी पेठ येथील पेशंट रिलिफ असोसिएशन कार्यालयात आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती मॅनेजिंग प्रेसिडेंट सत्यनारायण गुंडला यांनी पत्रकार परिषदेत दिली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. वैशंपायन मेडिकल कॉलेज अधिष्ठाता डॉ. ऋत्विक जयकर हे राहणार आहेत. पंचागकर्ते मोहनराव दाते, वाडिया हॉस्पिटलचे चेअरमन शिरीष गोडबोले आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. रुग्णसेवा महर्षी दत्तात्रय प्रभाकर भावे यांनी रुग्णोपयोगी वस्तू संग्रह ही संस्था १९३२ साली स्थापन केली. त्यानंतर आजतागायत या संस्थेचे कार्य या ठिकाणी सुरू आहे. या संस्थेला अटल बिहारी वाजपेयी, मधू दंडवते, शरद पवार, विजय तेंडुलकर, प्रमोद महाजन, शांता शेळके यांच्यासह अनेक मान्यवरांनी भेट दिली होती. या भेटीदरम्यानची अभिप्राय आणि छायाचित्रे इथे लावले आहेत.

पत्रकार परिषदेस सेक्रेटरी चंद्रकांत कुलकर्णी , चंद्रशेखर मणेरिकर, विनायक पालमुरे यांच्यासह विश्वस्त उपस्थित होते.

## मंगळवेढा रुग्णालयाची खा. शिंदेंकडून पाहणी

### पाच दिवसांत सुधारणा न केल्यास कारवाईचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ जून**


मंगळवेढा तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील धक्कादायक गैरव्यवस्था खा. प्रणिती शिंदे यांच्या अचानक पाहणीत उघडकीस आली. प्रसूत महिलांना दीड महिन्यांपासून आहार मिळत नसल्यापासून ते महिला रुग्णांना पुरुष विभागातच दाखल करण्यापर्यंतच्या अनेक गंभीर त्रुटी समोर आल्याने खासदार शिंदे यांनी प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले.



गत आठवड्यात हाजापूर येथील ग्रामस्थ सिद्धेश्वर बिचुकले यांनी रुग्णालयातील निष्काळजीपणा, कर्मचाऱ्यांची अरेरावी आणि रुग्णसेवेतील हलगर्जीपणाबाबत खासदार शिंदेंकडे तक्रार केली होती. त्यानंतर त्यांनी पूर्वसूचना न देता सोमवारी रुग्णालयाला भेट दिली. पाहणीवेळी प्रसूत महिलांना दिला जाणारा आहार दीड महिन्यांपासून बंद असल्याचे उघड झाले. संबंधित पुरवठादाराची बिले प्रलंबित असल्यामुळे रुग्णांना भोजन मिळत नसल्याचे समोर आले. आवश्यक वैद्यकीय उपकरणांची कमतरता, कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या आणि व्यवस्थापनातील ढिसाळपणा दिसून आला. गंभीर बाब म्हणजे म हिला आणि पुरुष रुग्णांसाठी स्वतंत्र व्यवस्था आवश्यक असताना प्रसूत महिलांना ठेवलेल्या विभागातच पुरुष रुग्णांना दाखल केले होते. महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह व स्नानगृहाची सुविधाही उपलब्ध नसल्याने खासदार शिंदे यांनी नाराजी व्यक्त केली. अशा प्रकारची व्यवस्था महिलांच्या सन्मान आणि गोपनीयतेवर आघात करणारी असल्याचे स्पष्ट केले. याबाबत त्यांनी सोलापूरचे सिव्हिल सर्जन यांच्याशी थेट संपर्क साधला. पाच दिवसात सर्व त्रुटी दूर करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर प्रशासकीय कारवाईचा इशाराही दिला. यावेळी ओपीडी, औषधसाठा, कर्मचारी उपस्थिती आणि तपासणी सुविधांचाही आढावा घेतला. सीबीसी तपासणीसाठी आवश्यक यंत्र नसल्याने सीएसआर निधीतून उपलब्ध करून देण्याचे आश्वासन खा. शिंदे यांनी दिले. यावेळी प्रशांत साळे, ॲड. राहुल धुळे, ॲड. रवीकिरण कोलेकर, जिल्हा समन्वयक मनोज उलगुलवार, संदीप पवार, कुंडलिक बिचुकले उपस्थित होते.

## विठ्ठल मंदिरातील घंटा पुनर्स्थापनेच्या प्रतिक्षेत; पेशवेकालीन २६८ वर्षे जुनी पंचधातूचा ठेवा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३ जून-**



येथील श्रीविठ्ठल-रुक्मिणी मंदिरात जतन व संवर्धनाची कामे सुरू आहेत. या दरम्यान अनेक ऐतिहासिक वस्तू सम ोर येत आहेत. अलीकडेच सुमारे ४०० वर्षे जुना दगडी रांजण सापडला होता. त्यानंतर आता सुमारे २६८ वर्षे जुनी आणि तब्बल दोन टन वजनाची पंचधातू पासून बनविलेली ऐतिहासिक घंटा अडगळीत पडल्याचे समोर आले आहे. ही महाकाय घंटा मंदिरात पुन्हा प्रतिष्ठापना करावी, अशी मागणी भाविकांकडून होत आहे.

थोरले बाजीराव पेशवे यांचे बंधू चिमाजी अप्पा यांनी इ.स.१७३९ मध्ये वसई मोहिमेत पोर्तुगीजांवर मिळवलेल्या ऐतिहासिक विजयाच्या स्मरणार्थ ही घंटा विठ्ठल मंदिराला अर्पण केल्याची आख्यायिका सांगितली जाते. वसई किल्ला जिंकल्यानंतर तेथील चर्चमधील मोठ्या घंटा महाराष्ट्रातील विविध मंदिरांना भेट म्हणून देण्यात आल्या. त्यापैकीच ही एक घंटा असल्याचे मानले जाते. युरोपियन बनावटीची ही घंटा पंचधातूपासून तयार केली आहे. तिचा नाद गंभीर आणि वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे सांगितले जाते. सध्या मंदिराच्या जतन-संवर्धनाच्या कामांमुळे ही घंटा बाजूला ठेवली आहे. काम पूर्ण झाल्यानंतर पेशवेकालीन विठ्ठल सभामंडपात तिची पुनर्स्थापना करणार आहे.

# पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हाती गणवेश, पाठ्यपुस्तके

### प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख; जिल्हा परिषदेची पूर्वतयारी पूर्ण, ४.३३ कोटींचा निधी मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ जून-**

नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना मोफत गणवेश आणि पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा परिषद शिक्षण विभागाने व्यापक नियोजन केले आहे. १५ जून रोजी शाळा सुरू होताच विद्यार्थ्यांच्या हाती गणवेश व पुस्तके देण्याची तयारी पूर्ण झाल्याची माहिती प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी दिली.

शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी समग्र शिक्षा अभियान आणि राज्य शासनाच्या गणवेश योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात निधी मंजूर केला आहे. यंदा जिल्ह्यातील तब्बल १ लाख ८० हजार ५२७ विद्यार्थ्यांना लाभ मिळणार आहे. वेळेत गणवेश मिळण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने ४ कोटी ३३ लाख २६ हजार ४८० रुपयांचा निधी वितरित केला आहे. मंजूर तरतुदीच्या ८० टक्के प्रमाणे प्रति विद्यार्थ्याला २४० रुपये अनुदान शाळा व्यवस्थापन समितीमार्फत उपलब्ध करणार आहे. यामध्ये सर्व मुली, अनुसूचित जाती-जमातीतील विद्यार्थी, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील मुले तसेच खुल्या व इतर मागास प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांचा समावेश आहे. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद यांच्या सूचनांनुसार शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक आणि सचिव यांनी गणवेश वितरणाची प्रक्रिया पारदर्शक आणि वेळेत पूर्ण करणे बंधनकारक आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच शैक्षणिक साहित्य दिल्याने शिक्षणात खंड पडणार नाही, असा विश्वास शिक्षण विभागाने व्यक्त केला आहे. शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके आणि गणवेश मिळावेत यासाठी सर्व स्तरांवर नियोजन केले आहे. प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत शासकीय योजनांचा लाभ वेळेत पोहोचविण्यावर भर देत आहे.



शाळेच्या विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी गणवेश, बूट, पायमोजे आणि पाठ्यपुस्तके मिळणार आहे. त्यासाठी व्यापक नियोजन केले आहे. तालुका स्तरावर गटशिक्षणाधिकाऱ्यांमार्फत मोफत पाठ्य पुस्तके वितरण करत आहे. विद्यार्थ्यांच्या प्रवेशोत्सवासाठी संबंधित शाळांना स्वच्छता आणि देखभाल दुरुस्तीच्या सूचना दिल्या आहेत. पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे आनंदाच्या वातावरणात स्वागत करण्याची सूचना दिली आहे. पालकांनीही पाल्यांना पहिल्या दिवशी शाळेत पाठवावे.

**- कादर शेख, प्राथमिक शिक्षणाधिकारी.**